


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

लातूर | बुधवार, २१ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३२२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



राष्ट्रासाठी त्याग करणे हा काही त्याग नाही. जेव्हा एखादी माता आपल्या मुलाला स्तनपान करते तेव्हा तिच्या अंत:करणातही तोच भाव असतो. शाश्वत आनंदाची ही अनुभूती आहे. हे सत्य लक्षात ठेवून ज्याप्रमाणे माता आपल्या पुत्रासाठी आत्मीयतेची व्याप्ती वाढवून ज्या प्रकारच्या आनंदाची अनुभूती घेते त्याचप्रमाणे आपल्या अहंकाराला आपल्या राष्ट्राच्या व्याप्तीपर्यंत वाढवणे हे आपल्या सर्वांचे ध्येय असले पाहिजे.

**- भाऊसाहेब भुस्कुटे**
रा. स्व. संघाचे माजी मध्य क्षेत्र प्रचारक

## महत्त्वाचे

### शिवसेना पक्षावर आज अंतिम सुनावणी

**नवी दिल्ली** : शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात बुधवारी अंतिम सुनावणी होणार आहे. या सुनावणीनंतर तीन वर्षांपासून प्रलंबित प्रकरणाचा निकाल येणार आहे. या निकालावर शिवसेना पक्षातील नगरसेवक, आमदार आणि खासदार यांचे भवितव्य आणि सत्तेची पुढची गणिते अवलंबून असेल. उबाठा गटाने दाखल केलेल्या याचिकेवरील खटला तीन वर्षांपासून प्रलंबित आहे. २१ जानेवारीला अंतिम सुनावणी होईल, असे मागील सुनावणीत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सांगितले होते.

# पहिल्याच दिवशी १४.५ लाख कोटींची गुंतवणूक

### उद्योगांसाठी 'गेटवे ऑफ इंडिया' ठरतोय महाराष्ट्र

### राज्यात १५ लाख रोजगार

### १९ सामंजस्य करारांतून आयटी, हरित ऊर्जा व डाटा सेंटर क्षेत्रात विक्रमी गुंतवणूक

**दावोस, २० जानेवारी**

'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या वार्षिक परिषदेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने तब्बल १४.५० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे १९ सामंजस्य करार करीत उद्योगांसाठी महाराष्ट्र 'गेटवे ऑफ इंडिया' ठरतोय हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या गुंतवणुकीमुळे राज्यात सुमारे १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार असून, आयटी, डाटा सेंटर, हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर आदी विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात विकास होणार आहेत.

दावोस येथे महाराष्ट्र पॅव्हेलियनचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र हा विश्वासार्ह, दीर्घकालीन भागीदार असून, भारताच्या भविष्याचे 'पॉवर हाऊस' म्हणून राज्य जगभरातील उद्योगांना साद घालत असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. पहिल्याच दिवसापासून जागतिक उद्योग समूहांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी उत्सुकता दर्शवल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

(तभा वृत्तसेवा)



देवेंद्र फडणवीस अर्बन ट्रान्सफॉर्मेशनचे प्रमुख जेफ मेरिट यांच्यासोबत चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दावोस येथे महाराष्ट्राच्या जागतिक भागीदारीची नवी झेप**

(शेवटच्या पानावर)

### गडचिरोलीत २० हजार कोटींची गुंतवणूक

महाराष्ट्र सरकार आणि सुरजागड इस्पात यांच्यात गडचिरोली येथे स्टील क्षेत्रात २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा सामंजस्य करार झाला असून, या प्रकल्पातून सुमारे आठ हजार रोजगार संधी निर्माण होणार आहेत. या गुंतवणुकीमुळे गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

### सामंजस्य करार पुढीलप्रमाणे

**महाराष्ट्र सरकार-काल्सबर्ग**
क्षेत्र : अन्न प्रक्रिया आणि कृषी
गुंतवणूक : ५०० कोटी
रोजगार : ७५०

**महाराष्ट्र सरकार-योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि.**
क्षेत्र : नविनिकरणीय ऊर्जा
गुंतवणूक : ४ हजार कोटी
रोजगार : ६ हजार

**महाराष्ट्र सरकार-बीएफएन फॉर्जिंग्स**
क्षेत्र : स्टील
गुंतवणूक : ५६५ कोटी
रोजगार : ८४७

**एमएमआरडीए-सुमिटोमो रियालिटी**
गुंतवणूक: ८ अब्ज डॉलर्स
रोजगार : ८० हजार.

**एमएमआरडीए-के. रहेजा**
गुंतवणूक : १० अब्ज डॉलर्स
रोजगार : एक लाख.

**एमएमआरडीए-अल्टा कॅपिटल/पंचशील**
गुंतवणूक : २५ अब्ज डॉलर्स
रोजगार : २.५० लाख

**एमएमआरडीए-एसबीजी समूह**
क्षेत्र : लॉजिस्टिक्स
गुंतवणूक : २० अब्ज डॉलर्स
रोजगार : ४.५० लाख

**एमएमआरडीए-आयआयएसएम ग्लोबल**
गुंतवणूक : ८ बिलियन डॉलर्स
रोजगार : ८० हजार.

**एमएमआरडीए-जायका**
धोरण आणि स्ट्रॅटेजी पार्टनर

**एमएमआरडीए-सेम्बकॉर्प डेवलपमेंट लि. सिंगापूर**
एकीकृत इंडस्ट्रियल पार्कसाठी नॉलेज पार्टनर

**एमएमआरडीए-टेक्निकल युनिव्हर्सिटी, मुनीच, जर्मनी**
शाश्वत नागरी वाहतूक प्रणाली

**महाराष्ट्र सरकार-लोढा डेव्हलपर्स**
क्षेत्र : आयटी, डेटा सेंटर्स
गुंतवणूक : १ लाख कोटी
रोजगार : १ लाख ५० हजार.

# मी पक्षाचा कार्यकर्ता, संघटनेत नितीन नबीन माझे बॉस

### नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली, २० जानेवारी**

भाजपा असा पक्ष आहे, ज्यात पद नाही, तर प्रक्रिया महत्त्वाची असते. मी तीन कार्यकाळापासून पंतप्रधान असलो, तरी पक्षाचा कार्यकर्ता असणे ही अभिमानाची बाब आहे. त्यामुळे जेव्हा पक्षाचा विषय येतो, तेव्हा मी एक कार्यकर्ता असतो आणि पक्षाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन हेच माझे बॉस आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले.

नितीन नबीन यांच्या भाजपा मुख्यालयात आयोजित पदग्रहण समारंभात मोदी उपस्थित नेते आणि कार्यकर्त्यांना संबोधित होते. नितीन नबीन तरुण आणि ऊर्जेने परिपूर्ण असे नेते आहेत, असे गौरवोद्गार काढत मोदी म्हणाले की, नबीन अशा पिढीचे प्रतिनिधी आहेत, ज्यांनी भारतात मोठ्या प्रमाणात आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक बदल होताना पाहिले.

(तभा वृत्तसेवा)



राजधानी दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात भाजपाचे नवीन अध्यक्ष नितीन नबीन यांना मिठाई भरवताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

# इंदूर येथील विजयाने आत्मविश्वास वाढला

**नागपूर, २० जानेवारी**

इंदूर येथील सामन्यात मिळालेल्या विजयामुळे आमच्या संघाचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे नागपुरातील जामठा स्टेडियमवर होणाऱ्या पहिल्या टी-२० सामन्यातही संघ चांगली कामगिरी करेल, असा विश्वास येथे आयोजित पत्रपरिषदेत न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरने व्यक्त केला.



तुल्यबळ भारतीय संघासोबत खेळायला आम्हाला आवडते. आम्ही वेगवेगळ्या फॉरमॅटमध्ये यश मिळविले आहे. त्यामुळे संघातील खेळाडूंचे मनोबल उंच आहे. येणाऱ्या स्पर्धा जिंकण्यासाठी आमचा संघ उत्सुक आहे. विश्वचषक जिंकण्यासाठी आम्ही तयारी करीत आहोत, असेही सँटनर म्हणाला.

आमचा संघ १० वर्षांपूर्वी नागपूर येथे सामना खेळला होता. त्यावेळी खेळपट्टीने दिलेली साथ यावेळीही मिळेल, याबद्दल मात्र खात्री देता येत नाही. त्यामुळे कठोर परिश्रम करावेच लागतील, असेही तो म्हणाला. (तभा वृत्तसेवा)

# भारताच्या विजयाबद्दल सूर्यकुमारला खात्री

**नागपूर, २० जानेवारी**

टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेपूर्वी भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. पहिला टी-२० सामना नागपूर येथे बुधवारी खेळला जाणार आहे. इंदूर येथील एकदिवसीय सामन्यात पराभव पत्करावा लागला असला तरी टी-२० सामन्यात भारत चांगली कामगिरी करेल, असा विश्वास भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने पत्रपरिषदेत व्यक्त केला.



तिसऱ्या क्रमांकावर कोण खेळणार, याबद्दलही त्याने सांगितले. पहिल्या टी-२० सामन्यात ईशान किशनला पहिली पसंती दिली जाणार आहे.

**तिलक वर्माच्या जागी श्रेयस अय्यर**

भारत-न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिकेसाठी तिलक वर्माच्या जागी श्रेयस अय्यरची संघात वर्णी लागली आहे. पण, ११ खेळाडूंमध्ये त्याला संधी मिळते का, ते पाहावे लागेल. (तभा वृत्तसेवा)





10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 31 जानेवारी 2026 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टँडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सर 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर.

Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road AHERKAR BAJAJ 9689899840 • Hotgi Road AHERKAR BAJAJ 8956 069 355 • Akkalkot Road AHERKAR BAJAJ 8956 320 060 • Pandharpur PANDURANG BAJAJ 8600024805 • Jeur SHIVRATNA BAJAJ 9922044676 • Barshi AHERKAR BAJAJ 8308004007.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### राजुरीतील महाआरोग्य शिबीरात १ हजार १०० रुग्णांची तपासणी

**करमाळा, दि. २० जानेवारी-**

डॉ. दुरंदे हॉस्पिटल (करमाळा), मेडीकोज गिल्ड आणि परिवर्तन प्रतिष्ठान (राजुरी) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १८) जिल्हा परिषद शाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या 'विनामूल्य महाआरोग्य शिबिरास' राजुरीसह पंचक्रोशीतील नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. या शिबिरात ११०० रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधांचे वितरण करण्यात आले. परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अमोल दादासाहेब दुरंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील महागडे उपचार आणि औषधे गावातच विनामूल्य मिळाल्याबद्दल ग्रामस्थांनी डॉ. अमोल दुरंदे, डॉ विद्या दुरंदे, डॉ. प्रदीप तुपेरे, डॉ. विठ्ठल पवार, डॉ. रोहित साळुंखे, डॉ. नायकुडे, डॉ. जिनेंद्र दोभाडा, डॉ. पापा मनेरी, डॉ. संकेत फाळके आणि आयोजक टीमचे विशेष आभार मानले. आरोग्य सुविधेच्या अभावी अनेकदा ग्रामीण रुग्ण उपचारांकडे दुर्लक्ष करतात, मात्र अशा शिबिरांमुळे आरोग्याप्रती जागृती निर्माण होत आहे.



### मराठी भाषा आपली सांस्कृतिक ओळख : डॉ. चौधरी

**जेऊर दि. २० जानेवारी-**

मराठी भाषा ही केवळ संवादाची भाषा नसून ती संतांची, पंतांची, कष्टकऱ्यांची व सामान्य जनतेची भाषा आहे. समाजाला विचार, संस्कार आणि सर्वार्थाने परिपूर्ण करण्याचे महान कार्य मराठी भाषेने केले आहे. त्यामुळेच मराठी ही अभिजात भाषा तर आहेच पण त्याचबरोबर ती आपली सांस्कृतिक ओळख, वैचारिक बैठक आणि सामाजिक बांधिलकी आहे. असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ. संजय चौधरी यांनी केले. करमाळा येथील न्यायालयात तालुका विधीसेवा समिती व वकील संघ करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधवाड्या निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. चौधरी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस.पी.कुलकर्णी होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष वरिष्ठ न्यायाधीश संजय घुगे, न्यायाधीश अमित शर्मा तसेच वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राम नीळ उपस्थित होते. अध्यक्षीय भाषण न्यायाधीश श्रीमती एस.पी. कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन वरिष्ठ लिपिक एस.एल. जाधव यांनी केले तर वरिष्ठ लिपीक राम खराडे यांनी आभार मानले.



### महापालिकेतर्फे सहाय्यक उपनिरीक्षक अजितसिंह देशमुख यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एक खिडकी कक्षामध्ये उत्कृष्ट काम केल्याने महापालिका सहायक आयुक्त मनीषा मगर यांच्या हस्ते सहाय्यक उपनिरीक्षक अजितसिंह देशमुख यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सोलापूर महानगरपालिका येथे सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये त्यांनी चांगले योगदान दिले आहे.

### फिनिक्स स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**मोहोळ, दि. २० जानेवारी-**

फिनिक्स इंग्लिश मिडीयम स्कूल मोहोळ २०२५-२६ यावर्षीचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानी मोहोळच्या माजी नगरसेविकाअर्चना वायचळ होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून विराज प्री प्रायमरी स्कूल नंदुरचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार नागणे, डॉ. आयेशा तांडुरे, राणी नागणे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत पुजारी तसेच बाळासाहेब जाधव, अश्वमेध ड्रायव्हिंग स्कूल मोहोळचे कांबळे,सामाजिक कार्यकर्ते दिनेश माने, कैलास जाधव उपस्थित होते. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सर्व शिक्षक स्टाफ यांचेही योगदान लाभले. यामध्ये मुख्याध्यापक प्रशांत मदने सर व यशोदा मदने, सारिका नाईकनवरे,ज्योती केवळे, शितल मेटकरी, समीना तांबोळी, सोनाली जाधव यांचेही सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रमोद कोरे यांनी केले. तसेच आभार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कृष्णदेव मदने सर यांनी मानले. मुख्याध्यापक प्रशांत मदने, यशोदा मदने यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला.

### टाटा मोटर्सकडून नेक्स्ट-जनरेशन ट्रक्स लॉंच

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

भारतातील ट्रकिंग क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक व गतीशीलता सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आज आपल्या १७ ट्रक्सचा नेक्स्ट-जनरेशन पोर्टफोलिओ लॉंच केला. हे ट्रक्स ७ टन ते ५५ टन कन्फिग्युरेशन्समध्ये उपलब्ध आहेत. यासह सुरक्षितता, नफा व प्रगतीमध्ये नवीन मापदंड स्थापित केले आहे. या सर्वसमावेशक लॉंचमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, अत्याधुनिक टाटा ट्रक्स. ईव्ही श्रेणी आणि प्रस्थापित प्राइमा, सिग्ना व अल्ट्रा प्लॅटफॉर्म्समधील मोठ्या अपग्रेड्सचा समावेश आहे. गिरीश वाघ म्हणाले,भारतातील ट्रकिंग क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होत आहे.


# 'दक्षिण'मध्ये अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची गर्दी

## जिल्हा परिषदेसाठी २३ तर पंचायत समितीसाठी ४६ अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २० जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून दक्षिणमध्ये इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. अर्ज भरण्यासाठी मंगळवारी इच्छुकांनी गर्दी केल्याचे दिसून आले . भाजपाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी इच्छुकांची धावपळ सुरू आहे. मात्र यावेळी कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी निश्चित नसल्यामुळे एका जागेसाठी पाच पेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. मंगळवारी २० जानेवारी रोजी जिल्हा परिषदेसाठी २३ तर पंचायत समिती गणासाठी ४६६९ उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीची रंगत वाढल्याचे दिसून येत आहे.

१६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून सोमवारपासून इच्छुकांकडून अर्ज भरण्यात येत आहे. २१ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याचा कालावधी असून २० जानेवारी रोजी अनेक दिग्गजांकडून उमेदवारी दाखल करण्यात आले. सर्वच पक्ष उमेदवारी निश्चित न करता अर्ज दाखल करण्यास सांगितले आहेत. त्यामुळे एका गटात एकाच पक्षाकडून चार ते पाच इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरली आहेत. कार्यकर्त्यांमध्ये व इच्छुकांमध्ये नाराजी निर्माण होऊ नये, यासाठी सर्वच पक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर एबी फॉर्म शेवटच्या क्षणाला देणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांची धाकधूक वाढली आहे. मंगळवारी दक्षिण तहसील कार्यालयात अर्ज भरण्यासाठी इच्छुकांची मोठी गर्दी होती.



### दक्षिणमधील उमेदवारी दाखल संख्या

**जिल्हा परिषद गट :** बोरामणी - ४, कुंभारी - ८, वळसंग - १, हत्तूर - ३, मंद्रूप - ४ व भंडारकवठे - ३, एकूण - २३

**पंचायत समिती गण :** कासेगाव - १ , बोरामणी - ४, कुंभारी - ८, धोत्री - १ , वळसंग - ४, होटगी - ४ , हत्तूर - ७, औराद - ३, मंद्रूप - ४, कंदलगाव - ३, भंडारकवठे - १ व निंबर्गी - ६, एकूण - ४६

### यांनी भरला अर्ज

सत्ताधारी पक्षाकडून उमेदवारी मागणी अधिक असल्याने उमेदवारी अनिश्चितता आहे. मात्र मंगळवारी सुरेश हसापुरे, इंदुमती अलगोंडा पाटील, सोनाली कडते, धनशे अचलारे, उज्वला हविनाळे, सविता मेंडगुदले, मळसिध्द मुगळे, शितल राठोड, रामप्पा चिवडशेट्टी, संदिप टेळे यांच्यासह अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. आज बुधवार दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्यासाठी मुदत आहे.

## जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी मंगळवार अखेर ५० अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२० जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी दि.१६ जानेवारी पासून नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी सुरुवात झाली असून दि.२० जानेवारी पर्यंत एकूण ६५४ अर्जाची विक्री झाली असून त्यापैकी ५० नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या सहा.निवडणूक निर्णय अधिकारी



बाळूताई भागवत यांनी दिली.

जिल्हा परिषद गटासाठी महुद बु- ५, एखतपुर- २, जवळा- ६, कडलास- १, चोपडी- ५, कोळा- ४, घेरडी- ४ असे एकूण २८ अर्जांचे नामनिर्देशन झाले आहे. तसेच पंचायत समिती साठी घेरडी- ४, हातीद- ५, चोपडी- २, कडलास- ५, जवळा- १, वाकी शिवणे- ३, चिकमहुद- २, महुद- १ असे एकूण २२ गणातून नामनिर्देशनपत्र दाखल झाले असल्याची माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी दिली. मंगळवार दि.२० जानेवारी जिल्हा परिषद गटासाठी २३ व पंचायत समिती गणासाठी २२ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

## अक्कलकोट तालुक्यातील जि.प.साठी पाच तर पंचायत समितीसाठी सात उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत जिल्हा परिषद गटातून पाच तर पंचायत समिती गणातून सात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती तहसीलदार विनायक मगर यांनी दिली.

यामध्ये जिल्हा परिषद जेऊर गटातून दोन मंगरूळ जि प गटातून तीन असे एकूण पाच उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले .शिरवळ पंचायत पंचायत समिती गणातून एक उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. तर जेऊर पंचायत समिती गणातून दोन उमेदवारांनी अर्ज दाखल केला. सुलेर जवळगे गणातून एक मंगरूळ गणातून एक नागणसूर गणातून एक सलगर गणातून एक असे सात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.. जेऊर जिल्हा परिषद गटातून अश्वघोष बाबुराव बनसोडे (इंडियन नॅशनल कॉंग्रेस ) लालचंद रेवप्पा नडगम ( इंडियन नॅशनल कॉंग्रेस ) मंगरूळ जिल्हा परिषद गटातून लक्ष्मीबाई श्रीमंत देसाई (भारतीय जनता पार्टी ) लक्ष्मीबाई श्रीमंत देसाई (अपक्ष)विष्णू शेटप्पा शिवशरण (भारतीय जनता पार्टी) ., शिरवळ पंचायत समिती गणातून गणेश शंकर मोरे (शिवसेना) ,जेऊर पंचायत समिती गण श्रुती काशिनाथ पाटील (इंडियन नॅशनल कॉंग्रेस) विमल विलास गव्हाणे (भारतीय जनता पार्टी ) सुलेरजवळगे पंचायत समिती गण सुशेकांत जगदेव कांबळे ( अपक्ष )मंगरूळ पंचायत समिती गण पार्वती परमेश्वर यादवाड (भारतीय जनता पार्टी) नागणसूर पंचायत समिती गणातून अनिता सखाराम राठोड (भारतीय जनता पार्टी)सलगर पंचायत समिती गण इंद्रजीत चंद्रशेखर गड्डी (शिवसेना).



## कासारवाडी येथे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर

**बार्शी, दि. २० जानेवारी-**

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मौजे कासारवाडी येथे सुरु असलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराच्या तिसऱ्या दिवशी 'शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका' या विषयावर प्रभावी मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले. शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका जलसंधारण व्यवस्थापन व पडीक जमीन विकास या संकल्पनेवर आधारित हे शिबीर दि. १७ ते २३ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. व्याख्यानासाठी सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रा. डॉ. महादेव डिसले हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. डॉ. डिसले यांनी पर्यावरणसंरक्षण, स्वच्छता, वृक्षारोपण, पाणी संवर्धन यांसारख्या उपक्रमांमधून समाजाच्या विकासाला योग्य दिशा देता येते, असे सांगितले. शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांच्या बळावर सकारात्मक परिवर्तन शक्य असून शाश्वत विकास साध्य करण्यासाठी युवकांनी जबाबदारीने पुढे येणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. बी. डी. लांडे हे होते. प्रास्ताविक कुणाल कसबे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय ज्योती काळे हिने करुन दिला. कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. ए. ढगे, प्रा. के. एम. माळी, प्रा. एम. एन. मोरे, प्राध्यापिका जे. आर. यादव, राजू जाधव, ज्ञानेश्वर गायकवाड तसेच सुमारे १०० स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते. सूत्रसंचालन सृष्टी गुंडगीरे हिने केले. अजय चव्हाण यांनी आभार मानले.

## समतादुतांनी शासनाच्या विकास प्रक्रियेचे वाहक व्हावे : डॉ. हर्षदीप कांबळे



### महाड येथे समतादुतांची दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

समतादूत हे शासन, सामाजिक न्याय विभाग व बार्टीच्या विविध योजनांचा लाभ वंचित घटकांपर्यंत पोहोचविणारे महत्त्वाचे दुवे आहेत. त्यांनी शासनाच्या विकास प्रक्रियेचे प्रभावी वाहक म्हणून काम करावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने दि. १९ व २० जानेवारी २०२६ रोजी क्रांतीभूमी महाड, रायगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात समतादूत व प्रकल्प अधिकाऱ्यांची दोनदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन दूरदृश्य प्रणालीद्वारे डॉ. कांबळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण आदी उपस्थित होते. समतादूत पच्या माध्यमातून शासनाच्या योजनांचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावी होईल, असेही डॉ. कांबळे यांनी सांगितले.

महासंचालक सुनील वारे यांनी महाडच्या क्रांतिकारी परंपरेचा उल्लेख करत समतादुतांनी नवे ज्ञान व कौशल्य आत्मसात करावे, असे आवाहन केले. कार्यशाळेत राज्यभरातील ३०० समतादूत व प्रकल्प अधिकारी सहभागी झाले असून, उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी समतादूत विभागाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती तेजस्वी सोनवणे, राजश्री कांबळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाडचे व्यवस्थापक प्रकाश जमदाडे, माहिती जनसंपर्क अधिकारी लिना कांबळे, यांनी मेहनत घेतली.सूत्रसंचालन प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

## संशोधन प्रकल्पांचा उपयोग समाजासाठी व्हावा

### उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार; 'स्वेरी'त बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनीचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० जानेवारी-**

'आज विज्ञान हा दैनंदिन जीवनशैलीचा एक भाग बनलेला आहे. आपल्या ज्ञानात विज्ञानामुळे अधिक भर पडत असते. विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जर बदलला तर जीवनात सकारात्मक येते आणि चिकित्सक वृत्ती, जिज्ञासू वृत्ती वाढीस लागते आणि मग आपल्यामधूनच शास्त्रज्ञ, उद्योजक घडत असतात. आपल्या संशोधन प्रकल्पांचा समाजासाठी उपयोग व्हावा तरच आपल्याला त्यातून आनंद घेता येईल, असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांनी केले.

राज्य विज्ञान संस्था, रविनगर, नागपूर व शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये आयोजिलेल्या '५३ व्या सोलापूर जिल्हा स्तरीय बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनी २०२५-२६'च्या समारोप प्रसंगी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार या मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्ह्याचे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रकाश नांगरे हे होते. महाराष्ट्र राज्य विज्ञान महामंडळाचे संचालक लक्ष्मीप्रसाद मोहिते यांनी प्रास्ताविकात 'स्वेरीमध्ये आयोजिलेल्या विज्ञान व गणित प्रदर्शनासंबंधी माहिती दिली. अध्यक्षस्थानावरून उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन गणेश लटके यांनी केले.



### १३२ प्रकल्पांचे सादरीकरण

प्राथमिक, माध्यमिक व शिक्षक गटातून तब्बल १३२ प्रकल्पांचे सादरीकरण केले गेले. यामध्ये बालवैज्ञानिकांमधून अद्भुत, बौद्धिक कल्पनांचे विशेष संशोधन आढळले तर हे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती.प्रा.शितल पाटील, प्रा. एस.डी. माळी, प्रा. एस.एस.गायकवाड, प्रा. पी.बी. लोखंडे, डॉ. एस.डी. भोसले, आदींनी परीक्षकांचे काम पहिले.

या प्रदर्शनातून प्राथमिक गटात प्रथम- बसवराज रविकांत तोळनुरे (प्रकल्प-सौर कृषी पंप), द्वितीय-विरोचंद सिद्धेश्वर कराळे (हॅन्ड डेस्टर कार), तृतीय- प्रेमराज आण्णासाहेब शेळके (ट्रान्समिशन लाईन), माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून प्रथम -महेश श्रीमंत टेंगळे (स्मार्ट ॲग्रिकल्चर), द्वितीय- आयुब चारुदत्त लाड (स्मार्ट स्कूल) व तृतीय- जुनेद बाग्दावर शेख (ऊमन सेफ्टी अँड मल्टीपर्पज सेफ्टी), दिव्यांग गटातून प्राथमिक गटात प्रथम- सुप्री गजेंद्र शिंदे (जल, संधी, व्यवस्थापन), दिव्यांग गटातून माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात प्रथम- गणेश महादेव निकम (अंडी उबवणे मशीन), प्राथमिक शिक्षक गटात प्रथम- विशाल विष्णुदास रेपाळ (माझी गणित शाळा), माध्यमिक शिक्षक गटात प्रथम- मंगेश अरविंद सोनटक्के (खेळातून जीएसटी आणि कृतीयुक्त आराखडा), योगशाळा व परिचर गटात प्रथम- शशिकांत हनुमंत शेंडे (निर्मिती वैज्ञानिक संकल्पना स्पष्टीकरण पूरक वैज्ञानिक व शैक्षणिक सहल) हे विद्यार्थी व शिक्षक विजेते ठरले असून त्यांची निवड राज्य पातळीवर झाली आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# चीन सीमेजवळ १७ संरक्षण प्रकल्प उभारणार

**केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी** | **वनविभागाच्या परिसरात लष्करी तळ, दारुगोळा निर्मिती होणार**

**प्रकल्पांमध्ये काय विशेष?** ● लष्करासाठी नवीन चौक्या बांधल्या जातील ● ब्रिगेड मुख्यालयाचे बांधकाम करणार ● वायुतळासाठी धावपट्टी तयार करणार ● दारुगोळा निर्मिती आणि साठवणूक केंद्र ● प्रशिक्षण सुविधा बांधल्या जातील



◆ **नवी दिल्ली, २० जानेवारी**

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने चीन सीमेजवळील वनविभागाच्या परिसरात लडाख आणि सिक्कीममध्ये १७ संरक्षण पायाभूत सुविधा प्रकल्प उभारण्यास मंगळवारी मंजुरी दिली.

राष्ट्रीय सुरक्षा लक्षात घेऊन, या प्रकल्पांमध्ये लष्करी तळ व मुख्यालय, वायुदलाचे तळ, दारुगोळा निर्मिती कारखाना आणि शस्त्रे साठवण्याच्या ठिकाणांचा समावेश आहे. प्रकल्पांना मंजुरी देण्यावेळी वन्यजीव संवर्धनाला प्राधान्य देण्यात आले.

पर्यावरण मंत्रालयाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, लडाख आणि सिक्कीममधील संरक्षण प्रकल्प वनविभागाच्या परिसरात असल्याने यासाठी समिती गठित करण्यात आली. या समितीत विविध विषयांतील १२ तज्ज्ञांचा समावेश होता. त्यांनी प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष पाहणी करीत अहवाल तयार केला. वन्यजीव संवर्धनाला बाधा पोहोचणार नाही, अशा पद्धतीने, प्रकल्प उभारण्यासाठी सूचना केली आणि अटी-शर्तींसह चीन सीमेजवळील लडाख आणि सिक्कीम यासारख्या उंचावरील भागांत १७ संरक्षण पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी दिली. ◀(वृत्तसंस्था)

### राष्ट्रीय सुरक्षा विचारात घेऊन मंजुरी



»» संरक्षणाशी संबंधित या प्रकल्पांच्या मंजुरीबाबत, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी 'एक्स'वर म्हटले की, हे प्रकल्प राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक आवश्यकता लक्षात घेऊन मंजूर करण्यात आले. वन्यजीव संवर्धन उपाय आणि पर्यावरण संरक्षण पूर्णपणे विचारात घेतले गेले आहे. हे सर्व लागू कायद्यांनुसार केले गेले. प्रकल्पांमध्ये नवीन सीमा चौक्या, ब्रिगेड मुख्यालय, दारुगोळा साठवणूक आणि प्रशिक्षण सुविधांचे बांधकाम समाविष्ट आहे. ■

### बैठकीत ७० प्रस्तावांवर चर्चा

»» बैठकीत, समितीने संरक्षित क्षेत्रे, वन्यजीव अभयारण्ये, व्याघ्र प्रकल्प आणि पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांभोवती सार्वजनिक उपयुक्तता सेवा आणि पायाभूत सुविधा विकासाशी संबंधित ७० प्रस्तावांवर चर्चा केली. पर्यावरणीय संवेदनशीलता, वैधानिक आवश्यकता आणि स्थानिक समुदायांसाठी आवश्यक सेवा सुनिश्चित करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन या प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली. ■

## ओमानमध्ये परदेशी नागरिकांना नोकरी नाही

◆ **मस्कत, २० जानेवारी**

ओमानमधील नागरिकांना नोकरीसाठी प्राधान्य मिळावे यासाठी तेथील सरकारने २०० प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये परदेशी नागरिकांना बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. ओमानने देशातील खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांसंदर्भात नवे धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार ओमानमध्ये बाहेरील देशांतील स्थलांतरितांसाठी नियम लागू केले. नव्या नियमांनुसार विदेशांमधील नागरिकांना २०० प्रकारच्या नोकऱ्या करण्यास बंदी घातली आहे. यापुढे ओमानने बंदी घातलेल्या कामांसाठी बाहेरील देशातील व्यक्तीला नोकरी मिळणार नाही तसेच त्यांना व्हिसा नाकारण्यात येणार असल्याची माहिती ओमानच्या परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे. निर्णयाचा परिणाम तिथे नोकरीसाठी जाणाऱ्यांवर होणार आहे. ओमानमध्ये मोठ्या संख्येने काम करणाऱ्या भारतीयांना याचा फटका बसेल. ◀(वृत्तसंस्था)



दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ चाललेल्या 'मंडला-मकरविलक्कू तीर्थयात्रा हंगामाची सांगता झाल्यानंतर केरळच्या पतमथिट्टा जिल्ह्यातील शबरीमाला मंदिराचे द्वार बंद करून मंगळवारी बाहेर पडताना पुजारी

# अजमेर दर्ग्यात शिवमंदिराचा दावा

## न्यायालयाने स्वीकारली याचिका

◆ **अजमेर, २० जानेवारी**

महाराणा प्रताप सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजवर्धन सिंह परमार यांनी असा दावा केला आहे की, अजमेरला सुफी संत ख्वाजा मोइनुद्दीन हसन चिश्ती यांच्या दर्ग्यात शिवमंदिर आहे.

सुप्रीम कोर्टाचे वकील एपी सिंग यांच्यामार्फत दिवाणी न्यायालयात दाखल केलेली ही याचिका नुकत्याच झालेल्या सुनावणीदरम्यान स्वीकारण्यात आली. परमार आणि एपी सिंग यांनी सांगितले की, न्यायालयाने राजस्थान सरकारच्या पुरातत्त्व विभाग, केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालय आणि पर्यटन मंत्रालयाला नोटीस बजावली आणि पुढील सुनावणी २१ फेब्रुवारी रोजी निश्चित केली.

या याचिकेत दर्ग्यात शिवमंदिराच्या दाव्याला समर्थन देणारे महसूल दस्तऐवज सादर केले आहेत. त्यांचा असा दावा आहे की, अयोध्या, काशी, संभल आणि सोमनाथप्रमाणेच, आक्रमणकर्त्यांनी पृथ्वीराज चौहान यांच्या अजमेर शहरातील महादेव मंदिर उद्ध्वस्त केले आणि तेथे दर्गा बांधला. ◀(वृत्तसंस्था)



# शबरीमाला सोने घोटाळा प्रकरणी ईडीची तीन राज्यांत छापेमारी

### २१ ठिकाणी कारवाई

◆ **बंगळुरू, २० जानेवारी**

शबरीमाला सोने चोरी प्रकरणातील मनी लॉण्ड्रिंग चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मंगळवारी तीन राज्यांमध्ये छापे टाकले. अधिकृत सूत्रांनी सांगितले की, केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडूमधील जवळपास २१ ठिकाणी बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींनुसार हे छापे टाकले आहेत. संघीय तपास संस्था बंगळुरूमधील मुख्य आरोपी उन्नीकृष्णन पॉटी आणि त्रावणकोर देवस्वम बोर्डाचे (टीडीबी) माजी अध्यक्ष ए. पद्मकुमार यांच्याशी संबंधित परिसरांची झडती घेत असल्याचे समजते.

केरळ पोलिसांच्या एफआयआरची दखल घेत ईडीने अलिकडेच पीएमएलएअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या या प्रकरणाची केरळ उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली राज्याच्या विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) आधीच चौकशी केली जात आहे. ही चौकशी अनेक अनियमिततांशी संबंधित आहे, ज्यात अधिकृत गैरवर्तन, प्रशासकीय त्रुटी आणि भगवान अयप्पा मंदिरातील विविध कलाकृतींमधून सोने चोरण्याचा गुन्हेगारी कट रचण्यात आला आहे.

**मुख्य पुजाऱ्याला ताब्यात घेऊन चौकशी**

शबरीमला येथील भगवान अय्यप्पा मंदिरातील सोन्याच्या अपहाराची चौकशी करणाऱ्या एसआयटीने काही दिवसांपूर्वी मंदिराच्या मुख्य पुजाऱ्याला ताब्यात घेतले. ◀(वृत्तसंस्था)

### हे संपूर्ण प्रकरण काय आहे?

»» हे प्रकरण २०१९ मध्ये गर्भगृह, दाराच्या चौकटी आणि द्वारपालकाच्या मूर्तींमधून सोन्याचा मुलामा देण्यासाठी काढलेले सोन्याचे पत्रे आणि दागिने पूर्णपणे परत न केल्याच्या आरोपावर केंद्रित आहे. सोन्याचा काही भाग तांबे किंवा इतर निकृष्ट धातू म्हणून गहाळ झाला असावा, असे सांगून अपहार झाला. विविध टप्प्यांवर तयार केलेल्या कागदपत्रे, इन्व्हेंटरी लिस्ट आणि पडताळणी अहवालांमध्ये ही माहिती समोर आली आहे. केरळ उच्च न्यायालय या प्रकरणाचे बारकाईने निरीक्षण करत आहे आणि पवित्र मंदिराच्या मालमत्तेशी संबंधित प्रकरणांमध्ये जबाबदारी नसल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. ■

# अक्षयकुमारच्या वाहनाचा अपघात, एक जखमी



अभिनेता अक्षयकुमारच्या सुरक्षा ताफ्यातील अपघातग्रस्त झालेली कार

◆ **मुंबई, २० जानेवारी**

मुंबईतील जुहू परिसरात बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमारच्या सुरक्षा ताफ्यातील एका कारने ऑटोरिक्षाला धडक दिली. यानंतर तीन चाकी वाहन दुसऱ्या वाहनाला धडकले. यामध्ये एक जण जखमी झाला, असे पोलिसांनी सांगितले.

सोमवारी रात्री जुहूमधील मुक्तेश्वर रोडजवळ ही घटना घडली. विमानतळावरून पत्नी ट्विंकल खन्नासोबत घरी परतणाऱ्या कुमारची कार अपघातात सहभागी नव्हती. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ऑटोरिक्षाला एका वेगाने येणाऱ्या मर्सिडीज कारने धडक दिली. यामुळे कुमारच्या सुरक्षा ताफ्यातील वाहन त्याला धडकले.

अपघातात ऑटोरिक्षा चालक जखमी झाला आणि त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. जुहू पोलिसांनी मर्सिडीज चालकाविरुद्ध बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे गाडी चालवल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे. ◀(वृत्तसंस्था)

# नऊ राज्यांत वादळ, पावसाचा अलर्ट

◆ **नवी दिल्ली, २० जानेवारी**

उत्तर भारतात थंडी कमी झाल्यानंतर, भारतीय हवामान विभागाने नऊ राज्यांसाठी वादळ आणि मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. २२ ते २५ जानेवारी दरम्यान उत्तरप्रदेश, हिमाचलप्रदेश, हरयाणा, उत्तराखंड, राजस्थान, पंजाब, दिल्ली, बिहार आणि लडाखमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, या काळात ४० किलोमीटर प्रती तास वेगाने वारे वाहू शकतात. हिमाचल प्रदेशात विजांसह पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पंजाबमध्ये २२ ते २५ जानेवारी दरम्यान हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये २० आणि २१ जानेवारी रोजी मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. दिल्लीमध्ये मंगळवारी सकाळी तापमान सुमारे ८ अंश सेल्सिअसवर होते, तर दुपारी तेजस्वी सूर्यप्रकाश राहिला.

हवामान खात्याने २३ जानेवारीपासून राजधानीत हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा दिला आहे. पुढील तीन-चार दिवस सकाळी दाट धुके पडण्याची शक्यता आहे. यामुळे थंड हवेपासून दिलासा मिळेल. उत्तरप्रदेशातील हवामान वेगाने बदलत आहे. बाराबंकी, कानपूर, रायबरेली आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये धुके कमी झाले आहे, तरीही ग्रामीण भागात हलके ते मध्यम धुके दिसून येत आहे. दिवसाचे तापमान आता २० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त आहे. वाराणसीमध्ये दिवसभर स्वच्छ हवामान राहील आणि सूर्यप्रकाश पडेल. पश्चिम उत्तरप्रदेशात सकाळी धुके होते. ◀(वृत्तसंस्था)

## कोट्यवधीची चांदी जप्त, एकाला अटक

◆ **रांची, २० जानेवारी**

झारखंडच्या गिरीडीह जिल्ह्यातून एका व्यक्तीकडून १.७८ कोटी रुपये किमतीची चांदी जप्त केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली.

पोलिसांनी सोमवारी राजधनवार पोलिस ठाण्याच्या हद्दीत वाहन तपासणी मोहिमेदरम्यान त्याला पकडले. एक गुन्हेगारी टोळी चांदीचा मोठा साठा विकण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती मिळाली होती. वाहन तपासणी मोहिमेदरम्यान, पोलिसांनी हजरत अन्सारीला अटक केली तसेच साठा जप्त केला. ◀(वृत्तसंस्था)

# कर्नाटकचे 'डीजीपी' रामचंद्र राव निलंबित

## अश्लील व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर कारवाई

◆ **बंगळुरू, २० जानेवारी**

कर्नाटकचे पोलिस महासंचालक (डीजीपी) (नागरिक हक्क अंमलबजावणी) यांना निलंबित करण्यात आले आहे. सोमवार त्यांचा एक अश्लील व्हिडीओ समोर आला होता, त्यानंतर सरकारने त्यांच्यावर कारवाई केली आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये के. रामचंद्र राव अनेक महिलांसोबत आक्षेपार्ह अवस्थेत दिसत होते. व्हिडीओ समोर आल्यानंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले होते की, के. रामचंद्र राव दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल.



व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर रामचंद्र राव गृहमंत्री जी. परमेश्वर यांना भेटायला पोहोचले, परंतु त्यांची भेट होऊ शकली नाही. गृहमंत्र्यांच्या घरातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी पत्रकारांना सांगितले होते की, व्हिडीओ खोटा आणि मॉर्फ केलेला आहे. पुढील कारवाईबाबत वकिलांशी बोलणार आहेत.

**आरोप फेटाळले**

मंत्र्यांच्या घराबाहेर पत्रकारांशी बोलताना के. रामचंद्र राव म्हणाले की, मी पण विचार करत आहे की हे कसे आणि कधी झाले आणि कोणी केले. या काळात काहीही होऊ शकते. मला याबद्दल कोणतीही माहिती नाही. पत्रकारांनी विचारले की, हा जुना व्हिडीओ आहे का, तेव्हा ते म्हणाले- जुना म्हणजे, आठ वर्षांपूर्वी जेव्हा मी बेळगावीमध्ये होतो. ते गृहमंत्र्यांना समजावून सांगतील की चुकीची माहिती पसरवली जात आहे. ◀(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### प्रसाद ओक आता होणार सासरेबुवा



**मुंबई :** मनोरंजन जगतात सध्या लग्नसराईचा हंगाम दिसतो आहे. अनेक कलाकारांच्या घरी सनई चौघडे वाजताहेत. नुकतेच आंदेश बांदेकरांच्या लेकाचे लग्न झाले. आता मराठीतील प्रसिद्ध जोडी प्रसाद ओक आणि मंजिरी यांचा मुलगा लवकरच बोहल्यावर चढणार आहे. प्रसादचा मोठा मुलगा सार्थकचा साखरपुडा पार पडला. याचे फोटो समाज माध्यमांवर व्हायरल होत आहेत. सार्थकच्या होणाऱ्या बायकोचे नाव रितू असे आहे. या साखरपुड्याला कलाजगतातील मंडळींनीही हजेरी लावली. त्यात अमृता खानविलकर, स्वप्नील जोशी यांचाही समावेश होता. अमृतानेच साखरपुड्याचे फोटो शेअर करीत ही माहिती जगजाहीर केली आहे. प्रसाद आणि मंजिरी यांना दोन मुले आहेत. मोठ्याचे नाव सार्थक तर, धाकट्याचे मयंक असे आहे. सार्थकने जर्मनीतून त्याचे शिक्षण पूर्ण केले आहे. ■


### रश्मिकाचा 'सिकंदर'बाबत धक्कादायक खुलासा



**मुंबई :** सलमान खान आणि रश्मिका मंदाना अभिनीत सिकंदर हा चित्रपट २०२५ मधील सर्वांत मोठा फ्लॉप ठरला. चित्रपटाचा खर्चही वसूल होऊ शकला नाही. आता चित्रपटाची नायिका रश्मिका मंदानाने चित्रपटाच्या अपयशावर भाष्य केले आहे. ती म्हणाली, आधी जी पटकथा आम्हाला ऐकवण्यात आली ती नंतर वेगळीच निघाली. चित्रपटांमध्ये असे अनेकदा घडते. जेव्हा तुम्ही ऐकता, तेव्हा ती एक वेगळी कथा असते. पण चित्रपट बनवताना, अभिनय, संपादन आणि प्रदर्शनाच्या वेळेनुसार गोष्टी बदलतात. एरवी ही खूप सामान्य गोष्ट आहे. सिकंदरसोबतही असेच घडले. अख्खी स्क्रिप्ट बदलल्यानेच कदाचित चित्रपटाचा अपेक्षित प्रभाव दिसला नाही. ■

### अक्षयच्या हातातून निसटला 'रेस-४'

**मुंबई :** 'धुरंधर' चित्रपटातील रहमान डकैतची भूमिका गाजवणारा अक्षय खन्ना अनेकांच्या आवडत्या कलाकारांच्या यादीत अव्वल स्थानी जाऊन बसला आहे. या भूमिकेनंतर त्याने स्वत:च्या बाबतीत काही धोरणात्मक बदल केले. त्याच्या अटीवर तो चित्रपट निवडू लागला आहे. मात्र, त्याचा त्याला फटकाही बसतो आहे. 'दृश्यम-३'मधून त्याचा पत्ता कट झाल्यानंतर आता 'रेस-४'ही त्याच्या हातातून निसटल्याचे बोलले जात आहे. खुद्द निर्माते रमेश तौरानी यांनी अक्षय खन्ना यात दिसणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्याच्यासाठी आम्ही चित्रपटाचे कथानक बदलू शकत नाही. त्यामुळे आम्ही त्याला विचारणाही केली नाही, असे तौरानी यांनी सांगितले. आता अक्षयच्या अटी निर्माता, दिग्दर्शकांना डोईजड वाटताहेत, अशी जोरदार चर्चा आहे. असे असले तरी अक्षय नेहमीप्रमाणे शांत असून, अतिशय वेचक पद्धतीने चित्रपटांची निवड करतोय. ■



# आठवणींचे क्षण कॅमेराबंद करणारी 'कोडॅक' कंपनी बंद होण्याच्या मार्गावर




◆ **नवी दिल्ली, २० जानेवारी**

एकेकाळी कोडॅक कॅमेऱ्याने आपल्या विश्वसनीयतेने संपूर्ण बाजार व्यापला होता. पण, आता कोडॅक अनेकांसाठी फक्त एक आठवण बनून राहिली आहे. जगातील पहिल्या डिजिटल कॅमेऱ्याचा शोध लावणाऱ्या कोडॅकचे अस्तित्व याच डिजिटल कॅमेरामुळे संपुष्टात आले. आता कंपनी आर्थिक संकटाच्या फेऱ्यात अडकली असून, तब्बल ५०० लाखांचे कर्ज फेडण्यास असमर्थ आहे.

जॉर्ज ईस्टमन नावाच्या व्यक्तीने कोडॅकचा पाया घातला होता. त्यांना फोटोग्राफी इतकी सोपी करायची होती की, प्रत्येक सामान्य व्यक्तीला वापरता येता येईल आणि त्यांनी आपले स्वप्न पूर्णही केले. १८८८ मध्ये त्यांनी 'तुम्ही फक्त क्लिक करा, बाकी सगळे आम्ही करू' टॅगलाईनसह पहिला कॅमेरा सादर केला. कोडॅक लवकरच एक जागतिक ब्रँड बनला. १९९० च्या दशकापर्यंत कोडॅकचे वर्चस्व इतके वाढले होते की त्यांनी अमेरिकेतील ९० टक्के चित्रपट बाजारावर नियंत्रण मिळवले होते.

कोडॅकच्या प्रयोगशाळेत काम करणाऱ्या अभियंत्या स्टिव्ह सॅसनने १९७५ मध्ये क्रांती घडवणारी एक विचित्र मशीन तयार केली. टोस्टरच्या आकाराचे एक विचित्र मशीन बनवले, ज्यामध्ये असंख्य तारा होत्या आणि खूप जड होते. हा जगातील पहिला डिजिटल कॅमेरा होता ज्याने ब्लॅक अॅण्ड व्हाईट फोटो काढले आणि कॅसेट टेपमध्ये सेव्ह केले जायचे. पण, डिजिटल कॅमेरा नाकारणे ही कोडॅकची सर्वांत मोठी आणि ऐतिहासिक चूक होती. ◀(वृत्तसंस्था)




### कोडॅकला उशिरा लक्षात आली चूक

»» कोडॅकने आपली चूक खूप उशिरा सुधारण्याचा प्रयत्न केला. डिजिटल मार्केटमध्ये प्रवेश करण्यासाठी लाखो डॉलर्स खर्च केले, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. आज कोडॅक पूर्णपणे नाहीसे झालेले नाही, पण आता पूर्वीसारखे राहिलेले नाही. कोडॅक आता एक छोटी कंपनी आहे जी औषधे, छपाई आणि काही विशेष रसायने बनवते. ■

## तस्करी केलेले १८० टन डिझेल जप्त; दोघांना अटक

◆ **मुंबई, २० जानेवारी**

मुंबई कस्टम्सने समुद्रात एका मालवाहू बार्ज पकडून पाण्याच्या टाक्यांमध्ये लपवून ठेवलेले १८० टनांपेक्षा जास्त तस्करीचे डिझेल जप्त केले, अशी माहिती मंगळवारी अधिकाऱ्यांनी दिली. जहाज मालकाला आणि त्याच्या मुलाला अटक करण्यात आली आहे.

गुप्त माहितीच्या आधारे, कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी रविवारी एमव्ही टीना-४ या मालवाहू जहाजावर छापा टाकला. या बार्जमध्ये विदेशी जहाजांमधून तस्करी केलेले हाय-स्पीड डिझेल आढळून आले. ते सीमाशुल्क चुकवण्यासाठी स्थानिक किनारी बोटी आणि कारखान्यांना पुरवले जाणार होते. मास्टर, अभियंता आणि शिपिंग लाइनच्या अधिकृत प्रतिनिधीकडून नोंदवलेल्या जबाबांवरून कार्यपद्धती स्पष्ट झाली. एक पाण्याची टाकी इंडियन रजिस्टर ऑफ शिपिंगने मंजूर केलेल्या डिझाईनचा भाग नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# फडणवीसांच्या 'ब्रॅण्ड महाराष्ट्र'चा डंका!

नेतृत्वाविषयीच्या अनेकांच्या कल्पना फार भाबड्या असतात. व्यासपीठावरून उच्चरवाने बोलणे, कार्यकर्त्यांना उपदेश करीत फिरणे, टोमणे मारणे, विरोधकांवर सतत टीकेचा भडिमार करणे यालाही अनेक लोक नेतृत्व समजतात. तसे अनेक नेते महाराष्ट्रात आहेत आणि देशातही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मात्र अशा पठडीत बसणारे नाही. ते सुशिक्षित आणि अनुभवी आहेत. शिवाय, शासन-प्रशासनात मुरलेले आहेत. राजकारण करताना ते खटाला खट आहेतच; पण कामातही वाघ आहेत. एखाद्या राज्याचा विकास कसा करायचा असतो, हे त्यांनी अनेक प्रकल्पांतून दाखवून दिले. मोजकी उदाहरणे द्यायची तर समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू, कोस्टल रोड इत्यादी. फडणवीसांचा भर २०१४ मध्ये ते मुख्यमंत्री झाल्यापासून महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्यावर राहिला. त्यांच्या काळात केवळ मुंबई-पुणे नव्हे तर नागपूर-गडचिरोलीपर्यंतही भरभक्कम गुंतवणूक आली. अनेक उद्योग सुरू झाले. रोजगार निर्माण झाले. आता त्यांच्या ताज्या दावोस दौऱ्यानंतर गुंतवणुकीतून होणाऱ्या रोजगार निर्मितीला अधिक बळ मिळणार आहे. लाखो कोटींचे करार झाले आहेत. त्यांचे फायदे नजीकच्या भविष्यात दिसतील.

नेतृत्व म्हणजे संधी ओळखणे, योग्य वेळी योग्य निर्णय घेणे आणि संपूर्ण यंत्रणेला एकाच दिशेने कार्यरत करणे. ते फडणवीसांनी करून दाखविले. महाराष्ट्र आज ज्या टप्प्यावर उभा झालेला आहे, ते पाहिले तर एक गोष्ट निर्विवादपणे सिद्ध होते की, प्रशासकीय शिस्त, नियोजन व दूरदृष्टीतून फडणवीसांनी महाराष्ट्राच्या विकासात फार मोठे योगदान दिले आहे. कधी नव्हे तो ब्रॅण्ड महाराष्ट्र त्यांनी तयार केला आहे आणि तो देखील जागतिक पटलावर! भारतामध्ये अनेक राज्ये गुंतवणुकीसाठी स्पर्धा करीत आहेत. प्रत्येकाकडे आकर्षक सवलती, जमिनीचे दर, कर-सवलती यांची यादी आहे. या साऱ्यांत महाराष्ट्र एका वेगळ्याच पातळीवर उभा आहे. ते वेगळेपण आहे महाराष्ट्राच्या विश्वासार्हतेत. ही विश्वासार्हता अचानक निर्माण झालेली नाही. ती फडणवीसांच्या निर्णयक्षमतेतून, दूरदृष्टीतून निर्माण झालेली आहे. उद्योगविश्वाला सर्वांत जास्त भीती असते ती अनिश्चिततेची. आज मंजुरी, उद्या आडकाठी; आज स्वागत, उद्या नियमांत बदल असे घडत राहिले तर उद्योजक त्यापासून दूर राहतात. राजकारण आणि प्रशासन यांच्यातील सीमारेषा स्पष्ट ठरवलेल्या असल्यामुळे फडणवीसांच्या धोरणात सातत्य राहिले. भारताच्या औद्योगिक नकाशावर महाराष्ट्र नेहमीच अग्रस्थानी राहिला आहे. पण फडणवीस मुख्यमंत्री होईपर्यंत साराच कारभार संथ गती होता हे वास्तव. फडणवीसांनी देशी आणि विदेशी गुंतवणुकीचे महत्त्व ओळखले आणि ते कामाला लागले. दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसारख्या जागतिक व्यासपीठावर महाराष्ट्राची जी प्रतिमा फडणवीसांनी गेल्या काही वर्षांत निर्माण केली, ती भारतातील कोणत्याही राज्याला हेवा वाटेल अशीच आहे. एकेका दौऱ्यात लाखो कोटींच्या गुंतवणूक करारांवर शिक्कामोर्तब होणे हा योगायोग नसतो. त्यासाठी भरपूर तयारी लागते. अभ्यास लागतो. शिवाय, त्या राज्याच्या नेत्याबद्दल विश्वास वाटावा लागतो. हाच विश्वास फडणवीस यांच्या नेतृत्वाचा गाभा आहे. महत्त्वाची बाब म्हणजे फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात येत असलेली गुंतवणूक मोजक्या क्षेत्रांपुरती नाही. हरित ऊर्जा, अन्नप्रक्रिया, पोलादनिर्मिती, आयटी-आयटीईएस, डेटा सेंटर्स, ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाजबांधणी, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर अशी ही यादी फार मोठी होईल. पारंपरिक उद्योगांना बळ देतानाच नव्या तंत्रज्ञानावर आधारित उद्यमांना खुले आमंत्रण देणारी ही दृष्टी राज्याला भविष्यातील विकासासाठी सज्ज करणारी आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे फडणवीसांच्या नेतृत्वातील विकासाचा हा प्रवास मुंबई-पुण्यापुरता मर्यादित नाही. पालघर, रत्नागिरी, गडचिरोली, अहिल्यानगरसारख्या भागांपर्यंत उद्योग पोहोचत आहेत. ही फक्त आर्थिक विकेंद्रीकरणाची प्रक्रिया आहेच. शिवाय, तो विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. उद्योग जिथे जातात, तिथे रोजगार निर्मिती होते आणि रोजगार जिथे निर्माण होतात, तिथे स्थलांतर थांबते. कुणीही आपली गुंतवणूक बेभरवशाच्या ठिकाणी करीत नाही. प्रत्येक गुंतवणूकदाराला परतावा आणि नफा हवा असतो. गुंतवणुकीच्या ठिकाणी राजकीय, सामाजिक शांतता व स्थैर्य असावे लागते. राज्याचे अर्थकारण शिस्तीत असावे लागते. शिवाय, नेतृत्वही विश्वासार्ह आणि नव्या काळातील नव्या गरजांशी जुळवून घेणारे असावे लागते. या साऱ्या अटी-शर्ती फडणवीस पूर्ण करतात. सरकार हा आपल्यासाठी अडथळा नव्हे तर भागीदार आहे, असे आश्वासन त्यांच्या नेतृत्वातून गुंतवणूकदारांना मिळते. यातून गतिमान होणाऱ्या विकासाच्या प्रक्रियेचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम असतो रोजगारनिर्मिती. लाखो कोटींच्या गुंतवणुकीसोबत लाखो नोकऱ्या निर्माण होतात तेव्हा समाजाचे अर्थकारण बळकट होते. त्यातून क्रयशक्ती वाढते, बाजारपेठ सशक्त होते, गुंतवणूक वाढते, बचतही वाढते. यातून समाजात आर्थिक स्थैर्य निर्माण होते. विशेषतः दुर्गम आणि मागास भागांत उद्योग जातात, तेव्हा त्यातून केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक व मानसिक बदल मोठ्या प्रमाणात घडतो. जागतिक अर्थकारणातील सध्याचा काळ बराच अस्थिरतेचा आहे. जागतिक स्तरावर आर्थिक अनिश्चितता, युद्धे, पुरवठा साखळीवरील ताण, तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल अशा साऱ्या पृष्ठभूमीवर महाराष्ट्र हे एक स्थिर, विश्वासार्ह आणि भविष्याभिमुख राज्य म्हणून उभे राहते. कारण निर्णय घेताना केवळ आजचा विचार न करता भविष्याचा वेध घेतला जातो. जागतिक अर्थकारणातील अनिश्चिततेच्या काळातही महाराष्ट्र हे राज्य गुंतवणुकीसाठी सुरक्षित, स्थिर आणि आकर्षक पर्याय म्हणून उभे राहिले आहे. याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे धोरणात्मक स्पष्टता आणि निर्णायक नेतृत्व. उद्योगविश्वाला आज जे काही हवे आहे, सोयी-सवलतींसह स्थैर्य, वेग आणि विश्वास, ते सारे महाराष्ट्रात मिळते. रिअल इस्टेट, लॉजिस्टिक्स, आयटी, डेटा सेंटर्स आणि नागरी पायाभूत सुविधांमध्ये होत असलेली अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक ही एखाद्या सेक्टरची भरभराट नव्हे. संपूर्ण शहरी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना त्यामुळे होणार आहे. रोजगारनिर्मिती केवळ नोकऱ्यांपुरती मर्यादित राहत नाही. सेवा क्षेत्र, लघुउद्योग, स्टार्टअप्स आणि कौशल्याधारित रोजगारांची साखळी तयार होते. हे 'मल्टिप्लायर इफेक्ट'चे अर्थशास्त्र फडणवीस सरकारने अचूक ओळखलेले आहे आणि दावोसमध्ये ब्रॅण्ड महाराष्ट्रला मिळालेला प्रतिसाद हा त्याचा परिणाम आहे. महाराष्ट्राच्या एका टोकाला असलेल्या गडचिरोलीसारख्या भागात मोठे पोलाद प्रकल्प आले, येताहेत. या भागात दशकानुदशके विकासाचा अर्थ केवळ घोषणांपुरता मर्यादित होता. आता तिथे प्रत्यक्ष उद्योग सुरू झाले. हे वातावरण आत्मविश्वास निर्माण करणारे आहे. ''आपल्याही भागात संधी आहे'', ही भावना त्या परिसराची मानसिकता बदलणारी आहे. निर्णय प्रक्रिया वेगवान, उत्तरदायी आणि पारदर्शक असावी, हा आग्रह फडणवीस नेहमीच धरतात. ''कोणाकडे जायचं?'' हा प्रश्न गुंतवणूकदाराला पडू नये याची ते काळजी घेतात आणि त्यासाठी 'मैत्री' (महाराष्ट्र इंडस्ट्री, ट्रेड ॲण्ड इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटेशन) सारखी यंत्रणा तयार करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्याचा डंका वाजतोय, त्या ब्रॅण्ड महाराष्ट्रचा हा महत्त्वाचा घटक. यातील आणखी एक मुद्दा असा की, फडणवीस यांचे नेतृत्व उद्योगकेंद्री असले तरी ते मानवी घटक विसरत नाहीत. चांगल्या पगाराच्या नोकऱ्या, कौशल्य विकास, स्थानिक युवकांना संधी या सगळ्यांवर त्यांचा भर असतो. दावोसमध्येही त्यांनी तेच दाखविले. उद्योग वाढले, पण त्याचा फायदा स्थानिक समाजाला झाला नाही तर तो विकास टिकाऊ ठरत नाही ही जाणीव त्यांच्या धोरणांत स्पष्टपणे दिसते. दीर्घकालीन परिणाम करणारे निर्णय घेणे ही त्यांची शैली आहे. उद्योग, पायाभूत सुविधा, शहरी नियोजन या क्षेत्रांत घेतलेले निर्णय वर्तमानासाठी तर महत्त्वाचे आहेत. पुढच्या पिढ्यांना त्यांचा फायदा होणार आहे. त्यामुळेच फडणवीसांचे नेतृत्व हे वर्तमानापुरते न राहता ते भविष्यवेधी ठरते. फडणवीसांच्या ब्रॅण्ड महाराष्ट्रचा आज जो डंका वाजतोय तो त्यामुळेच!

## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# विमानतळ बाजारपेठेला नवे धुमारे

भारतातील विमानतळांसाठी सीट अपग्रेड आणि लाऊंजसह पूरक उत्पन्न आता नफ्याचे एक प्रमुख साधन बनले आहे. ते विमानतळांना चैतन्यपूर्ण ग्राहक केंद्रांमध्ये रूपांतरित करत आहे आणि हवाई प्रवासाचे भविष्य नव्याने परिभाषित करत आहे. आता तुम्ही दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल तीनवर असाल, तर उशीर होण्याचे कारण कदाचित डिपार्चर गेट नसेल, तर नवीन शनेल बुटीक असेल. हैदराबादमध्ये विमानात चढण्यापूर्वी गॉर्डन रॅमसे बर्गर खाण्याचा मोह होऊ शकतो. संपूर्ण भारतात याच पद्धतीने विमानप्रवासाची नव्याने आखणी केली जात आहे. आता विमानप्रवास केवळ गंतव्यस्थानी पोहोचण्यापुरता मर्यादित नाही; तर प्रवासी मधल्या वेळेत तास कसे घालवतात, यालाही महत्त्व आले आहे आणि याच ठिकाणी एअरलाईन्स कंपन्या आणि विमानतळ प्रशासन कमाईच्या नव्या संधी शोधत आहेत. भारताच्या विमान वाहतूक उद्योगासाठी आता आकाशात नाही, तर जमिनीवर सर्वांत महत्त्वपूर्ण वाढ होत आहे. नॉन-तिकीट आणि गैर-विमानचालन महसूल प्रवाह हे या क्षेत्राचे सर्वांत मजबूत वाढीचे इंजिन बनले आहेत. तिकीट विक्रीमुळे प्रवासी येतात; परंतु सीट अपग्रेड, लाऊंज, प्रीमियम जेवण, जाहिरात, ब्रॅण्डेड किरकोळ विक्री आणि विशेष अनुभव यासारख्या अतिरिक्त सेवांमुळे नफ्याचे प्रमाण वाढत आहे. एअरलाईन्स आणि विमानतळ चालक या उच्च-नफ्याच्या प्रवाहावर मोठी खेळी करत आहेत. महसूल निर्मितीच्या पद्धतीत ही खेळी एक स्पष्ट बदल दर्शवत आहे. जागतिक स्तरावर विमान वाहतूक उद्योगाच्या नफ्यासाठी पूरक महसूल दीर्घकाळापासून महत्त्वाचा मानला जात आहे.

आजघडीला हिथ्रो, चांगी आणि दुबईसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांवर ४० ते ५० टक्के महसूल नॉन-तिकीट स्रोतांमधून येतो. भारतही यात मागे नाही. विमानतळ आणि एअरलाईनच्या उत्पन्नात पूरक सेवांचे योगदान २५ ते ३५ टक्के आहे. उद्योग अंदाजांनुसार, डिजिटायझेशन आणि प्रीमियम अनुभवांची वाढती मागणी या बदलाला गती देत आहे. प्रवाशांची संख्या वाढत असतानाही भाड्याचे मार्जिन मोठ्या प्रमाणात स्थिर राहिल्याने विमान कंपन्या सीट विक्रीपलीकडे जाऊन नवनवीन प्रयोग करत आहेत. सोयी, निवड आणि अनुभवाचे मुद्रीकरण पुढील दशकाची व्याख्या करेल. ॲप्स, डायनॅमिक प्राईसिंग आणि ऑफर्समुळे एअरलाईन्स आणि विमानतळांना प्रवाशांच्या खर्चाचा मोठा वाटा मिळवणे शक्य होते. त्याच वेळी त्यांना वैयक्तिककृत सेवाही देता येतात. भारतात हा बदल दोन पातळ्यांवर होत आहे. विविध एअरलाईन्स तिकीट विक्रीपलीकडे जाऊन आपल्या सेवांचे जाळे सर्व्हिस इकोसिस्टिममध्ये रूपांतरित करत असून विमानतळे रिटेल विक्री, खानपान सेवा आणि मीडिया यांचे हब बनत आहेत. 'एअर इंडिया'मध्ये टाटा समूह करत असलेला कायापालट नवी विमाने आणि नवीन ब्रॅण्डिंगपुरता मर्यादित नाही. ही एअरलाईन कंपनी प्रवाशांच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यातून कमाई करण्यासाठी एक मजबूत पूरक सेवा पोर्टफोलिओ तयार करत आहे. पूरक महसूल आर्थिक वर्ष २०२४ मधील १,७०० कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये २,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

२०२७ पर्यंत ही विमान कंपनी 'अपग्रेड प्लस,' 'सीट अपग्रेड', अतिरिक्त सामान, भाडे लॉक, प्रवास विमा, गिफ्ट कार्ड्स आणि 'व्हीएफएस ग्लोबल'च्या 'वनवास्को व्हिसा कॉन्सियरज'सारख्या सेवांद्वारे हा महसूल तिप्पट करण्याचे लक्ष्य ठेवत आहे. प्रवाशांना 'फ्लाय प्रायर' सारख्या सेवा आवडत आहेत. त्यामुळे जादा शुल्क देऊन त्याच दिवशी फ्लाईट बदलता येते. 'झिपअहेड'द्वारे प्राधान्य चेक-इन, टॅक्सी बुकिंगसाठी टाय-अप आणि टाटा एआयजी प्रवास विमा यांसारख्या इतर सेवा सोयीचे रूपांतर महसुलात करण्यासाठी डिझाईन केल्या आहेत. 'सीट निवडण्यापासून टॅक्सी बुकिंगपर्यंत प्रत्येक उत्पादन, ब्रॅण्डला प्रवाशांच्या निर्णय प्रक्रियेत टिकवून ठेवते', असे एका एअरलाईन अधिकाऱ्याने सांगितले. 'इंडिगो'चा मोठ्या प्रमाणावरील फायदा दर्शवतो की पूरक महसूल वाढ किती दूर जाऊ शकते. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मालवाहतूक, अतिरिक्त सामान आणि सीट निवडीमुळे त्याचा पूरक महसूल २०.७ टक्क्यांनी वाढून सात हजार ९४४ कोटी रुपयांवर पोहोचला. आर्थिक वर्ष २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये 'इंडिगो'ने २१ हजार ४११ कोटी रुपयांचे पूरक उत्पन्न नोंदवले. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ १४.२ टक्के इतकी होती आणि ती तिकीट महसूलवाढीपेक्षा जास्त होती. 'लाऊंज ॲक्सेस', प्राधान्य बोर्डिंग, प्रवास विमा आणि ६ई रिवार्ड्स रिडिम्प्शन हे 'इंडिगो'च्या कमी किमतीच्या विमान कंपनीकडून जीवनशैली ब्रॅण्डमध्ये होणारा बदल अधोरेखित करतात. पूरक सेवा आता दुय्यम व्यवसाय राहिलेल्या नाहीत. त्या नफ्याचे मुख्य इंजिन आहेत.

सध्या खाजगी विमानतळे एअरलाईन्सच्या धोरणाचे अनुकरण करत आहेत. गैर-विमानचालन महसूल आता त्यांच्या व्यवसाय मॉडेलचा केंद्रबिंदू बनला आहे. दिल्ली आणि हैदराबाद विमानतळांचे संचालन करणाऱ्या जीएमआर एअरपोर्ट्समध्ये गैरविमान वाहतूक (नॉन-एरो) उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ४३ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४७ टक्क्यांपर्यंत वाढले आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत १३ टक्क्यांनी वाढले. किरकोळ विक्री, ड्युटी-फ्री उत्पादनांची विक्री, खाद्य आणि पेय (एफ ॲण्ड बी) आणि इतर सेवा या वाढीमध्ये आघाडीवर आहेत. 'भारताचे विमान वाहतूक क्षेत्र विस्ताराच्या नवीन टप्प्यात प्रवेश करत असताना आम्हाला प्रवासी वाढ आणि खर्च या दोन्हीला चालना देणारे मजबूत अनुकूल घटक दिसत आहेत,' असे 'जीएमआर एअरपोर्ट्स'चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (वाणिज्य आणि विकास) राजेश अरोरा यांनी सांगितले. आम्ही केवळ पायाभूत सुविधांचे संचालक या भूमिकेतून विकसित होऊन एक वैविध्यपूर्ण ग्राहक मंच बनलो आहोत आणि विमानतळांना मूल्य प्रदान करणाऱ्या गंतव्यस्थानांमध्ये रूपांतरित केले आहे, असे ते म्हणाले. आठ विमानतळांचे संचालन करणाऱ्या 'अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड'ने (एएएचएल) आर्थिक वर्ष २०२५ मध्ये गैरविमान वाहतूक महसुलातून चार हजार ९२६ कोटी कमावले. हे उत्पन्न 'अदानी एअरपोर्ट्स'च्या एकूण उत्पन्नाच्या जवळपास निम्मे आहे.

एप्रिल मून रिटेल आणि मुंबई ट्रॅव्हल रिटेलसारख्या उपकंपन्या विस्तारणाऱ्या इन-हाऊस किरकोळ विक्री मॉडेलला चालना देत आहेत. अदानी समूह विविध टप्प्यांमधील शहरस्तरीय प्रकल्पांमध्ये चार अब्ज डॉलर्सची (सुमारे ३३ हजार कोटी रुपये) गुंतवणूक करत आहे. त्यापैकी जवळपास ७० टक्के रक्कम मुंबई आणि नवी मुंबई विमानतळांसाठी राखून ठेवण्यात आली आहे. यामध्ये प्रवासी, कर्मचारी आणि शहरातील ग्राहकांना सेवा देणाऱ्या वैयक्तिककृत, डेटा-आधारित किरकोळ व्यवसायावर भर दिला जात आहे. 'आम्ही संपूर्ण विमानतळ व्यवसायाचा ताबा घेण्याची आणि सर्व किरकोळ व्यवसाय स्वतःच चालवण्याची योजना आखत आहोत', असे 'अदानी एअरपोर्ट'चे सीईओ गौरव सिंग यांनी सांगितले. ही कंपनी पुढील वर्षापर्यंत आपल्या सर्व विमानतळांवरील स्वतःच्या ब्रॅण्डच्या ५० स्टोअर्सवरून ३०० हून अधिक स्टोअर्सपर्यंत विस्तार करत आहे. त्यात २७० किरकोळ आणि ४० फूड ॲण्ड बेव्हरेज आऊटलेट्सचा समावेश आहे. बंगळुरूचे केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ चालवणाऱ्या 'बंगळुरू इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड' (बीआयएएल)साठी महसुलाच्या ३५ टक्के वाटा 'नॉन-एरो' व्यवसायातून येतो. त्यात 'एफ ॲण्ड बी' लाऊंज, किरकोळ विक्री, ड्युटी-फ्री उत्पादनांची विक्री आणि जाहिरातींचा समावेश आहे. कंपनी पुढील पाच वर्षांमध्ये आपल्या किरकोळ व्यवसायाचा विस्तार ४० हजार चौरस मीटरवरून एक लाख चौरस मीटरपर्यंत वाढवण्याची आणि ५०० हून अधिक ब्रँड्स जोडण्याची योजना आखत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# 'नकार'ग्रस्त प्रशासन!

वेगवेगळ्या आजारांनी त्रस्त असलेल्यांना आपण व्याधिग्रस्त म्हणतो. अशा 'ग्रस्त' लोकांच्या मांदियाळीत कायमच चर्चेत राहणारे दोन 'ग्रस्त' म्हणजे प्रकल्पग्रस्त आणि पूरग्रस्त! दोघेही बाधित, मात्र दोघांच्या व्याख्या वेगळ्या, त्यामुळे त्यांच्या समाधानाचे मार्गही वेगळे! खरं तर यांना न्याय देण्याची जबाबदारी प्रशासन, शासनाची! पण सध्या हेच जबाबदारी झटकण्याच्या व्याधीने ग्रस्त झाले आहेत. प्रकल्पग्रस्त की पूरग्रस्त या दुविधेत प्रशासन असले तरी शेकडो ग्रामस्थ मात्र मरणयातनेत जगत आहेत.

तोडगा काढला तर सर्वच समस्यांवर निघू शकतो. त्यासाठी तशी मानसिकता असायला हवी. विशेष करून प्रशासनातील अधिकारी कोणत्या मानसिकतेने आपल्या जबाबदारीचे निर्वहन करतात, त्यावर बरेच काही अवलंबून असते. ते माझे काम नाही किंवा ती जबाबदारी माझी नाही, अशी भावना जेथे आली, तेथे बट्ट्याबोळ झाल्याशिवाय राहत नाही. सध्या अशाच प्रशासकीय जबाबदारीच्या दायित्वाच्या फेऱ्यात गोसीखुर्द प्रकल्पाच्या बॅकवॉटरमुळे बाधित कारधा गावातील लोक अडकले आहेत. नदी काठावर त्यांचं गाव आहे. अनेक वर्षांपासून त्यांचे वास्तव्य तेथे आहे. आधी हीच नदी त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन होती. पण गोसीखुर्द प्रकल्प झाला आणि त्याच्या बॅकवॉटरचा फटका गावातील घरांना बसू लागला. कायम तुडुंब भरून राहत असलेल्या नदीमुळे गावातील घरांना ओल येऊ लागली. भिंती ओल्या, जमीन ओली, भिंतीला पाण्यामुळे जाणारे तडे ही स्थिती कायम राहत असताना वर्षातून एक दोनदा येणारा पूर यात भर घालणारा असाच आहे. पूर ही नैसर्गिक आपत्ती ठरावीक काळापुरती



असल्याने त्यावर तोडगा काढून स्थानिक प्रशासन मोकळे होते. पण कायम पाचवीला पुजलेला बॅकवॉटरच्या पाण्याचा त्रास तर जगणे कठीण करणारा आहे. सततच्या या त्रासाला कंटाळून ग्रामस्थांनी पुनर्वसनाची मागणी केली, तीही प्रकल्पग्रस्त म्हणून! तांत्रिकदृष्ट्या हीच मागणी योग्य असल्याचे प्रशासनातील काही जण मानत असले तरी ज्यांना यासाठी पुढाकार घ्यावयाचा आहे, त्यांना या बाधितांना प्रकल्पग्रस्त म्हणून घेण्याचे धाडस दाखविण्याची इच्छा नाही!

नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीने विस्थापित होत असलेल्यांना प्रकल्पग्रस्त संबोधले जाते. कारधा गावातील ३५६ घरांवर ओढवलेले संकट हे प्रकल्पग्रस्तांच्याच व्याख्येत मोडते. कारण पूर एकदा येतो, पण प्रकल्पाचे पाणी बाराही महिने साठून राहत असल्याने त्रास सहन करावा लागतो. अशावेळी यांचे विस्थापन होणे गरजेचे आहे. पूरग्रस्त आणि प्रकल्पग्रस्त यांना मिळणारे लाभही वेगवेगळे आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या व्याख्येत कारधावासी मोडले तर त्यांची जबाबदारी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला म्हणजे पर्यायाने जलसंपदा विभागाला घ्यावी लागणार आहे. आज हीच जबाबदारी घेण्यास संबंधित विभाग तयार नाहीत. कित्येक वर्षांपासून प्रकल्पग्रस्त की पूरग्रस्त या गोंधळात हे ग्रामस्थ जगत आहेत. पण त्यांना नेमके ते कशात मोडतात, हे सांगण्यास प्रशासन असमर्थ ठरत आहे. ते आंदोलने करतात, रस्त्यावर उतरतात पण प्रशासनातील अधिकारी बिनधास्त आहेत. प्रकल्पग्रस्त म्हणणे म्हणजे गेलेल्या घरांचा मोबदला देणे, एकाला शासकीय नोकरी देणे आणि मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करणे अशा शासनाच्या बाजूचा विचार जर पाटबंधारे विभागाचे अधिकारी करणार असतील तर अशांनी एकदा त्या 'पाणीग्रस्त' लोकांची अवस्था पाहून आलेच पाहिजे. पूरग्रस्त की प्रकल्पग्रस्त याच गोंधळात वर्षोन्‌वर्षे त्यांना खितपत ठेवून दिवस काढण्याची ही वृत्ती शासकीय लालफीतशाहीचे दर्शन घडविणारी आहे. अधिकारी या नात्याने लोकांप्रति असलेल्या कर्तव्याची गांभीर्याने जाणीव झाली तरच ती माझी जबाबदारी नाही या व्याधीने ग्रस्त अधिकारी काम करू शकतील, नाहीतर घरे पाण्यात गडप झाली तरी हा वाद मिटणार नाही, हे तेवढेच खरे! आज गोसीखुर्द प्रकल्पाने पाण्याची अंतिम पातळी गाठली असताना, ग्रामस्थांची झालेली अवस्था बघूनही जर शासनाचे दोन विभाग पूरग्रस्त की प्रकल्पग्रस्त याच गोंधळलेल्या मानसिकतेत राहणार असतील तर चांगल्या हेतूने उभारल्या जाणाऱ्या प्रकल्पांनाही बदनामीची किनार लागलेली असेल!

९७६३७१३४१७

# 'हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिबजी : त्याग, शौर्य आणि मानवतेचा संदेश

भारताच्या इतिहासात अनेक व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कार्यातून समाजाला दिशा दिली आहे. त्यात शौर्य, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारे शीखांचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने महाराष्ट्र शासनाने राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन केले आहे. नागपूर, नवी मुंबई आणि नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमांद्वारे त्यांच्या कार्याचा परिचय जनतेला करून देण्यात येणार आहे. नागपूर मध्ये हा कार्यक्रम झालेला असून नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी हा कार्यक्रम होत आहे. त्या अनुषंगाने...

### * ऐतिहासिक पार्श्वभूमी:-

गुरु तेगबहादुर साहिबजी हे सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे पुत्र आणि दहावे गुरू गोविंदसिंह यांचे पिता होते. त्यांचा जन्म अमृतसर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना वैराग्याची ओढ होती. पुढे १६६४ मध्ये त्यांना नववे गुरू म्हणून गादीवर बसविण्यात आले. त्यांनी शिवालिक पर्वतराजीत आनंदपूर नगर वसवून धर्मप्रचारासाठी यात्रांना प्रारंभ केला. आसामपासून काश्मीरपर्यंत त्यांनी समाजात सहिष्णुता, सत्य आणि अहिंसेचा संदेश पोचविला. त्यांनी ११६ पद्यांची रचना केली असून त्यात वैराग्य, क्षमा आणि मानवतेचा उत्कृष्ट आविष्कार दिसतो. ही पद्ये पुढे गुरु ग्रंथसाहिबात समाविष्ट झाली.

### * त्याग आणि शौर्याची परंपरा:-

१७ व्या शतकात समाजावर अन्याय आणि अत्याचारांचे सावट होते. अशा काळात गुरु तेगबहादुर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी आपले जीवन अर्पण केले. दिल्लीतील चांदणी चौकात त्यांनी बलिदान दिले. त्यांच्या या त्यागामुळे भारतीय समाजात एकतेची भावना दृढ झाली. त्यांच्या शहिदीनंतर दिल्लीतील सीसगंज गुरुद्वारा आणि रकाबगंज गुरुद्वारा हे स्मारक स्थळे उभी राहिली. ही स्थळे आजही त्याग, शौर्य आणि श्रद्धेची प्रेरणा देतात.



### * समाजाचे योगदान:-

गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या संघर्षात सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाज यांसारख्या अनेक घटकांनी मोलाची भूमिका बजावली. भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाल यांनी गुरुजींसाठी प्राणार्पण केले. या समाजांनी सेवाभाव, साहस आणि श्रद्धेची परंपरा पुढे नेली.

### * महाराष्ट्रातील कार्यक्रम:-

गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या शहिदीच्या ३५० व्या वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय समिती स्थापन केली आहे. नागपूर येथे ७ डिसेंबर २०२५ रोजी सुरेश चंद्र सुरी मैदानावर सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात भारतीय डाक विभागामार्फत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले. सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या शस्त्रांची प्रदर्शनी लावण्यात आली. विविध समाज घटक एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम साजरा करण्यात आला.

नागपूरनंतर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये मुंबई येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### * संदेश आणि प्रेरणा:-

गुरु तेगबहादुर साहिबजी यांनी दिलेला संदेश हा धार्मिकतेपलीकडे जाऊन मानवतेचा आहे. त्यांनी समाजात सहिष्णुता, एकता आणि स्वातंत्र्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या बलिदानाने भारतीयांना स्वधर्म आचरण्याचा आणि मानवी मूल्ये जपण्याचा आदर्श दिला. आजच्या काळात त्यांच्या विचारांची आठवण समाजाला एकत्र आणते. विविध प्रबोधनपर उपक्रमांद्वारे त्यांच्या त्यागाची शिकवण घराघरांत पोहोचविणे हेच या कार्यक्रमांचे उद्दिष्ट आहे.

'हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिबजी यांचे जीवन हे त्याग, शौर्य आणि मानवतेचे प्रतीक आहे. त्यांच्या शहिदीच्या ३५० व्या वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाने आखलेले कार्यक्रम समाजात एकतेचा, सहिष्णुतेचा आणि मानवतेचा संदेश पोहोचविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. नागपूर, नवी मुंबई आणि नांदेड येथील कार्यक्रमांमधून त्यांच्या कार्याचा परिचय जनतेला होणार असून भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

**- सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर**

## मुलं परदेशात, वृद्ध पालक भारतात

आज नागपुरात अनेक घरांमध्ये वृद्ध पालक एकटेच राहत आहेत. अशा पालकांना अकस्मात वैद्यकीय मदत लागल्यास त्याची फार कुचंबणा होते. अशा प्रसंगी ते आपल्या जवळच्या नातेवाईकांना दूरध्वनी करून बोलावतात अथवा शेजारी राहणाऱ्या तरुणांना मदतीला बोलावतात. एकदा ही तातडीची व्यवस्था झाली की मग या वृद्ध पालकांपैकी कोणीतरी परदेशातील मुलांना वैद्यकीय त्रासाबद्दल कळवतात. ही परदेशातील मुले पण जबाबदारीने भारतात येऊन आपल्या वृद्ध पालकांची व्यवस्थित काळजी घेतात. आकस्मिक वैद्यकीय उपचारांसाठी अशा वृद्ध पालकांसाठी प्रत्येक वॉर्डात काही तरुण स्वयंसेवकांची चमू उपलब्ध असावी, अशी सामाजिक कार्यकर्त्यांना विनंती आहे. हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना दिसत आहे. सबब, प्रशासनाने सुद्धा या प्रश्नावर तात्काळ उपाययोजना करावी असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाहतूक नियम मोडणाऱ्यांना शिक्षा आवश्यक

''वाहतूक नियम न पाळण्यात नागपूरकर अव्वल'' ही तरुण भारतात आलेली बातमी वाचली. तसेही पुण्या-मुंबईकडे ''नागपूरकर भारी'' म्हणून ओळखले जातात. वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी सामाजिक संस्था, पोलिसांतर्फे अनेकदा जनजागृती अभियान राबवले जातात. परंतु विशेषतः युवा वर्ग दुचाकी बेदरकार वाहनचालकांवर त्याचा काही चांगला परिणाम होत असल्याचे चित्र नाही. ट्रॅफिक सिग्नल मोडणारे अजूनही चौकाचौकात दिसतात. बातमीनुसार यात तरुणीही आघाडीवर आहेत. नियम मोडल्यावर ई-चालान जरी आले तरी त्याबद्दल खंत वाटण्याऐवजी दंडाचे पैसे सहज भरून टाकण्याची मानसिकता युवा वर्गात दिसते हे खरोखरच चिंताजनक आहे. वाहतुकीचे नियम अनेक असले तरी ट्रॅफिक सिग्नलचे उल्लंघन हे अतिशय घातक आहे. त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते. स्वतःबरोबर अन्य निष्पाप व्यक्तीलाही गंभीर इजा होऊ शकते ही देखील चिंता युवांमध्ये दिसत नाही. त्यामुळे वाहतूक नियम उल्लंघन केल्यानंतर आर्थिक दंडासोबत आणखी काय कठोर कारवाई करता येईल जेणेकरून वचक निर्माण होईल यावर सक्षम यंत्रणेने लवकर विचार करावा.

**राम राजे**/९४२१७७९९४५

## वाचक पत्रे

## पराभूत उमेदवारांनो, जनसेवेचे व्रत सुरू ठेवा

महानगर पालिकेच्या निवडणुका झाल्या आणि निकालही लागले. या स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतुन एक गोष्ट प्रकर्षाने निदर्शनास आली, ती म्हणजे पराभूत झालेले उमेदवार जनसेवेचे घेतलेले व्रत अर्धवट सोडून देतात आणि पाच वर्ष गप्प बसतात. असे न करता हे व्रत अखंडपणे सुरू ठेवायला हवे अन्यथा आपल्या देशाला योग्य दिशा देणारे, भारतमातेचा गौरव वाढवणारे व समाजसेवा हाच जीवनाचा उद्देश असणाऱ्या समाजसेवकांपासून देश वंचित राहील.

समाजसेवा हाच आपल्या जीवनाचा प्रमुख उद्देश समजून जनसेवेकरिता आम्हास रामाने धाडीयले. हा आध्यात्मिक भाव सदैव मनात ठेवून पराभूत उमेदवारांनी, अधिक उत्साहाने समाजसेवेला पुनश्च प्रारंभ करायला हवा कारण जनसेवा करायला जनतेतून निवडून यायलाच हवे असा काही नियम नाही. निवडणुकीत पराभव झाल्यामुळे उगीच पराभवाची कारणमीमांसा करताना, जात, धर्म, पंथ, पैसा, पक्षनेता आणि कार्यकर्ते यांना दोष न देता, उद्यापासून सरळ समाजसेवेला प्रारंभ करायला हवा. कारण सुदृढ लोकशाहीत समाजसेवा करण्यापासून तुम्हाला कुणीही अडवू शकत नाही. समाजसेवेची सुरुवात लगेच व्हायला हवी. आपल्या प्रभागातील समस्या शोधून काढा, त्यावर विचारमंथन करा. त्या कोण सोडवू शकतो, त्याला किती अवधी लागेल या सर्व गोष्टींचा मन लावून अभ्यास करा आणि नुकत्याच निवडून आलेल्या नगरसेवकाकडे जा. समस्यांचे गांभीर्य लक्षात आणून द्या व किती कालावधीत सोडवू शकता याबाबत विचारपूस करा, समस्या सोडविण्याबाबतच वचन घ्या व समस्या सोडवायला बाध्य करा. दिलेल्या कालावधीत त्या समस्या सुटल्या नाही तर प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून सोडवून घ्या व जनतेला न्याय द्या. हे समाजसेवेचे व्रत अखंडपणे सुरू राहिले तर पुढच्या पाचव्या वर्षी राजकीय पक्ष तुमच्या पाठीमागे पक्षाचे तिकीट घेऊन धावतील कारण त्यांना सुद्धा तुमच्यासारख्या सेवाभावी वृत्तीच्या उमेदवारांची गरज असते. असे घडले तर, पक्षाच्या तिकिटासाठी तुम्हाला घालीन लोटांगण वंदीन चरण हा प्रकार करावा लागणार नाही, तसेच मतदारांच्या पायाची धूळ माथी धारण करून संपूर्ण मतदारसंघात फिरावं लागणार नाही. इच्छा नसताना उगीच हात जोडत पायपीट करावी लागणार नाही. तुम्ही प्रामाणिकपणे केलेल्या समाजसेवेच्या माध्यमातून सहज निवडून येऊ शकता. एवढे करून सुद्धा जर तिकीट मिळाले नाही किंवा निवडून आले नाही तरी काही फरक पडणार नाही कारण समाजसेवा हेच तुमच्या आयुष्याचे प्रमुख ध्येय आहे. जनसेवा करत राहायची आणि मानव जीवनाचं सार्थक करायचं.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती बडनेरा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### जैन सोशल ग्रुपच्या वतीने नि:शुल्क इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात शिबिर एक फेब्रवारीला

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील दिव्यांग ज्यांना हाताच्या कोपऱ्यापासून हात अपघातात गमावले अश्यांसाठी जैन सोशल ग्रुपच्या वतीने निशुल्क इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात तपासणी व स्पॉटवर वितरण शिबिराचे आयोजन रविवार, १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी. १ वाजेपर्यंत केले आहे. जैन सोशल ग्रुप इंटरनेशनल फेडरेशन महाराष्ट्र रिजन, इनाली फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्णतः नि:शुल्क हे शिबिर आयोजित केले आहे. इच्छुकांनी नाव, आधार कार्ड, मोबाईल नंबर, हाताचा फोटो टेक्निशियन अभिषेक खंगारे (मोबाईल : ८६६८७२४००१), अमित दोशी (९८५००५५२२९), गौरव फडे( ९८२२२४८८०१) अथवा डॉ. निलेश फडे (९८२२४४५०८०) यांच्याकडे २५ जानेवारी २०२६ पर्यंत नोंदणी करावी.



### पद्मविभूषण महानायक डॉ. अमिताभ बच्चन सेवाभावी संस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महानायक दिनदर्शिका २०२६ चे अठरा वर्षे पूर्ण झाले असून विडी घरकुल सागर येथे महानायक दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन सोहळा संपन्न झाला व तसेच महानायक दिनदर्शिका चाहत्यांना मोफत देण्यात आल्या यावेळी पद्मविभूषण महानायक डॉ.अमिताभ बच्चन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विजय इप्पाकायल, संजय वाघमारे, रमेश सुंचू , राजु पानगंटी,यावेळी उपस्थित होते तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देविदास इप्पाकायल ,आनंद कनकी ,राज मणियार, रमेश शेट्टी, श्रीकांत म्हेत्रे व तसेच महानायक प्रेमी उपस्थित होते.

### धर्मण्णा सादूल प्रशालेचा शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेचा १०० टक्के निकाल

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

नीलमनगर भाग ३ व ४ मधील धर्मण्णा सादूल प्रशालेचा शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेतील एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. एलिमेंटरीमध्ये १५ पैकी ६ विद्यार्थी अ श्रेणी, ३ ब श्रेणी व ६ क श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांना कला शिक्षक संतोष धारेराव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष नाबिखा पठाण, मुख्याध्यापिका तस्लीमबानो पठाण व सय्यद आफरीन यांनी अभिनंदन केले.

# बाळीवेस व अक्कलकोट रोड परिसरात अतिक्रमणविरोधी कारवाई

### ५ खोके जागेवरच केले निष्काशीत; ५ चारचाकी हात गाड्या जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने आज शहरातील दोन ठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. आज सकाळच्या सत्रात म हापालिकेच्या अतिक्रमण विभागाने बाळीवेस परिसरातील रस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणारे पाच खोके जागेवरच निष्काषित केले. अक्कलकोट रोडवरही कारवाई केली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसारर नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना होत असलेला त्रास लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली.



बाळीवेस येथील भिंती लगत रस्त्याच्या कडेला असलेले पाच खोके जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशीत करण्यात आली. सायंकाळी अक्कलकोट रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ अतिक्रमणविरोधी दुसरी कारवाई करण्यात आली. या वेळी तीन चारचाकी हात गाड्या तसेच रस्त्यावर ठेवलेले इतर साहित्य जप्त करण्यात आले. अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी व अपघाताची शक्यता वाढत असल्याने महापालिकेने ही कारवाई केल्याचे अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी सांगितले.

शहरात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि सार्वजनिक रस्ते मोकळे करण्यासाठी अशा कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

# दोन महिन्यानंतर आगामी राजकीय वाटचालीविषयी निर्णय घेणार

### माजी नगरसेवक रियाज खरादी यांची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत प्रभाग १४मधून समाजवादी पक्षातर्फे निवडणूक लढवून पराभूत झालेले रियाज खरादी यांनी आगामी राजकीय वाटचालीबाबत दोन महिन्यात निर्णय घेणार असल्याचे सांगितले.

पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे असलेले खरादी हे सन २०१७ मध्ये प्रभाग १४मधून एमआयएम च्या तिकिटावर निवडून आले होते. त्यांना महापालिकेत या पक्षाचे गटनेते म्हणून काम करण्याची संधी लाभली होती. या पदावर काम करताना त्यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवण्याबरोबरच छापदेखील पाडली होती. गत काही वर्षात एमआयएममधून अनेक नगरसेवक बाहेर पडले, मात्र खरादी हे पक्षातच होते. पक्षांतर्गत राजकारणाचा फटका त्यांना बसला होता. या पार्श्वभूमीवर ते महापालिका निवडणुकीत एम आयएमतर्फे उभे राहणार की अन्य पक्षातर्फे असा प्रश्न निर्माण झाला होता. एमआयएमकडून त्यांना प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षामध्ये प्रवेश केला होता. मात्र या पक्षाने शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाशी युती केल्याने खरादी हे नाराज झाले होते. शिवसेनेची युती झाल्याने ते राष्ट्रवादीमधून बाहेर पडत समाजवादी पक्षाच्यावतीने प्रभाग क्रमांक १४ मधून निवडणूक लढविली होती.

### इंचगिरी मठात आज विविध धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर :** नेहरूनगर येथे श्री क्षेत्र इंचगिरी मठ श्री. स.स. भाऊसाहेब महाराज, श्री गिरीमल्लेश्वर म हाराज यांच्या सप्ताहनिमित्त बुधवार २१ जानेवारी सकाळी ९ वा. विष्णुसहस्त्रनाम पठण व १० वा. श्रींची पालखी मिरवणूक होऊन ११ वा. दासबोध पूजनाने विविध धार्मिक कार्यक्रम होतील. यावेळी संत महंताचे व मातोश्रींचे आर्शिवचन नेमाचे, रमा भजनी मंडळकडून भजन व आरती होईल त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल. या कार्यक्रमास प्रवचनकार मातोश्री पुष्पलताजी पाटील महाराज, प.पू. तानाजी महाराज, यादगिरी महाराज, आनंदसिध्द महाराज (असुरले), ह.भ.प. लक्ष्मण महाराज, आ.सुभाष देशमुख, महादेव बसन्ना कोगणुरे, ओबीसी युवा अध्यक्षा प्रतीक्षा चव्हाण आदींची उपस्थिती आहे.

### जुळे सोलापूर संतोष नगरच्या गणेश मंदिरात उद्या धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**



जुळे सोलापूरातील संतोष नगर येथील गणेश मंदिरात गणेश जयंतीनिमित्त विविध धार्मक कार्यक्रम २२ व २३ जानेवारी रोजी आयोजित केले आहेत. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गणेश मंदीर समितीचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांनी केले आहे. कार्यक्रम : २२ जानेवारी : स. ८ : गणेश याग होमहवन, पुजा. दु. १२: महाआरती, दु. ४ : संतोष महिला भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम. सायं.६ वा. : दीपोत्सव. २३ जानेवारी महाआरतीनंतर महाप्रसाद (शुभांगी व नवनाथ चव्हाण कुंटुबीयांक़डून), प्रभागातील नूतन नगरसेवकांचा सत्कार.

### उभ्या ट्रॅक्टर ट्रेलरला मोटरसायकलची धडक, एकाचा मृत्यू

**अकलूज, दि. २० जानेवारी-**



रस्त्याच्या कडेला ऊसाने भरलेल्या उभ्या ट्रॅक्टर ट्रेलरला मोटरसायकलची धडक बसून एकाचा मृत्यू झाला. येथील युवक अरबाज नजीर तांबोळी (वय २१) असे त्याचे नाव आहे. सोमवारी रात्री तो कराड गावावरून १६ पीर या देवस्थानवरून अकलूज कडे येताना माळशिरस जवळ गारवाड पाटी जवळ उभा असलेल्या ट्रॅक्टर ट्रेलर ला धडकून मुर्त्यू झाला. त्याच्या पश्चात वडील नजीर गुलाब तांबोळी, आई जरीना नजीर तांबोळी आणि विवाहित बहीण महेक अल्ताफ तांबोळी असा परिवार आहे. माळशिरस पोलीस ठाण्यामध्ये याबाबत अपघाती नोंद झाली आहे


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी मौजे चिंचगाव, ता. माढा, जि. सोलापूर येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे चिंचगाव, ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतीजमीन, क.ग. नंबर ११६ पैको क्षेत्र ०१ हे २९ आर. पो.ख. ०० हे ३२ आर, ही मिळकत विरकुमार पवनकुमार मेहता आणि शीतल पवनकुमार मेहता यांचे मालकी हक्क व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची आहे. तर क.ग. नंबर ११५/४ पैकी क्षेत्र ०० हे १३ आर ही मिळकत विरकुमार पवनकुमार मेहता यांचे मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची आहे. वर नमूद मिळकती विरकुमार पवनकुमार मेहता आणि शीतल पवनकुमार मेहता यांनी त्यांचे कौटुंबिक आर्थिक अडचणीसाठी व कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेल्या असून, त्याची माहिती आमचे अशिलांना झाल्यानंतर उभयतांचे दरम्यान चर्चा होवून आमचे अशिलांनी वर नमूद मिळकती खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर जमीन मालकांनी आमचे अशिलांकडून प्रस्तुत व्यवहारापोटी काही इसारा रक्कम देखील स्वीकारलेली आहे. सदर मिळकती निबंध, निजोखमी व निष्कर्जा असल्याची खात्री आणि भरवसा आमचे अशिलांना सदर जमीन मालकांनी दिलेला आहे. तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार असेल अथवा बँक, पतसंस्था, फायनान्स, सोसायटी बोजा, टाच, गहाण, लीज, साठेखत, खरेदीखत, पोटगी हक्क, नोटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हक्क, हितसंबंध अथवा दावा असल्यास, संबंधितांनी प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकत / तक्रार द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध, निजोखमी व निष्कर्जी असल्याचे समजण्यात येईल. तसेच कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास तो त्याने जाणीवपूर्वक कायमस्वरूपी सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार व हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. उगाच प्रस्तुत व्यवहाराची माहिती नव्हती केवळ या तक्रारीस वाव राहू नये, म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे.
दि.२०/०१/२०२६

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
विजयसिंह विलास व्यवहारे
(BA, LL.B.)
रा. तडवळे, म. ता. माढा, जि. सोलापूर
मो.नं. ९०२११२२७१२५



### मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
यांत्रिक काम

निविदा सूचना क्रमांक GEM/2026/B/7117378 दिनांक-19.01.2026 डीआरएम (एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. 1 कामाचे नाव आणि त्याचे ठिकाण:- सोलापूर विभागातील प्राथमिक देखभाल केलेल्या गाड्यांमध्ये ऑन बोर्ड हाऊस कीपिंग सर्व्हिस (ओबीएचएस) चे कंत्राट काम 28 महिन्यांच्या कालावधीसाठी जीईएम द्वारे मनुष्यबळ आधारावर. 2. निविदा प्रणाली:- दोन पॅकेट प्रणाली. 3. कामाची अंदाजे किंमत:- रु. 9,08,47,596.19/-, 4. निविदा फॉर्मची किंमत:- शून्य, 5. निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता:- डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, 6. जमा करावयाची बक्षिसे:- रुपये 6,04,240.00/-, 7. काम पूर्ण करण्याचा कालावधी:- काम सुरू झाल्यापासून अठ्ठावीस महिने. 8. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:- 11.02.2026 सकाळी 11.00 वाजता, 9. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:- 11.02.2026 सकाळी 11.30 वाजता, 10. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक जेथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल:- WWW. GeM.gov.in.
26 Sr. DME.Sur
तुमच्या प्राण्यांना रेल्वे लाईनपासून दूर ठेवा



### जाहीर प्रसिध्दीकरण

**भारत सहकारी गारमेंट्स मर्या. सोलापूर या संस्थेचा, गट नं.१२, होटगी, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गारमेंट प्रकल्प भाडेतत्वावर देण्याचे ठरविले असून, त्याकरीता इच्छुक व पात्र असलेल्या व्यक्तीकडून, निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकानी ७(सात) दिवसाचे आत संस्थेकडे तपशिलवार माहितीसह निविदा सादर करणेचे आहे. त्याकरीता पुढील माहिती व कागदपत्रासह निविदा सोबत पूर्तता करण्यात यावी. गारमेंट प्रकल्प भाडेतत्वावर देण्याकरीता प्रामुख्याने पुढील अटी राहतील.**

१) भाडेतत्वावर रेडीमेड गारमेंट उत्पादन करीता मर्यादित राहील.
२) सदरहू प्रकल्प चालविण्याकरीता, संस्थेकडून ठरविलेल्या व असलेल्या जागेत गारमेंटचे उत्पादन करणे बंधनकारक राहील.
३) गारमेंट प्रकल्प किमान ५ वर्षाकरीता भाडेतत्वावर मर्यादित राहील.
४) उपलब्ध असलेल्या मशिनरी उपयोगात आणणेकरीता देणेत येतील.
५) वरील सर्व वस्तूस्थितीचा विचार करुन किमान भाडे ठरविणे करीता निविदा सादर करावी.
६) निविदे सोबत EMD रक्कम रुपये १०,००,०००/– (दहा लाख रुपये) डिमांड ड्राफ्ट अथवा ऑनलाईन भरणेचे आहे.
७) कोरी निविदा फॉर्मची किंमत रु.१०,०००/–(दहा हजार रुपये) राहील.
८) निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार संस्थेस राहील.

आर्जन क्रिएशन

दिनांक : २१/०१/२०२६
ठिकाण : सोलापूर

प्रभारी व्यवस्थापक
भारत सहकारी गारमेंट्स मर्या. सोलापूर
मो.: ७७०९६७८९८७



### जाहीर प्रसिध्दीकरण

९७/२०२६
नि. ५
अर्ज वारस दाखला मिळणेबाबत
दि. कि. अर्ज नं. १३५/२०२५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात**

१) सुनिता शिवानंद काळे, वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सह्याद्रीनगर, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) श्रावणी शिवानंद काळे, वय - १४ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार नं. १
३) साईराज शिवानंद काळे, वय १३ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार नं. १
४) स्वरांजली शिवानंद काळे, वय १० वर्षे धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार नं. १
५) सुशाला उर्फ सुशिलाबाई आप्पासाहेब काळे, वय - ७८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर

**अर्जदार**

**विरूध्द**

**कोणी नाही** .......... **सा.वाला**

अर्ज - Bombay Regulation Act Section II प्रमाणे -

ज्या अर्थी,

अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडिल आणि अर्जदार नं. ५ यांचा मुलगा शिवानंद आप्पासाहेब काळे हे दि. ०३/०४/२०२० रोजी मौजे वैराग, ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ५ हेच जवळचे व कायदेशीर वारस आहेत. यातील अर्जदार नं. १ ते ५ यांचे शिवाय मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांना दुसरे कोणीही जवळचे वारस नव्हते व नाहीत. मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ५ यांना शासकीय सवलती व इतर लाभ मिळणेसाठी अर्जदारांना वारस दाखला मिळणे जरुरीचे आहे. त्यासाठी शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ५ हेच जवळचे व कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना त्यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणे न्यायाचे दृष्टीने जरूरीचे झाले आहे. सबब मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ५ हेच जवळचे कायदेशीर वारस ठरवून त्यांना वारस दाखला मिळणेसाठी अर्जदारांनी सदरचा दाखल केलेला आहे.

त्या अर्थी

सदर अर्जदार नं. १ ते ५ यांचे व्यतिरिक्त मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २७/०२/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे.
ता. १७/०१/२०२६

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दि. न्या. क. स्तर बार्शी, ता. बार्शी



### CHANGE OF NAME

I, Varsha Rohan Kota, wife of Rohan Kota, residing at C-26/47, Vinkar Society, MIDC, Solapur, 413006, Maharashtra, India, hereby declare that I am changing my name from "Shravani Rohan Kota" to "Varsha Rohan Kota" for passport issuance
Date : 20.01.2026
Place: Solapur



भा.कृ.अनु.प.– राष्ट्रीय अनार अनुसंधान केन्द्र, सोलापुर
ICAR - National Research Centre on Pomegranate
(Indian Council of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255 (M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263,F-(0217) 2353533
E mail- nrcpomegranate@gmail.com, Website- nrcpomegranate.icar.gov.in
(ISO 9001:2015 Certified Institute)

### WALK-IN-INTERVIEW

A Walk in interview will be held on 23.02.2026 11:00 AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sl. No. | Name of the Project | Name of Post | Number of Posts |
|---|---|---|---|
| 1. | Scientific Validation of an AI-Enabled Crop Growth Tracking Platform for Precision Management of Pomegranate | Young Professional - 1 | 01 |
| 2. | | Project Assistant/ Field Assistant | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.icar.gov.in.

Sd/-
DIRECTOR



रजि. नं. बी.पी.टी.ओ.–१५४० लातूर



### श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय, लातूर

### श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय, लातूर
### देणगी प्रस्ताव

लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाची ७३ वी महाशिवरात्री यात्रा रविवार दि. १५.०२.२०२६ ते सोमवार दि. ०२.०३.२०२६ या महापर्वाच्या कालावधीत साजरा केली जाणार आहे.

या यात्रा महोत्सव कालावधीसाठी देवालयाच्या परिसरातील आनंद मेळावा व विविध पाळण्यांसाठीच्या मोकळया जागेसाठी देणगी प्रस्ताव बुधवार दि. २८.०१.२०२६ रोजी सकाळी ११.३० वा. पासून सुरु होणार आहे. देणगी प्रस्तावासंबंधीची माहिती यावेळी देण्यात येईल.

तरी इच्छुकांनी देणगी प्रस्ताव बुधवार दि. २८.०१.२०२६ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी २.३० पर्यंत सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयात सादर करावेत. याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार प्रशासक व विश्वस्त मंडळ यांना राहतील. देवालयाच्या सर्व नियम व अटी देणगी प्रस्ताव धारकांवर बंधनकारक राहतील. तसेच सद–रच्या देणगी प्रस्तावाच्या बाबतीत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाच्या अटी व शर्ती लागू राहतील.

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाच्या परिसरातील आनंद मेळ्यासाठीची मोकळी जागा (रिकामी) महाशिवरात्री यात्रा कालावधीपर्यत देणगी प्रस्ताव स्वरुपात देण्यात येणार आहे. तरी इच्छुक आनंद मेळाधारकांनी यामध्ये सहभाग घेवून सहकार्य करावे.

अधिक माहितीसाठी खालील मोबाईल नंबर्स वर संपर्क करावे.

| | |
|---|---|
| १. श्री अशोकरावजी भोसले | मो. ९४२२४७०२४९ |
| २. श्री सुरेशजी गोजमगुंडे | मो. ९८९००४३४२३ |
| ३. श्री दत्तात्रय सुरवसे | मो. ९६६५३४२४३४ |

स्वाक्षरित/–
श्री सचिन सु. जांबुतकर
प्रशासक
श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय, लातूर



बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

नियम - ८ (१)
### ताबा सूचना

याद्वारे बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करणारी मागणी सूचना दिनांक ०४/१०/२०२३ रोजी जारी केली होती.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १९/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा भौतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्रच्या वर नमूद केलेल्या रकमेच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- वाडिया हॉस्पिटल**<br>**कर्जदार -**<br>**१.श्री कपिल राजू जाधव.**<br>**२. श्रीमती प्रिती राजू जाधव.**<br>**३.सौ.रेणुका कपिल जाधव.**<br>**४. श्रीमती मीनाक्षी दीपक गायकवाड**<br>**५. श्रीमती भारती राजू जाधव**<br>**६. राजू मोहन जाधव**<br><br>पत्ता : सर्व आर/ओ, प्लॉट क्रमांक १३२ आणि १३३ रामवाडी अंबाबाई मंदिर सोलापूर ४१३००१ | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**<br>श्री. कपिल राजू जाधव, श्रीमती प्रीती राजू जाधव. श्रीमती रेणुका कपिल जाधव, श्रीमती मीनाक्षी दीपक गायकवाड आणि भारती राजू जाधव- नोंदणीकृत गहाण या सर्व जमिनीच्या तुकड्या आणि तुकड्यांचे गहाण रामवाडी, तालुका उत्तर सोलापूर, सोलापूर येथे आहेत. मालमत्ता आयडी: २०००५६८५७५१३.<br><br>फायनल प्लॉट क्रमांक २२८, सीटीएस क्रमांक ४१३ मधील प्लॉट क्रमांक १३३/१ येथे एक निवासी घर, रामवाडी येथे १२५.०० चौरस मीटर क्षेत्रफळाचे, अंबाबाई मंदिराजवळ, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर<br>पूर्व- कपिल जाधव यांचे घर.<br>दक्षिण-जालिंदर खेडचे घर.<br>पश्चिम-रस्ता<br>उत्तर-रस्ता | **मागणी सूचना:**<br>**दिनांक: ०४/१०/२०२३.**<br><br>**खाते शिल्लक:** रु.९०,९०,४९७.००+ लागू न केलेले व्याज.<br>**एकूण:** रु. ९०,९०,४९७.००/- (नव्वद लाख नव्वद हजार चारशे सत्याण्णव रुपये फक्त)<br>**भौतिक ताबा दिनांक :** १९/०१/२०२६ |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 19/01/2026

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.




### सोमपातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी महामानव डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनचे निवेदन

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांच्या सूचनेनुसार ट्रेड युनियनचे मार्गदर्शक इकबाल तडकल यांनी सोमपा अतिरिक्त आयुक्त पवार यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

निवेदनात घनकचरा व्यवस्थापन विभागातील बडतर्फ करण्यात आलेल्या १५ कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवेत रुजू करून घ्यावे, तसेच आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्वातंत्र्यदिनी दिलेल्या आश्वासनानुसार कायम, बदली रोजंदारी, मानधनावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मेडिकल कॅशलेस विमा योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली.यासह पदोन्नतीवर जमादारपदी नियुक्त झालेल्या महिला व बिगारी कर्मचाऱ्यांना पदोन्नती नको असल्यास कोणतेही नुकसान न करता मूळ पदावरच कायम ठेवावे, या म ागण्यांचा समावेश आहे. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त पवार यांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी खजिनदार अरुण मेहेत्रे, राम चंदनशिवे, दिनेश बनसोडे, सुनील शिंदे, संतोष गायकवाड, महेश खोडके, राहुल गायकवाड, अतुल जाधव उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### यूपी डोमिनेटर्सकडून दिल्ली दंगलचा पराभव

**नोएडा :** मंगळवारी येथे प्रो रेसलिंग लीग (पीडब्ल्यूएल) सामन्यात यूपी डोमिनेटर्सने उल्लेखनीय पुनरागमन केले आणि दिल्ली दंगल वॉरियर्सचा ५-४ असा पराभव केला. पुरुषांच्या ८६ किलो गटात, दिल्ली दंगल वॉरियर्सच्या वफाईपूर हादी बख्तियारने मिखाइलोव्ह वासिलचा ७-४ असा पराभव केला. त्यानंतर, महिलांच्या ७६ किलो गटात दिल्लीच्या अनास्तासिया अल्पिएवाने ओजो दामोला हन्नावर ११-२ असा विजय मिळवला. पुरुषांच्या ७४ किलो गटातही दिल्लीने चांगली कामगिरी केली. अझरबैजानच्या तुरान बायरामोव्हने अभिमन्यू मांडवालचा ३-० असा पराभव करून दिल्लीला ३-० अशी आघाडी मिळवून दिली. महिलांच्या ५७ किलो गटात तपस्या गहलावतने कार्ला गोंझालेझचा ८-२ असा पराभव करून अखेर यूपीने पुनरागमन विजय मिळवला. दिल्लीचा कर्णधार आणि २३ वर्षांखालील विश्वविजेता सुजीत कालकलने पुरुषांच्या ६५ किलो गटात विशाल कालीरमणचा पराभव करून संघाची आघाडी ४-१ अशी वाढवली.

### लेहमध्ये सहाव्या खेलो इंडिया स्पर्धेचे उद्घाटन

**लेह :** नायब राज्यपाल कविंद्र गुप्ता यांनी मंगळवारी अत्याधुनिक एनडीएस आईस हॉकी स्टेडियममध्ये ६व्या खेलो इंडिया हिवाळी स्पर्धा २०२६ चे उद्घाटन केले. ही स्पर्धा सात दिवस चालणार असून, २६ जानेवारी रोजी संपतील. १९ राज्यांमधील १,०६० स्पर्धक यामध्ये सहभागी होतील. यात भारतीय सैन्य आणि इंडो-तिबेटी सीमा पोलिसांसह खेळाडू, तांत्रिक अधिकारी, सहायक कर्मचारी आणि स्वयंसेवक यांचा समावेश आहे. आईस हॉकी आणि स्पीड स्केटिंग व्यतिरिक्त, फिगर स्केटिंग स्पर्धा देखील पहिल्यांदाच आयोजित केल्या जातील. क्रीडा विकासासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचे महत्त्व अधोरेखित कविंद्र गुप्ता म्हणाले, एनडीएस आईस हॉकी रिंक, गुपुक तलाव आणि लडाख स्काउट्स रेजिमेंटल सेंटर रिंक खेळांसाठी पूर्णपणे सज्ज आहेत. एनडीएस स्टेडियममधील ५३.५८ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेला आईस हॉकी रिंक ही एक मोठी कामगिरी आहे.

### भारतीय महिला खेळाडूंसाठी 'द नेक्स्ट सेट' लाँच

**हैदराबाद :** सहा वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेती सानिया मिर्झाने मंगळवारी 'द नेक्स्ट सेट' नावाच्या उपक्रमाची घोषणा केली. याचा उद्देश टेनिससह भारतातील आघाडीच्या आणि उदयोन्मुख महिला खेळाडूंना मार्गदर्शन करणे आणि त्यांना पाठिंबा देणे हा आहे. सानियाने उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना पाठिंबा देऊन क्रीडा जगताला परत देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला. हा कार्यक्रम प्रामुख्याने प्रशिक्षक आणि फिजिओथेरपिस्टसह समर्पित समर्थन प्रणालीची सोपी प्रवेश प्रदान करेल, जे सातत्यपूर्ण तयारी आणि समन्वय सुनिश्चित करण्यासाठी संपूर्ण हंगामात खेळाडूंसोबत स्पर्धांमध्ये प्रवास करू शकतात. याव्यतिरिक्त, या कार्यक्रमात सानियाच्या अकादमीमध्ये विशेष टेनिस शिबिरे आणि प्रशिक्षण कार्यशाळा समाविष्ट असतील.

### आसाममध्ये सातव्यांदा होणार संतोष ट्रॉफी

**नवी दिल्ली :** ७९ वी राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा संतोष ट्रॉफी बुधवारपासून आसाममध्ये सुरू होत आहे. सातव्यांदा येथे हे आयोजन केले जात आहे. संतोष ट्रॉफी पहिल्यांदा १९५९-६० मध्ये आसाममध्ये खेळवण्यात आली होती. स्पर्धेच्या पात्रता फेरीसाठी, सर्व राज्यांमधील संघांना नऊ गटांमध्ये विभागण्यात आले आहे. प्रत्येक गटातील अव्वल संघ अंतिम फेरीत पोहोचेल. यजमान आणि गेल्या हंगामातील उपविजेते, आसाम, पश्चिम बंगाल आणि केरळ थेट अंतिम फेरीत पोहोचतील. बाद फेरीचे उपांत्य फेरीचे सामने २ आणि ३ फेब्रुवारी रोजी, उपांत्य फेरीचे सामने ५ फेब्रुवारी रोजी आणि अंतिम सामना ८ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

# न्यूझीलंडचा विजयरथ रोखणार भारत

### सूर्यकुमार यादवकडे सर्वांचे लक्ष

### आज पहिला टी-२० सामना



बुधवारच्या सामन्यापूर्वी व्हीसीए मैदानावर सराव करताना न्यूझीलंडचे काईल जेमिसन, ईश सोढी आणि इतर खेळाडू.

**नागपूर, २० जानेवारी**

अनेक दिवसांपासून प्रत्यक्ष आंतरराष्ट्रीय क्रिकेट पाहण्यास उत्सुक असलेल्या नागपूरकरांची प्रतीक्षा आज संपणार आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात बुधवारी टी-२० सामना होणार आहे. नुकत्याच संपलेल्या एकदिवसीय मालिकेत न्यूझीलंडने भारताचा २-१ असा पराभव केल्यामुळे पाहुण्या संघाचा आत्मविश्वास बळावला आहे, तर नागपूरकर नेहमीच भारतीय संघाचे प्रोत्साहन वाढवतात, त्यामुळे भारतीय संघही दमदार खेळ सादर करेल, अशी येथील क्रिकेट चाहत्यांना आशा आहे.

काही काळापासून धावा काढण्यास संघर्ष करणारा कर्णधार सूर्यकुमार यादव बुधवारपासून न्यूझीलंडविरुद्ध सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत फॉर्ममध्ये परतण्यास उत्सुक असेल. भारत एकदिवसीय मालिकेतील पराभवाचा बदला घेण्याचा आणि पुढील महिन्यात घरच्या मैदानावर होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी तयारी मजबूत करण्याचा प्रयत्न करेल.

२०२४ मध्ये सूर्यकुमारने टी-२० संघाचे नेतृत्व स्वीकारल्यापासून, भारताने चांगली कामगिरी केली आहे, विजयाची टक्केवारी ७२ हून अधिक आहे. यामुळे कर्णधाराच्या निराशाजनक फलंदाजी कामगिरीकडे दुर्लक्ष करण्यात आले, परंतु आता तसे राहिलेले नाही.

गेल्या दोन वर्षांपासून, भारतीय टी-२० संघ स्वयंचलित मोडवर आहे, फक्त काही पराभवांना तोंड देत आहे. आयपीएलमुळे त्यांच्याकडे असे खेळाडू आहेत जे त्यांच्या भूमिका चांगल्या प्रकारे जाणतात.

तथापि, भारतीय संघावर विश्वचषक विजेतेपदाचे रक्षण करण्यासाठी आणि घरच्या मैदानावर खेळण्यासाठी दबाव असेल आणि सूर्यकुमार न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी या घटकांचा विचार नक्कीच करेल.

न्यूझीलंड हा एक मजबूत संघ आहे आणि गेल्या वर्षभरात त्यांनी चांगल्या खेळी केल्या आहेत. ज्यात भारताविरुद्ध कसोटी मालिकेचा क्लीन स्वीप आणि एकदिवसीय मालिका जिंकणे यांचा समावेश आहे. पहिल्यांदाच भारतीय भूमीवर द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकल्याने त्यांच्या खेळाडूंचे मनोबल निश्चितच वाढले आहे.

परंतु जेव्हा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा विचार केला जातो तेव्हा सूर्यकुमारच्या नेतृत्वाखालील भारताने गेल्या २५ पैकी १८ सामने जिंकून एक वेगळा संघ असल्याचे सिद्ध केले आहे. हे मुख्यत्वे अभिषेक शर्माच्या स्फोटक सुरुवातीमुळे आणि मधल्या षटकांमध्ये वरुण चक्रवर्तीच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे आहे.

२०२४ च्या टी-२० विश्वचषकापासून खेळल्या गेलेल्या २१ पैकी १३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने न्यूझीलंडने जिंकले आहेत. आक्रमक सलामीवीर डेव्हॉन कॉन्वे, कर्णधार मिशेल सँटनर, वेगवान गोलंदाज जेकब डफी आणि फॉर्ममध्ये असलेल्या डॅरिल मिशेल, ग्लेन फिलिप्स यांच्यासह, न्यूझीलंड एक मजबूत प्रतिस्पर्धी ठरू शकतो.

तिलक वर्माला खेळण्यासाठी अधिक वेळ देण्यासाठी, त्याने फलंदाजीच्या क्रमात तिसऱ्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर स्थान मिळवले आहे. सूर्यकुमारला हे चांगलेच माहिती आहे की त्याच्या खराब कामगिरीचे ड्रेसिंग रूममध्ये परिणाम होऊ शकतात आणि त्याला आता कोणत्याही परिस्थितीत कामगिरी करावी लागेल. भारतीय संघातील फिरकीपटूंविरुद्ध सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक असलेल्या अय्यरला तिलक वर्माच्या दुखापतीमुळे संघात समाविष्ट करण्यात आले आहे. न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज आणि अष्टपैलू ख्रिश्चन क्लार्क टी-२० मालिकेसाठी संघात राहील कारण मायकल ब्रेसवेल आणि ॲडम मिल्ने दोघेही किरकोळ दुखापतींमधून बरे होत आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)

**आजचा सामना**

**भारत विरुद्ध न्यूझीलंड**
**स्थळ :** व्हीसीए स्टेडियम जामठा, नागपूर
**वेळ :** संध्याकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# दुखापतग्रस्त ब्रेसवेलच्या तंदुरुस्तीवर लक्ष

### प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांची माहिती

**नवी दिल्ली, २० जानेवारी**

भारताविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत अष्टपैलू मायकेल ब्रेसवेलचा सहभाग इंदूरमधील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान झालेल्या डाव्या पायाच्या दुखापतीतून तो बरा होतो



की नाही यावर अवलंबून असेल, असे न्यूझीलंडचे प्रशिक्षक रॉब वॉल्टर म्हणाले.

न्यूझीलंडने होळकर स्टेडियमवर भारताचा ४१ धावांनी पराभव करून एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकली, परंतु क्षेत्ररक्षण करताना झालेल्या पायाच्या दुखापतीमुळे ब्रेसवेल गोलंदाजी करू शकला नाही.

न्यूझीलंड क्रिकेटच्या प्रसिद्धी पत्रकात वॉल्टर म्हणाले की, ब्रेसवेलवर उपचार सुरू राहतील आणि त्याच्या फिटनेसवर लक्ष ठेवले जाईल. त्यानंतरच दौऱ्यात त्याच्या पुढील सहभागाबाबत निर्णय घेतला जाईल.

वॉल्टर म्हणाले की, एकदिवसीय मालिका जिंकणे आणि इतिहास रचणे खूप खास होते. संघाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे आम्ही यापूर्वी कधीही न पाहिलेले काहीतरी साध्य केले.

ब्रेसवेल संघासोबत राहील, परंतु त्याला लवकरच पूर्ण फिटनेस मिळवण्याची आवश्यकता असेल. मायकल संघासोबत नागपूरला गेला आहे, पण टी-२० मालिकेपूर्वी फारसा वेळ शिल्लक नाही, त्यामुळे आम्हाला लवकरच त्याच्या तंदुरुस्तीचे मूल्यांकन करावे लागेल, असे ते म्हणाले. वेगवान गोलंदाज ख्रिश्चन क्लार्क संघासोबत राहील, असेही त्यांनी सांगितले.

या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांसाठी आमच्याकडे पुरेसे जलद गोलंदाजीचे पर्याय असतील याची आम्हाला खात्री करायची आहे आणि ख्रिश्चनसाठी त्याच्या पहिल्या भारत दौऱ्यात संघासोबत आणखी काही वेळ घालवण्याची ही एक उत्तम संधी आहे. त्याने एकदिवसीय मालिकेत उत्कृष्ट कामगिरी केल्याचे वॉल्टर म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# टी-२० मालिका विश्वचषकाची उत्तम संधी

### लॉकी फर्ग्युसनचे मत

**क्राइस्टचर्च, २० जानेवारी**

आजपासून सुरू होणारी भारताविरुद्धची पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका न्यूझीलंड संघाला पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीसाठी एक उत्तम व्यासपीठ प्रदान करेल, असे मत न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनने व्यक्त केले.

भारताविरुद्धच्या अलिकडेच झालेल्या २-१ एकदिवसीय मालिकेतील विजयामुळे उत्साहित झालेला न्यूझीलंड नागपूरमध्ये होणाऱ्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात विश्वचषकाच्या सह-यजमान भारताचा सामना करेल.

भारतात किवी संघात सामील झालेल्या फर्ग्युसनने रवाना होण्यापूर्वी पत्रकारांना सांगितले की, ही खरोखर चांगली तयारी असेल. मला माहीत आहे की ही मैदाने आपण विश्वचषकात ज्या मैदानांवर खेळू तेच मैदाने नसतील, परंतु तेथे खेळण्याचा अनुभव, परिणाम आणि जमिनीच्या परिस्थितीचे मूल्यांकन करणे ही विश्वचषकाची उत्तम तयारी असेल. तो म्हणाला, भारत हा जगातील अव्वल संघांपैकी एक आहे आणि घरच्या परिस्थितीत तो अतुलनीय आहे.

आयपीएल २०२६ साठी पंजाब किंग्ज संघाचा भाग असलेल्या फर्ग्युसनने सांगितले की, या महिन्याच्या सुरुवातीला यूएईमध्ये झालेल्या आयएलटी २० सामन्यादरम्यान झालेल्या पायाच्या दुखापतीतून तो बरा झाला आहे आणि गेल्या आठवड्यापासून तो पूर्ण ताकदीने गोलंदाजी करत आहे. तथापि, पहिल्या सामन्यासाठी न्यूझीलंडच्या संघात फर्ग्युसनचे नाव समाविष्ट नाही.

टी-२० विवचषकादरम्यान तो काही दिवसांसाठी पितृत्व रजा देखील घेऊ शकतो, कारण त्याच्या मुलाचा जन्म फेब्रुवारीत होण्याची अपेक्षा आहे. वेगवान गोलंदाजाने सांगितले की सध्या निवृत्त होण्याचा त्याचा कोणताही हेतू नाही. फर्ग्युसन म्हणाला, मी अजूनही तंदुरुस्त आहे. मला अजूनही वाटते की मी संघासाठी योगदान देऊ शकतो.

२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक उपांत्य सामन्यात भारताविरुद्ध शेवटचा एकदिवसीय सामना खेळणारा ३४ वर्षीय खेळाडू म्हणाला की मी अजूनही ५० षटकांचा क्रिकेट खेळण्याची आकांक्षा बाळगतो. मला ५० षटकांचे क्रिकेट आवडते. त्यामुळे मला टी-२० पेक्षा थोडी जास्त ओळख मिळाली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# बॅडमिंटनपटू सायना नेहवाल निवृत्त

**नवी दिल्ली, २० जानेवारी -**

ऑलिम्पिक पदक विजेती आणि भारतीय बॅडमिंटन खेळाडू सायना नेहवालने स्पर्धात्मक

खेळांधून निवृत्ती जाहीर केली आहे.

गुडघ्याच्या गंभीर आणि दीर्घकालीन समस्येुळे ती जवळजवळ दोन वर्षे कोर्टपासून दूर होती. लंडन २०१२ ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती सायना शेवटची २०२३ मध्ये सिंगापूर ओपनमध्ये खेळली होती. तथापि, तिने सोवारी औपचारिकपणे निवृत्तीची घोषणा केली. सायना म्हणाली, मी दोन वर्षांपूर्वी खेळणे थांबवले. मला वाटले की मी स्वतःहून हा खेळ सुरू केला आणि माझ्या स्वतःच्या निर्णयाने तो सोडला, म्हणून वेगळी घोषणा करण्याची गरज नव्हती. सायना नेहवाल मार्चध्ये ३६ वर्षांची होणार आहे. तिने स्पष्ट केले की, माझी गुडघेदुखी वाढली आहे आणि मला संधिवात झाला होता. ज्यामुळे उच्च- तीव्रतेचे प्रशिक्षण सुरू ठेवणे अशक्य झाले होते.

ती म्हणाली, डॉक्टरांनी मला स्पष्टपणे सांगितले होते की कार्टिलेज पूर्णपणे निघून गेला आहे. मी माझ्या पालकांना आणि प्रशिक्षकांना सांगितले होते की मी कदाचित आता हे करू शकणार नाही, ते खूप कठीण झाले आहे. माझे शरीर आता उच्चस्तरीय बॅडमिंटनच्या मागण्या पूर्ण करण्यास सक्षम राहिले नाही. सायना म्हणाली, जगातील सर्वोत्तम होण्यासाठी, तुम्हाला दिवसातून आठ ते नऊ तास सराव करावा लागेल. पण माझा गुडघा फक्त एक-दोन तासांतच दुखतो. मला वाटते आता थांबले पाहिजे.

# सोलापुरच्या मुलांचा उपांत्य फेरीत प्रवेश

### ज्युनियर राज्य अजिंक्यपद सॉफ्टबॉल स्पर्धा : लातूरचीही उपांत्य फेरीत धडक

**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

३१व्या ज्युनियर राज्य अजिंक्यपद सॉफ्टबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात यजमान सोलापर मनपासह लातूर जिल्ह्याने उपांत्य फेरीत प्रवेश केला. मुलींच्या गटात जळगाव मनपा, पीसीएम सी, कोल्हापूर व सांगली हे चार संघांनी उपांत्य फेरी गाठली.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट व सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा येथे सुरू आहे. मुलांच्या गटात सोलापूरने नाशिकचा ५-४ तर लातरने अहिल्यानगरचा ७-२ होम रनने पराभव केला. मुलींच्या गटात जळगावने सांगली मनपाचा ९-0 तर दुसऱ्या सामन्यात पिंपरी



चिंचवड मनपाने नवी मुंबईचा ८-0 असा धुव्वा उडविला.

या स्पर्धेचे आयोजन समितीचे अध्यक्ष नगराध्यक्ष महेशजी इंगळे, सॉफ्टबॉलचे सचिव स्पर्धा सचिव प्रा.संतोष खेंडे, मारुती घोडके खजिनदार गंगाराम घोडके, मारुती घोडके, परमेश्वर व्हसुरे संचालक श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण, प्रशांत राणे, प्रबुद्ध चिंचोलीकर, संतोष पाटील, प्रशांत कदम, सिताराम भांड सागर जगझाप, महादेव वाघमारे, समर्थ आहेरवाडी अनिकेत कांबळे हे करीत आहेत.



# विद्यापीठ हॉकी व फुटबॉल संघात सोशलचे ९ खेळाडू

### रेहान मुल्ला फुटबॉल संघाचा कर्णधार

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

पारुल विद्यापीठ, बडोदा व एल.एन.सी.टी. विद्यापीठ, भोपाल येथे होणाऱ्या अखिल भारतीय पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल व हॉकी स्पर्धेकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संघामध्ये सोलापूर सोशल असोसिएशन्स आटर्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयाच्या ९ खेळाडूंची निवड करण्यात आली.

त्यांना शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. मुश्ताक शेख व तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्रभारी प्राचार्य डॉ. ई. जा. तांबोळी आदींनी अभिनंदन केले. **निवड झालेले खेळाडू : फुटबॉल :** रेहान मुल्ला (कर्णधार), अल्तमश वळसंकर, अबू-हुरेरा सालार, समीउल्ला आरेवाले, दानियाल दिवान व अयान काखंडीकर. **हॉकी :** शमशोद्दीन पाटील, रहमान बच्चेभाई व इल्हान कुरेशी.



# सुर्यनमस्कार स्पर्धेत शिवाजी प्रशालेच्या १० विद्यार्थ्यांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

येथील छत्रपती शिवाज प्रशालेच्या १० विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय सुर्यनमस्कार स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांना प्रशिक्षक सोमनाथ मगर, योगशिक्षक राजेश कोमुलवार, क्रीडा विभाग प्रमुख मारुती घोडके, नितीन गोरे, नेहा स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापीका सुजाता जुगदार, उपमुख्याध्यापक श्रीपदराव जगदाळे, पर्यवेक्षक सुरेश जगताप व किरण देशमुख यांनी अभिनंदन केले.

कामगिरी केलेले विद्यार्थी : मुले : गंगाधर यल्लप्पा बसरगी, यश राम चव्हाण, नेहान मोसिण शेख, मनोज आदर्श कवचाळे, ओम बसवेश्वर पाटील.

मुली : मयुरी मिसाळ, श्रेया वाघमारे, योगिता कडचे, श्रेणिका मोरे, शिवगंगा मोगे.

# डी बाटु तंत्रशिक्षण विद्यापीठाचा विभागीय क्रिकेट संघ जाहीर

### ऑर्किड महाविद्यालयात झालेल्या चाचणीतून निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

आर सी पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपूर धुळे येथे २२ जानेवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी डी बाटु तंत्रशिक्षण विद्यापीठाचा सोलापूर विभागीय क्रिकेट संघ जाहीर करण्यात आला आहे.

सोलापूर विभागातील खेळाडूंची निवड चाचणी एन के ऑर्किड महाविद्यालय तळे हिप्परगा सोलापूर येथे घेण्यात आली. या निवड चाचणीचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ श्रीनिवास मेतन यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड यांच्या प्रमुख पस्थितीत झाले. यावेळी निवड समिती सदस्य सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे कोच निलेश गायकवाड, राहुल म्हेत्रे (बागलकोट), पात्रता समिती सदस्य प्रा अमित वाडवेराव, तेरणाचे प्रा खोचरे, शिवाजी अभियंत्रिकी परभणीचे प्रा वाघमारे हे उपस्थित होते.

या निवडचाचणीसाठी सोलापूर, परभणी, धाराशिव, लातूर या जिल्ह्यातील अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयातील खेळाडूंनी सहभाग घेतला. यातून आंतरविभागीय राज्यस्तरीय स्पर्धे साठी खेळाडूंची निवड झाली आहे. त्यांचे सोलापूर विभागाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ बी के सोनगे, उपप्राचार्य डॉ विनायक पत्की, प्लेसमेंट सेलचे डॉ आर आर पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. ही निवड चाचणी पार पाडण्यासाठी वामन पवार, अनुप देशपांडे, महेश गोटे, प्रमोद लिगाडे स्पोर्ट्स सेक्रेटरी गुंजाळ, गणेश कचरे यांचे सहकार्य लाभले.



**निवड झालेल्या संघातील खेळाडूंची नावे**

पृथ्वीराज चव्हाण, रोहित सोनटक्के (श्री शिवाजी,परभणी), अनिकेत मदुरे, जीशान शेख, प्रतीक दोरगे, यश पवार (एन.के. ऑर्किड, सोलापूर), राम मारेकर, धनराज भडंगे, प्रदीप बनसोडे (तेरणा, धाराशिव), अभय यादव, किरण चव्हाण, किरण चव्हाण (कर्मयोगी, पंढरपूर), यश दिंडोरी, शुभम जाधव, पृथ्वीराज गवळी (ए. जी. पाटील, सोलापूर), रविराज महमाने (फॅबटेक, सांगोला), नितीन मुंडे. मार्गदर्शक- प्रा विश्वजीत खोचरे



# कोर्ट प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेस सुरुवात

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

सोलापूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी व अधिकारी यांच्या सोलापूर डिस्ट्रिक्ट कोर्ट प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेस जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सुरवात झाली.

याचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा याच्या हस्ते व ज्येष्ठ वकील मिलिंदजी थोबडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या प्रसंगी राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष दिगंबर दादा निकम, सौ. शर्मा, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष रियाज शेख, प्रबंधक हरिदास पोटाबत्ती व मुकुंद ढोबळे, विविध कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शकील शेख, शाम राजेपांढरे, सुकृत कुलकर्णी, जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पतसंस्था चेअरमन संजय मॅकलवार, संयोजक ज्ञानेश्वर लिंबोळे, नबीलाल शेख, पवन गायकवाड, इरेश बिराजदार, रफीक पठाण आदी उपस्थित होते. या स्पर्धेचे हे १४ वे वर्ष आहे. यात शहर व सर्व तालुक्यातील १६ पुरुष संघ व ४ महिला संघानी सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेचा समारोप २६ जानेवारी रोजी होणार आहे. या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहकार्य लाभत आहे.



सोलापूर : नरसिंग मेंगजी यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना भवन खोडे, भूपाल भूमकर, संजय मेंगजी, नरेश मेंगजे, रोहित मेंगजी.

# पंढरपुरात चंद्रभागा प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर

## उच्च न्यायालयाच्या निर्देशाचे उल्लंघन



**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. २० जानेवारी-**

येथील चंद्रभागा नदीचे पावित्र्य अबाधित रहावे यासाठी चंद्रभागा नदीच्या प्रदूषणा संदर्भात दाखल असलेल्या उच्च न्यायालयातील याचिकांच्या सुनावणीच्या वेळी न्यायलयाकडून शासनाला तसेच प्रशासनाला काही कडक निर्देश देण्यात आलेले आहेत. न्यायालयाकडून देण्यात आलेल्या निर्देशांची शासनस्तरावर किंवा येथील प्रशासनाकडून तंतोतंत अंमलबजावणी होणे अपेक्षीत असताना इथे मात्र प्रशासनाकडून न्यायालयाच्या निर्णयाला अक्षरश: केराची टोपली दाखविली जात आहे. त्यामुळे चंद्रभागेचे प्रदूषण रोखण्याऐवजी वाढत चालल्याचे दिसत आहे.

चंद्रभागा नदीच्या प्रदूषणा संदर्भात उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांच्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाने चंद्रभागेचे पावित्र अबाधित रहावे यासाठी प्रशासनाला काही निर्देश दिलेले आहेत. न्यायालयाकडून काही निर्बंध देखील घालण्यात आलेले आहेत. जेणे करुन न्यायालयाच्या निर्देशांची येथील प्रशासनाकडून कडक अंमलबजावणी करुन चंद्रभागेचे पावित्र्य जपणे अपेक्षीत आहे. मात्र इथे प्रशासनाकडून केवळ चंद्रभागेच्या विविध घाटांवर न्यायालयाच्या निर्देशांची केवळ फलकावर माहिती छापण्या पलिकडे प्रत्यक्ष निर्देशाच्या अंमलबजावणीच्या नावाने चांगभले दिसून येते आहे.

कारण इथे पाहिले तर चंद्रभागा नदी मध्ये दररोज जनावरे तसेच वाहने धुतली जातात. सर्रास वाळू उपसा सुरु असल्याचे दिसून येते. पात्रात अनेक अतिक्रमणे दिसून येतात. चंद्रभागा नदीत निर्माल्य तसेच इतर साहित्य फेकलेले दिसून येते. वाळवंटात अनेक घाटांवर झोपड्या तसेच काही ठिकाणी अतिक्रमण करुन पक्की बांधकामे देखील केल्याचे आढळून येते. मात्र इथले प्रशासन धिम्म आहे. न्यायालयाच्या निर्देशांची कुठेही काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात नसल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामुळे न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे पालन प्रशासनाकडून होणार नसेल तर माते समान मानल्या जाणाऱ्या पवित्र चंद्रभागेचे प्रदूषण कोण रोखणार ? असा गंभीर सवाल नागरिकांकडूनच उपस्थित केला जात आहे.

### एकमेकांवर टोलवा-टोलवी पलीकडे काही नाही

येथील चंद्रभागा नदी तसेच वाळवंट वेगवेगळ्या सरकारी विभागांच्या अखत्यारित आडकलेली आहे. कारण चंद्रभागा नदीच्या स्वच्छतेची जबाबदारी येथील नगरपालिकेवर (सध्या काही प्रमाणात मंदिर समितीने घेतलेली) आहे. चंद्रभागेच्या पात्रातील तसेच वाळवंटातील वाळू संदर्भातील निर्णय हे महसुल प्रशासनाकडून घेतले जातात. या बरोबरच चंद्रभागेच्या पाण्या संदर्भात पाटबंधारे विभागाकडून कार्यवाही केली जाते. त्यामुळे प्रदूषण रोखण्याच्या वेळी प्रत्येक शासकीय विभाग आपआपल्या सोयीनुसार नियम दाखवित बोटचेपे धोरण स्विकारताना दिसुन येते. यासाठी चंद्रभागा नदी संदर्भात एक स्वतंत्र शासकीय मंडळ किंवा विभाग सुरु करुन त्यांनाच सर्व अधिकार देण्यात यावेत असा मतप्रवाह देखील काही सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त केला जातो.

### नमामी चंद्रभागेचा पत्ताच नाही

केंद्राच्या नमामी गंगेच्या धर्तीवर राज्य शासनाकडून मध्यंतरी नमामी चंद्रभागा अभियानाची घोषणा करण्यात आलेली होती. त्यासाठी चंद्रभागेच्या उगमा पासून ते राज्यातील शेवटच्या टोका पर्यंत चंद्रभागा निर्मळ, अविरत वाहणारी राहिल यासाठी पाऊले उचलण्यात आलेली होती. त्यासाठी शासनाकडून काही प्रमाणात निधीची देखील घोषणा करुन अनेक ठिकाणी सांडपाणी प्रकल्प देखील राबविले जात असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे जी कामे या प्रकल्पा अंतर्गत सुरु आहेत त्याचा वेग देखील मुंगीच्या गतीने आहे. सांडपाणी प्रकल्पा व्यतरिक्त या अभियनाच्या अन्य काही संकल्पना नुसत्या कागदावरच दिसून येत आहेत.

## महत्वाचे...



### समरसता साहित्य परिषद समाजजागृतीचे प्रभावी माध्यम : दिनेश मडके

**जेऊर, दि. २० जानेवारी-**

समरसता साहित्य परिषदेच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य प्रभावीपणे सुरू असून समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम परिषद सातत्याने करीत आहे, असे प्रतिपादन समरसता साहित्य परिषदेचे सोलापूर जिल्हा सहकार्यवाह तसेच करमाळा तालुका डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे तालुकाध्यक्ष दिनेश मडके यांनी केले. ते वडशिवणे (ता. करमाळा) येथे समरसता साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. गणेश पवार हे होते. यावेळी व्यासपीठावर मकाई सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक गोरख आप्पा जगदाळे, समरसता साहित्य परिषदेचे करमाळा तालुका प्रतिनिधी, कवी व लेखक सोमनाथ टकले उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. भगवंत पवार यांनी यूपीएससी परीक्षेत संपूर्ण भारतातून २३ वा क्रमांक मिळवून वैद्यकीय क्लास वन अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. समरसता साहित्य परिषदेच्या वतीने त्यांना गौरविण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरातील तरुणांना नक्कीच प्रेरणा मिळेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेमध्ये करमाळा तालुक्यात प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी पराडे व द्वितीय क्रमांक हर्षाली व्हरे यांनी मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय भाषण हभप गणेश पवार यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समरसता साहित्य परिषदेचे प्रतिनिधी सोमनाथ टकले यांनी केले. या कार्यक्रमास शिवाजी पराडे, जनार्दन राऊत उपस्थित होते.



### कर्णबधिर विद्यार्थिनीला वाढदिवसानिमित्त अनोखी भेट

**बार्शी, दि. २० जानेवारी-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत सर्व समावेशित शिक्षण या उपक्रमांतर्गत कर्णबधिर विद्यार्थिनी भक्ती सगरे हिला तिच्या वाढदिवसा दिवशी एक अनोखी भेट मिळाली. विशेष गरजा परिपूर्तीसाठी विशेषतज्ञ शिक्षक मनोज जगदाळे व केंद्रप्रमुख सोनवणे यांच्याकडून विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, वर्गशिक्षक रेवणसिद्ध दुलंगे यांच्या उपस्थितीत श्रळाले या कंपनीचे हेरिंग एड किट वाढदिवसानिमित्त प्रदान करण्यात आले. त्यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रियेला निश्चितच गती मिळाली आहे. उपक्रमाचे पालक व विद्यालयाकडून सर्व शिक्षा अभियानाचे आभार मानले.

## निधन वृत्त...

### काशीबाई बिराजदार



**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग येथील काशीबाई शांतप्पा बिराजदार (वय ८१) वर्षे यांचा वृद्धापकाळाने निधन झाला असून त्यांच्या पश्चात दोन मुली, तीन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार असून त्यांच्यावर काल मंगळवार दिनांक २० जानेवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आला. एसटी महामंडळ सेवा निवृत बसचालक शांतप्पा बिराजदार यांच्या त्या पत्नी होत.

### युगल किशोर



**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय कोषाध्यक्ष युगल किशोर यांचे लखनऊ येथे दि. १४ जानेवारी २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भागलपूर येथील देवरियास्थित शरयू घाटावर अंतिमसंस्कार करण्यात आले.

### सुदर्शन हंबीरे



**अकलूज, दि. २० जानेवारी-**

विठ्ठलवाडी (ता. माळशिरस) येथील सुदर्शन दादासाहेब हंबीरे (वय ४९) यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी सून, जावई असा परिवार आहे. सध्या ते सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वेळापूर शाखेत बँक इन्स्पेक्टर पदावर कार्यरत होते. त्यांनी विठ्ठलवाडी येथे विजय प्रताप युवा मंचाच्या माध्यमातून समाजसेवेला सुरवात केली होती. ते मराठा सेवा संघाचे तालुका उपाध्यक्ष होते.

# माढा तालुक्यातील जि.प., पंचायत समिती निवडणुकीसाठी ७०५ अर्जांची विक्री

## ३५ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२० जानेवारी-**

माढा तालुक्यातील ७ जिल्हा परिषद - व १४ पंचायत समिती गणासाठी १६ जानेवारी पासून अर्ज विक्री सुरू झाली असून २० जानेवारी पर्यंत ७०५ अर्ज विक्री झाले असून त्यातील ३५ मंगळवारी दाखल झाले आहेत. बड्या नेत्यांनी स्वतः किंवा आपल्या हस्तकांच्या वतीने अर्ज घेतले आहे.

**उमेदवारी अर्ज दाखल केलेले उमेदवाराचे नाव गट व गण -** * **भोसरे गट -** मिनाक्षी महेश पाटणे, सुनिल बापूराव रावडे, संदीप राजाराम भोसले (सर्व अपक्ष) * **मानेगाव गट -** पंडित शंकर साळुंके ( प्रहार जनशक्ती पक्ष). * **कुर्डू गट -** विजयसिंह शिरीषकुमार पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी व अपक्ष) * **उपळाई बुद्रुक गट -** माधुरी तानाजी मोरे ( भारतीय जनता पक्ष) * **बेंबळे गट -** वंदना विष्णू हुंबे ( भाजप), सुप्रिया नितीन भोगे * (अपक्ष व भाजप), सुनिता बिभिषण डांगे(अपक्ष व भाजप) * **टेंभूर्णी गट -** सुनिता संजय पाटील ( भाजप) * **अकोले खुर्द गण -** संभाजी बबनराव पाटील ( नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी व अपक्ष), आकाश बबनराव पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरद पवार) रोपळे (क) गण - सोनाली भालचंद्र पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी व भारतीय जनता पार्टी. मानेगाव गण - भारत शंकर गायकवाड, अमोल काशिनाथ लटके (अपक्ष) दारफळ गण - सोनाली मनोज साठे (अपक्ष), * **उपळाई बुद्रुक गण -** नितीन मदन झाडबुके (अपक्ष) * **भुताष्टे गण -** संतोष दत्तु दळवी (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी -शरदचंद्र पवार ), स्वाती हनुमंत गिड्डे(अपक्ष व भारतीय जनता पक्ष), रेश्मा बालाजी गिड्डे (अपक्ष) * **रांझणी गण -** सुनिता संजय पाटील, सोनाली आण्णासाहेब पाटील ( दोन्ही भाजप) * बेंबळे गण - विष्णू महादेव हुंबे ( भारतीय जनता पक्ष) * **पिंपळनेर गण -** दीपक पांडुरंग लोंढे (अपक्ष) , नितीन विठ्ठल भोगे (अपक्ष व भाजप) , बिभिषण भागवत डांगे (अपक्ष व भाजप),

# अल्पवयीन निर्भयावर बलात्कार प्रकरण; आरोपीस १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जानेवारी-**

आरोपी शिवम भारत मगर वय २७ वर्षे याने दि. २८ एप्रिल २०२४ रोजी निर्भया मुलगी राहत असलेल्या घरी अल्पवयीन निर्भया ही एकटी असताना घरात येवून तिचे हाताला धरुन तिला दिवाणावर पाडून मिठीत घेवून चुंबन घेवू लागला. त्यावेळी पिडीता नकार देत असताना आरोपीने जबरदस्तीने पिडीतेवर शारीरीक अत्याचार केला, त्यानंतर दि २९ एप्रिल २०२४ रोजी तिला लग्नाचे अमिष दाखवून फिरायला म्हणून उरळी कांचन पुणे येथे आरोपीचे बहिणीचे घरी नेले. तिथे बहिणीने निर्भया हिस तु आमच्या बाजूने जबाब नाही दिला तर तुला जिवे मारीन अशी धमकी दिली. याप्रकरणी आरोपीविरुध्द करमाळा पोलीस ठाणेस गु.र.नं २८२/२०२४ भा.दं.वि. कलम ३६३,३७६(१),५०६ व बाल लैंगिक अत्याचार कायदा २०१२ कलम ४,१७ अन्वये दि. ३० एप्रिल २०२४ रोजी गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी आरोपीस अटक करुन सबळ पुरावा गोळा करुन आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.



सरकार पक्षाच्यावतीने सदर गुन्हा शाबितीसाठी महत्वाचे ८ साक्षीदार तपासण्यात आले. यातील निर्भया हिने आरोपीविरुध्द दिलेली साक्ष महत्त्वपूर्ण ठरली आहे. निर्भया हिचे साक्षीस अनुसरुन वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता बंडगर यांनी निर्भया हिची वैदयकीय तपासणी केली. सदर वैदयकीय अधिकारी यांनी दिलेली साक्ष महत्त्वपूर्ण होती. सदर प्रकरणात तपासिक अंमलदार सहायक पोलीस निरीक्षक रोहित शिंदे यांनी सदर गुन्हाचा तपास करताना अतिशय महत्त्वपूर्ण तपास करुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा गोळा केला होता.

निर्भया हिचे बरोबर झालेल्या अत्याचाराच्या अनुषंगाने कोर्टासमोर आलेला पुरावा या सर्व बाबी कोर्टासमोर सहा. सरकारी वकील दिनेश देशमुख यांनी सर्वोच न्यायालयाचे न्यायनिर्णय मे. कोर्टासमोर मांडल्या व संपूर्णबाब रेकॉर्डवर आणली. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार नितीन ताकभाते यांनी साक्षीदारांना योग्य मार्गदर्शन करून वेळोवेळी कोर्टात हजर ठेवले. सरकार पक्षाचे वतीने करण्यात आलेला युक्तीवाद ग्राहय धरुन, आरोपीने अल्पवयीन निर्भया हिचेवर बलात्कार केला आहे. ही बाब निदर्शनास आणून देण्यात आली. सरकारी पक्षाचा युक्तीवाद व आरोपीविरुध्द आलेला पुरावा याचा विचार करता मा. विशेष जिल्हा न्यायाधीश श्री. विक्रमादित्य मांडे यांनी आरोपी शिवम भारत मगर वय २७ वर्षे, रा. नेर्ले. ता करमाळा, जि. सोलापूर यास भादंविक ३७६ (ए) अन्वये दोषी धरुन १० वर्षे सश्रम कारावास व ५०००/- हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने कारावास, भादविक ३६३ अन्वये दोषी धरुन ७ वर्षे सश्रम कारावास व २०००/- हजार रुपये दंड व दंड न भरल्यास २ महिने कारावास, बाल लैंगिक अत्याचार कायदा २०१२ कलम ४ अन्वये १० वर्षे सश्रम कारावास व ५०००/- हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने कारावास ठोठावण्यात आला. सरकार पक्षातर्फे अॅड. दिनेश देशमुख यांनी काम पाहिले. सदर गुन्हयाचा तपास सपोनि श्री. रोहित शिंदे यांनी काम केलेला होता. तसेच कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोहेकॉ/१२९० नितीन ताकभाते यांनी काम पाहिले.

# आ. अभिजीत पाटील यांचे सीना-माढा योजनेतून पाणी सोडण्याच्या सूचना

**टेंभुर्णी, दि. २० जानेवारी-**

उजनी जलाशयातून सीना-माढा सिंचन योजनेद्वारे पाणी सोडण्याचे आदेश आमदार अभिजीत पाटील यांनी कार्यकारी अभियंता सुचित्रा डुंबरे यांना दिले आहेत. या योजनेतून पाणी सोडण्यास कोणतीही अडचण नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

पावसाळा संपून तीन महिने उलटून गेल्याने सीना-माढा सिंचन योजनेच्या ४० हजार एकर लाभ क्षेत्रातील तलाव, विहिरी व बोरवेल्समधील पाणी मोठ्या प्रम ाणात आटले आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, मका, बाजरी, कडधान्ये, भुईमूग, चारा, वैरण, ऊस तसेच फळबागांना पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. याशिवाय या परिसरातील नागरिक व पशुधनासाठीही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे सीना-माढा सिंचन योजना तातडीने सुरू करून ४० हजार एकर क्षेत्रातील कोट्यवधी रुपयांच्या उभ्या पिकांचे नुकसान टाळणे आवश्यक आहे, असे आम दार अभिजीत पाटील यांनी यावेळी सांगितले.

# इंग्रजी ही देश-विदेशातील माणसे जोडणारी भाषा : डॉ. ननवरे



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

आधुनिक जगात प्रभावी आणि व्यापक संवादाची भाषा म्हणून इंग्रजी भाषा ओळखली जाते विविध देशांतील लोकांना एकमेकांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य इंग्रजी भाषेने केले आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा ही जागतिक एकात्मतेचे प्रतीक बनली आहे. असे प्रतिपादन दयानंद महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ दीपक ननवरे यांनी केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने आयोजित केलेल्या इंग्रजी भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रा डॉ. अनिलकुमार वावरे, संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे, प्रा. डॉ. विरभद्र दंडे, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक इंग्रजी विभाग प्रमुख प्रा राजशेखर पवार यांनी केले, आभार समर्थ पवार यांनी मानले. भित्तिपत्रकाम ध्ये संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन जगप्रसिद्ध इंग्रजी लेखकांचे कार्य संकेत पुजारी, रविराज कुलकर्णी, समर्थ पवार, पंचप्पा जाधव, पवन अंबुरे, आकाश कोकरे, शकुंतला कोरे, पायल कांबळे यांनी अधोरेखित केले.

# निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शीतील छात्राध्यापकांचे शिक्षक पात्रता परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथील छात्राध्यापकांनी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी शिक्षक पात्रता परीक्षा दि. २३ नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल दि. १७ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये अध्यापक विद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केलेले आहे

सर्वश्री. भापकर रवींद्र शहाजी (पेपर क्रमांक - १), पवार नितीन बजरंग (पेपर क्र.१ व २), घिगे विठ्ठल रवींद्र (पेपर क्र. -१), गव्हाणे दत्तात्रेय जालिंदर (पेपर क्र. १), गोसावी संभाजी उत्तरेश्वर (पेपर क्र. -१), देवकर गणेश जगन्नाथ (पेपर क्र. १), मांजरे जयराम शंकर (पेपर क्र. १), शिंदे प्रविण भिमराव ( पेपर क्र. १), माने गणेश अरुण (पेपर क्र. १), मोकाशी अजय अज्ञान (पेपर क्र. १), कु.चौधरी ऐश्वर्या रवींद्र (पेपर क्र. १ व क्र. २), कु. मोमीन अफरोज आयुब (पेपर क्र. १), इंगोले श्वेता दत्तात्रेय (पेपर क्र. १)

वरील सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी. वाय.यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जे.सी.शितोळे व संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य व शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे शालेय समितीचे चेअरमन डॉ. जी. एम. पाटील, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य.डी.पी गुंड यांनी अभिनंदन केले.

# ग्रामविकास अधिकारी, अंगणवाडी सेविकेच्या प्रसंगावधानमुळे विद्यार्थिनीचे वाचले प्राण



## गोरमाळे येथील कौतुकास्पद घटना

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २० जानेवारी-**

कर्तव्याच्या पलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी जपल्यास एखाद्याचे प्राण कसे वाचवता येतात, याचा प्रत्यय सोलापूर जिल्ह्यातील गोरम ाळे येथे आला आहे. शाळेतून घरी जात असताना अचानक चक्कर येऊन पडलेल्या पाचवीतील विद्यार्थिनीला वेळेवर मदत मिळवून दिल्याने तिचे प्राण वाचले आहेत. या कामगिरीबद्दल ग्रामविकास अधिकारी विजयलक्ष्मी पवार आणि अंगणवाडी सेविका सुशीला सोनवणे यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे गोरमाळे येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता ५ वी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी अदिती गोपीनाथ भुसारे ही दुपारी सुट्टीच्या वेळी घरी जात होती. 'पोस्ट चौकात' पोहचली असता, तिचा रक्तदाब (BP) अचानक कमी झाल्याने तिला अंधारी आली आणि ती जागीच बेशुद्ध पडली. त्याचवेळी तेथून जात असलेल्या गोरमाळे ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी पवार यांनी प्रसंगावधान राखले. मुलगी बेशुद्ध असल्याचे लक्षात येताच ग्रामसेविका विजयालक्ष्मी पवार आणि उपस्थित अंगणवाडी सेविका सुशीला सोनवणे यांनी धाव घेतली. त्यांनी वेळ न घालवता तात्काळ १०८ रुग्णवाहिकेला फोन करून पाचारण केले. रुग्णवाहिका येईपर्यंत त्यांनी मुलीला धीर दिला आणि प्रथमोपचार मिळवून दिले. रुग्णवाहिका आल्यानंतर मुलीला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलीचा रक्तदाब खूपच कमी झाला होता. जर तिला वेळेवर रुग्णालयात पोहोचवले नसते, तर तिच्या जीवाला धोका निर्माण झाला असता. ग्रामविकास अधिकारी पवार आणि अंगणवाडी सेविका सुशीला सोनवणे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अदितीचे प्राण वाचले आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/





# पालकमंत्री गोरे, खा.शिंदे यांच्यात रंगले वाकयुध्द



**पालकमंत्री जयाभाऊंची खोचक टीका**

**प्रणितीताई म्हणाल्या, मी लक्ष देत नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

पालकमंत्री जयकुमार गोरे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्यात महापालिका निवडणुकीच्या पराभवानंतर वाक्युध्द सुरू झालेले दिसत आहे. पालकमंत्र्यांच्या खोचक टीकेला खासदार प्रणिती शिंदे यांनी देखील जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीत विरोधकांचा धुवा उडवत भाजपने सोलापूर महापालिकेत ७५ पार करत ८७ जागा मिळवत घवघवीत यश प्राप्त केले.

काँग्रेसचा दारुण पराभव झाला. काँग्रेसच्या वाट्याला केवळ दोन जागा आल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांना उभारी देण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी पत्र लिहिले. हे पत्र सोशल मीडियावर व्हायरस झाल्यानंतर पालकमंत्र्यांनी त्याचा खरपूस समाचार घेताना, पन्नास फूट खाली पडले तरी पाय वरतीच आहेत, असे खोचक टीका पालकमंत्री गोरे यांनी केली. यावर खासदार प्रणिती शिंदे यांनी उत्तर देताना म्हणाल्या, पालकमंत्री हे पूर्वा श्रमीचे काँग्रेसचे होते. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मी पत्र लिहिले होते. त्यामुळे त्यांनी ते वाचले असावे. परंतु त्यातून पालकमंत्र्यांनी वेगळा अर्थ काढला असावा. म्हणून त्यांच्या बोलण्याकडे मी फारसे लक्ष देत नाही. सत्ता पहिल्यांदाच पाहत असल्यामुळे त्यांच्या तोंडून असे वाक्य निघत आहेत.

## माळशिरस
### ७ गटातून ११ अर्ज

**माळशिरस :** जिल्हा परिषदसाठी ७ गटामधून ११ तर पंचायत समितीसाठी सात गणा मधून १० असे २१ अर्ज दाखल झाले आहेत. एकूण ४५२ अर्जांची विक्री झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली. मांडवे गटातून १, संग्राम नगर १, माळीनगर २, बोरगाव १,वेळापूर १, निमगाव २, पिलीव ३ असे ११ अर्ज दाखल झाले. पंचायत समितीसाठी गुरसाळे गणातून काल १ व आज २ असे तीन, कान्हेर २, फोंडशिरस १, मेडद १, यशवंतनगर १, गोरडवाडी १, पिलीव १ सात गणातून १० असे आज अखेर २१ अर्ज दाखल झाले. अर्ज दाखल करण्याचा उद्या अंतिम दिवस आहे.

# श्री मश्रुम गणपती मंदिरात बुधवारी रात्री अभिषेक

**कसबा गणपतीकडून मूर्तीची पालखीतून मिरवणूक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पांची जयंती गुरुवारी सर्वत्र साजरी करण्यात येणार आहे. शहरातील विविध गणेश मंदिरात श्रीगणेश जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रम आणि विधींचे आयोजन करण्यात आले आहे. तुळजापूर रोडवरील नवसाला पावणारा मश्रुम गणपती मंदिरात पहाटे अडीचपासून अभिषेक सोहळा सुरू होणार आहे. पहाटे साडेपाचला आरती दुपारी बारा वाजून पाच मि निटांनी गुलाल आरती संपन्न केली जाणार आहे.



१५ ते १८ हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केल्याची माहिती, मंदिर प्रमुख संजय पतंगे यांनी दिली. पहाटे साडेपाचला आरती होईल. तुळजापूर व सोलापूर परिसरातील हजारो भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. गणेश जयंती निमित्त शहरातील अनेक मंदिरांत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. कसबा गणपतीकडून मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढण्यात येणार आहे. श्री गणेशांच्या चांदीच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. दीड ते दोन हजार भाविकांना पुरीभाजी, शिरा, मसाला भात असा महाप्रसाद आहे. ता. २२ रोजी सकाळी साडेसातला मल्लिकार्जुन मंदिराजवळून मिरवणूक निघणार आहे. सकाळी सहापासून अभिषेक, सात ते अकरा गणेश याग, दुपारी पाळणा, गुलाल. दुपारी एकनंतर महाप्रसाद. पौरोहित्य गिरी स्वामी, सिध्दू स्वामी करणार आहेत. भाविकांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन मंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष सोमानाथ भोगडे, उत्सव अध्यक्ष बाळासाहेब मुस्तारे यांनी केले आहे.

## महत्वाचे...

### स्वर अलंकार म्युझिक अकॅडमीच्या वतीने सोलापुरात आज पहिले संगीतमय स्नेहमिलन

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

मुंबई येथील स्वर अलंकार म्युझिक अकॅडमीच्या वतीने सोलापुरात बुधवार, २१ जानेवारी रोजी डफरीन चौक येथील आयएमए हॉल येथे पहिले संगीतमय स्नेहमिलन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती श्रीकांत कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्वरा अलंकार अकॅडमीच्या वतीने सोलापुरातील हौशी गायकांना गायनाचे प्रशिक्षण आणि संधी देण्यात येत आहे. हा कार्यक्रम केवळ आमंत्रितांसाठीच आहे. यावेळी सुनील मदान, श्रीकांत कुलकर्णी, अरविंद देशमुख, डॉ.पाटणकर, डॉ.श्रध्दा रोडगे हे विविध गीते सादर करणार आहेत. श्रीकांत कुलकर्णी हे गायक मुकेश यांची गाणी सादर करणार आहेत. इच्छुक गायकांनी या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी सुनील मदान (कुकरेजा स्पोर्टस) येथे संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. या पत्रकार परिषदेस सुनील मदान, अरविंद देशमुख उपस्थित होते.



### शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत मेहता शाळेचे यश

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**


शासकीय रेखाकला परीक्षा २०२५ मध्ये कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेतर्फे एकूण ९८ विदयार्थी प्रविष्ट झाले होते. एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट दोनही परीक्षांचा निकाल १०० टक्के लागला. श्रेणीत ५३ विद्यार्थी, इ श्रेणीत ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, परीक्षा नियंत्रक नागेश वाघमोडे, पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर यांनी अभिनंदन केले.



### भावी पदाधिकाऱ्यांच्या दालनाची सीईओ जंगम यांच्याकडून पाहणी

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

तब्बल नऊ वर्षानंतर सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासह विषय समितीचे सदस्य निवडले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि.२० जानेवारी रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आगामी जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांच्या दालनाची पाहणी केली. याप्रसंगी कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समितीच्या सभापतींची दालने अद्ययावत करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाला दिल्या.



### तडीपार आरोपीकडून १४ लाखांचे १११ मोबाईल जप्त

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

तडीपार आरोपीनी चोरी केलेले एकुण १३ लाख ९२ हजार ९९८ रुपये किंमतीचे १११ मोबाईल जेलरोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास जप्त करण्यात यश आले. जेलरोड पोलीस ठाणेकडील पोकॉ संतोष वायदंडे, कल्लप्पा देकाणे यांना गुप्त बातमीदारमार्फत १७ जानेवारी २०२६ रोजी एक इसम चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी इक्बाल मैदान येथे येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्यावरुन जेलरोड पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख सपोनि संदीप पाटील व पथकातील अंमलदार हे त्याठिकाणी जावुन सापळा लावला असता त्याठिकाणी एक इसम मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव फारुक महमद हनिफ पठाण असे सांगितले. या इसमास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता शहरातुन तडीपार आरोपी गणेश उर्फ आप्पा तुकाराम बैरुणगी, लखन तुकाराम वैरुणगी (रा. दोघे राहुल गांधी नगर झोपडपट्टी सोलापुर) यांनी शहरातुन विविध ठिकाणाहुन चोरी करुन विक्री करिता आणुन दिले असल्याची कबुली दिली.



# कलेतून भारतीय संस्कृती जोपासा : प्रशांत देशपांडे

**'युवा स्पंदन' सांस्कृतिक महोत्सवाचा प्रारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

ओवी, अभंग, अंगाई गीत, लोकनृत्य आणि लोककलेच्या माध्यमातूनच भारतीय संस्कृती शतकानुशतके जिवंत राहिली आहे. या कलांमुळेच आपली सांस्कृतिक ओळख टिकून आहे. आजच्या नव्या पिढीने या लोककलांची उपासना करून भारतीय संस्कृती जपावी, असे आवाहन ज्येष्ठ गायक व संगीतकार प्रशांत देशपांडे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित 'युवा स्पंदन सांस्कृतिक महोत्सव २०२५२६' या दोन दिवसीय महोत्सवाचा शुभारंभ विद्यापीठ परिसरात देशपांडे यांच्या हस्ते झाला. उद्घाटनप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते.

यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले.

उद्घाटन समारंभा नंतर संकल्पना नृत्य, हिंदी व मराठी वक्तृत्व स्पर्धा, सुगमगायन, मेहंदी, समूहनृत्य, फोटोग्राफीच्या स्पर्धा झाल्या सूत्रसंचालन डॉ. ममता बोल्ली व प्रा.श्रुती देवळे यांनी केले, तर आभार डॉ. राजेंद्र वडजे यांनी मानले.

# महानगरपालिकेचे महापौर पद धनगर समाजाला मिळावे

**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

महानगरपालिकेचे गेल्या वीस वर्षाच्या कालावधीत एकदाही धनगर समाजाचा महापौर झाला नसल्याची खंत धनगर समाजात असून यावेळी सोलापूर महानगर पालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने धनगर समाजाच्या नऊ उमेदवारांना उमेदवारी देऊन निवडून आणले आहेत. भारतीय जनता पक्षाने धनगर समाजाला न्याय दिल्याची भावना धनगर समाजाची झाली. महापौर पद धनगर समाजाला मिळावे, अशी मागणी करण्यात आली.



सोलापूर शहरातील धनगर समाजातील ज्येष्ठ नेते मंडळी आणि कार्यकर्ते यांची महत्त्वाची बैठक झाली. तीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, शहरध्यक्षा रोहिणी तडवळकर, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. विजयकुमार देशमुख,आ. सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे यांचे आभार व्यक्त करताना धनगर समाजाला महापौर पद देण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली. यावेळी शिवलाल काळे, प्रशांत फत्तेपूरकर, प्रा.देवेंद्र मदने, अमोल कारंडे, समीर सलगर, श्रीमंत हाके, प्रभाकर पडवळकर, प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे, सदाशिव होनमाने, प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य सिध्दारुढ बेडगनूर, श्रीराम पाटील, विलास पाटील, प्रा.दत्त डांगे, प्रा.धनाजी भानवसे, प्रा.शंभूदेव गावडे, शहाजी ठोंबरे, अविनाश आलदर, रामभाऊ वाकसे, मुख्याध्यापक अण्णाप्पा सत्तूबर, संतोष पैकेकरी, डॉ. तानाजी कोळेकर, सूर्यकांत होनमाने, राजकुमार देवकते, उज्वलकुमार माने, बिसलसिध्द काळे उपस्थित होते.

# फसवणूक केलेल्या गुन्ह्यातील आरोपीचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

गुप्तधन काढून देतो म्हणून फसवणूक केलेल्या गुन्ह्यातील आरोपीचा जामीन मंजूर करण्यात आला. राजू विनायक आडम यांनी दि. ५/१०/२०२५ रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ८३७/२०२५ प्रमाणे दिलेल्या फिर्यादीवरून दि.०५/०९/२०२३ ते मार्च-२०२४ मोहम्मद कादर शेख व त्याचे साथीदार इम्रान, तमीम कुरेशी, आयुब रचभरे, सचिन गायकवाड, दाउद प्रठाण, वाघमारे यांनी फिर्यादीची फसवणुक केली.



गुप्त धनाचा हंडा काढून देण्याचे अमिष दाखवून, काहीतरी द्रव्य पिण्यास देवून जादुटोणा केला व त्याकरीता त्यांच्याकडून वेळोवेळी रक्कम रुपये १,२६,३४,६००/-रू घेतले. काहीएक चिजवस्तू न देता फसवणूक केलेली आहे. वगैरे मजकुराच्या फिर्यादवरुन भारतीय दंड संहिताचे कलम ४२०, ४१७, ४०६ व महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ (२) प्रमाणे दाखल केला होता. सर्व आरोपीं विरुद्ध जेल रोड पोलीस ठाणे येथे सुद्धा गु.र.नं.५१५/२०२५ अन्वये वरील कलमाप्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यानंतर आरोपींना तारीख १७/१०/२०२५ रोजी अटक करण्यात आली व कोर्टासमोर हजर करण्यात आले होते तेंव्हापासून सदरचे आरोपी हे न्यायालयीन कोठडीत होते. त्यानंतर आरोपी सचिन गायकवाड यांच्या वतीने ॲड.डी.एन. भडंगे व ॲड. एन.एन. भडंगे यांच्यामार्फत जामीन अर्ज ठेवण्यात आला होता. जामीन हा नियम आहे. तुरुंग हा अपवाद आहे व केवळ आरोप गंभीर आहेत म्हणून जामीन नाकारणे योग्य नाही. आरोपी दोषी ठरेपर्यंत तो निर्दोष मानला जातो. तपास पूर्ण झाल्यानंतर कोठडी आवश्यक राहत नाही अशा प्रकारचे सुप्रीम कोर्ट दिल्ली यांचे निवाडे आरोपींना जामीन मिळावा, असा युक्तिवाद करण्यात आला.

# मार्कंडेय जन्मोत्सव; आज पालखी प्रदक्षिणा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी**

पद्मशाली समाज कुलदैवत श्री मार्कंडेय जन्मोत्सवानिमित्त आज पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या वतीने मंदिरात पाळणा आणि पालखी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने महापालिका निवडणुकीत विजयी झालेल्या समाजातील १७ नगरसेवकांचा सन्मानही होईल, अशी माहिती ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांनी दिली.

१४ जानेवारीपासून श्री मार्कंडेयरचित दुर्गासप्तशती ग्रंथाच्या सामूहिक पारायणाला सुरुवात झाली. तसेच समाजातील काही युवकांनी ११ जानेवारीपासून मार्कंडेय दीक्षा घेतली. त्यांचे व्रतही सुरू झाले. या दोन्ही उपक्रमांची सांगता बुधवारी होईल. सकाळी साडेसातला अध्यक्ष फलमारी यांच्या हस्ते मंदिरावर पद्मपताका चढवण्यात येणार आहे. त्यानंतर मूळमूर्तीला उद्योजक सिद्धेश्वर गड्डम यांच्या हस्ते महारूद्राभिषेक होईल. प्रभाकर बुरा आणि जयश्री बुरा यांच्या हस्ते होमहवन होणार आहे. मंदिर प्रदक्षिणा घातल्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम आहे. पद्मशाली समाज बंधू, भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष महांकाळी येलदी, सरचिटणीस संतोष सोमा यांनी केले आहे.

**पद्मशाली समाजातील नगरसेवकांचा सन्मान**

महापालिका निवडणुकीत सर्वाधिक पद्मशाली समाजातील नगरसेवक निवडून आले. हातून शहराचा विकास व्हावा, वस्त्रोद्योगाची भरभराट होण्यास मदत व्हावी, या अपेक्षेने गौरव करण्याचे ठरले आहे.

**- सुरेश फलमारी, अध्यक्ष, पद्मशाली ज्ञाती संस्था**

**पद्मशाली शिक्षण संस्थेतर्फे रक्तदान शिबिर**

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिरायोजन आहे. कुचन प्रशालेच्या प्रांगणात सकाळी नऊला त्यास प्रारंभ होईल. यंदा एक हजार दाते रक्तदान करतील, असे नियोजन केले आहे.

**- दशरथ गोप, सचिव, पद्मशाली शिक्षण संस्था**

# सुरेल संगीत संध्यातून कै.सिद्धा पाटील यांना कृतज्ञतेचे भावपूर्ण अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२० जानेवारी-**

पित्याच्या स्मृती जतन करणे हे केवळ कौटुंबिक कर्तव्य नसून, तो एक सांस्कृतिक वारसा जिवंत ठेवण्याचा उदात्त प्रयत्न आहे. कै. सिद्धा पाटील स्मृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली संगीत संध्या ही केवळ एक मैफल न राहता, ती कृतज्ञता आणि स्मरणाचा एक अनोखा सोहळा ठरली. या स्वरमयी अभिवादनातून सोलापूरच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर पडली आहे.



कै. सिद्धा पाटील स्मृती समिती आणि नाट्य आराधना, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कै. सिद्धा पाटील यांच्या २८ व्या स्मृतिदिनानिमित्त लोकमान्य टिळक सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला ज्येष्ठ रंगकर्मी प्रफुल्लचंद्र आहेरकर यांचे प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नाट्यकलाकार विजय साळुंखे व ज्येष्ठ प्रकाश योजनाकार शशिकांत बटणे यांना स्मृतीगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ इरेश स्वामी म्हणाले की, ''एखाद्या व्यक्तीच्या पश्चात त्यांच्या स्मृती संगीताच्या माध्यमातून जागवणे, ही त्यांना वाहिलेली सर्वात मोठी श्रद्धांजली आहे. सिद्धा पाटील यांचे कलाप्रेम त्यांच्या वारसांनी अशा पद्धतीने जिवंत ठेवले आहे, हे कौतुकास्पद आहे. आजच्या धावपळीच्या युगात अशा शास्त्रीय आणि निखळ सांगीतिक कार्यक्रमांची समाजाला मोठी गरज आहे. कलाकारांचा सन्मान करणे म्हणजे संस्कृतीचे संवर्धन करणे होय.''

कार्यक्रमाची सुरुवात राग मारुबिहागने झाली. छोटा ख्याल, तीनताल आणि तराना सादर करत कलाकारांनी शास्त्रीय संगीताचा कस दाखवला. त्यानंतर नाट्यसंगीताने रसिकांना मंत्रमुग्ध केले. सौभाग्यदा लक्ष्मी बारम्मा या कानडी भजनाने आणि पावलो पंढरी वैकुंठ भुवन या राग तिलंगमधील रचनेने आध्यात्मिक वातावरण निर्मिती केली. कार्यक्रमाचा कळस विठ्ठल विठ्ठल गजरीने झाला, ज्याने संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले.

तबल्यावर नितीन दिवाकर तर संवादिनीवर ओंकार पाठक यांनी आपल्या बहारदार साथीने रंगत आणली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन मंजुषा गाडगीळ यांनी केले. याप्रसंगी मल्लिनाथ पाटील, अँड. आर. एस. तथा बाबू पाटील आणि पाटील परिवारातील सदस्यांनी सर्व कलाकार व पाहुण्यांचे स्वागत केले.



# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शिवसेना ताकतीने सज्ज : भुसे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, या पार्श्वभूमीवर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री तथा शिवसेनेचे ज्येष्ठ नेते दादा भुसे यांनी सोलापूर दौऱ्यावर आले होते. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शिवसेना संपूर्ण ताकतीने सज्ज आहे. स्नमानपूर्वक जागा मिळाल्यास युती बाबत आज दी.२१ जानेवारी दुपारी १२ पर्यंत ठरणार असल्याची माहिती दादा भुसे यांनी दिली.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी तयारीला लागण्याच्या स्पष्ट सूचना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अमर पाटील यांना दिल्या. संघटन बळकट करून तळागाळापर्यंत पोहोचण्यावर भर देण्याचे निर्देशही देण्यात आले. महानगरपालिकेनंतर आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीमुळे सोलापूरच्या राजकारणात शिवसेनेच्या हालचाली अधिक वेगवान झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत असून, आगामी निवडणुकीत शिवसेना आक्रमक भूमिकेत उतरण्याचे संकेत मिळत आहेत. या दौऱ्यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी मंत्री दादा भुसे यांचे सोलापुरात श्री स्वामी समर्थांची मूर्ती भेट देऊन स्वागत केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नगरसेविका सौ. अदिती पाटील कव्हेकर यांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० जानेवारी :** लातूर शहर महानगरपलिकेच्या नगरसेवकपदी सौ.अदिती अजित पाटील कव्हेकर यांची निवड झाल्याबद्दल अखिल भारतीय वीरशैव वाणी लिंगायत संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष गुलाब पाटील यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, नूतन नगरसेविका सत्यवती संतराम चेवले, अखिल भारतीय विरशैव लिंगायत वाणी समाजाचे लातूर शहराध्यक्ष महेश तोंडारे, भाजपा किसान मोर्चा शहर जिल्हाध्यक्ष तानाजी झुंजे पाटील, लातूर तालुकाध्यक्ष बालाजी बुलबुले, लातूर जिल्हा उपाध्यक्ष कल्याण घुगरे, लातूर जिल्हा शहर उपाध्यक्ष गुरूनाथ मिरजगावे, लातूर जिल्हा युवा अध्यक्ष विश्वासदादा अंबेकर, कमलकिशोर मंत्री आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गुलाब पाटील यांनी सौ. कव्हेकर यांच्या भावी राजकीय कारकीर्दीस शुभेच्छा देऊन त्यांच्याकडून समाजोपयोगी कामे गतीने होतील, असा विश्र्वास व्यक्त केला. या सत्काराला उत्तर देताना अदिती कव्हेकर यांनी ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सामान्यांच्या हितासाठी विविध विकास कामे राबविण्यावर आपण भर देऊ असे सांगितले.



# कचरापेटीतून घडवून आणली स्वच्छतेची कार्यशाळा !

## आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** स्वच्छ आणि सुंदर शहर घडवण्यासाठी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एक आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. चित्रकला आणि कचरा प्रश्न प्रबोधन हे दोन्ही उद्देश साध्य करत विद्यार्थ्यांनी तब्बल ३०० कचरापेट्या रंगवून त्यावर अर्थपूर्ण चित्रे व संदेश रेखाटले.

वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनाबरोबरच कचरा व्यवस्थापनावर विशेष लक्ष केंद्रित करणाऱ्या आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनकडून शहरात विविध ठिकाणी मोफत कचरापेट्यांचे वाटप सुरू आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना कचरा प्रश्नांची जाणीव व्हावी व प्रत्यक्ष कृतीतून प्रबोधन घडावे, या उद्देशाने चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मंगळवारी जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात कचरापेट्या रंगवत "Use me', 'माझा खाऊ मला द्या' यासारखे संदेश देत स्वच्छतेचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचवला.



यावेळी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन तर्फे बाळासाहेब बावणे यांनी विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगितले. घरातील व दुकानातील कचरा इकडे-तिकडे न फेकता कचरापेटीतच टाकावा, उघड्या प्लॉटवर, रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला कचरा फेकल्याने शहर अस्वच्छ होते, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

कचरा कचरापेटीत साठवून घंटागाडी आल्यानंतर त्यातच द्यावा, तसेच ही बाब विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन बावणे यांनी केले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. पवन लड्डा, दयाराम सुडे, बालाजी उमरदंड, मयुरी काळे, एड. किरण चिंते, सुवर्णा महाजन, दिपक नावाडे तसेच जिजामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक देविदास कोल्हे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेला हा उपक्रम स्वच्छतेचे संस्कार रुजवणारा आणि शहराच्या कचरा व्यवस्थापनासाठी दिशादर्शक ठरणारा असल्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## शिक्षकांच्या ऑनलाईन जिल्ह्यांतर्गत आंतरजिल्हा बदल्या लवकरच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** जिल्हा परिषद शिक्षकांची ऑनलाईन जिल्ह्यांतर्गत व आंतरजिल्हा बदली प्रक्रिया २०२६ लवकरच सुरू होणार असून, व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे तशा आशयाच्या सूचना संबंधित जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. . वर्ष २०२६ च्या आगामी जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रियेच्या अनुषंगाने ७ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या पत्रान्वये वेळापत्रक व १८ जून २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील विविध मुद्यांबाबत चर्चा झाली. जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रिया २०२६ संबंधी कार्यवाही करताना शिक्षण आयुक्तांकडून २०२५-२६ ची संचमान्यता प्राप्त होताच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन व समानीकरण याबाबतची कार्यवाही ७ नोव्हेंबर २०२४ च्या वेळापत्रकानुसार करायची आहे. सर्व जिल्हा परिषदांनी जिल्ह्यांतर्गत बदली प्रक्रियेकरिता शिक्षकांच्या याद्या प्रसिद्ध करायच्या असून, प्राप्त आक्षेपांवर निर्णय घेणे, याबाबतची कार्यवाही ३१ मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करायची आहे. ज्या जिल्हा परिषदांनी अवघड क्षेत्र घोषित केलेले नाही, अशा जिल्हा परिषदांनी १५ मार्चपर्यंत अवघड क्षेत्र घोषित करण्याची कार्यवाही करायची आहे. अवघड क्षेत्राच्या निकषांत भौगोलिक व स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन बदल करण्याचे अधिकार सीईओंच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आले आहेत. यात ३ अटींची पुर्तता होणे आवश्यक असून, शिक्षण आयुक्त यांच्याकडून संचमान्यता प्राप्त होताच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून त्यानुसार अद्ययावत बिंदू नामावल्या पोर्टलवर अपलोड करण्यास सूचवले आहे.

## जिल्हास्तरीय निवडणूक खर्च सनियंत्रण कक्ष

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** जि. प., पं. स. निवडणुकीत उमेदवार व राजकीय पक्षांचा होणारा खर्च मर्यादेत होण्याची कार्यवाही करण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हास्तरीय निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सुद्धा संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अधिनस्थ निवडणूक खर्च कक्ष स्थापन केले आहेत. जिल्हास्तरीय खर्च सनियंत्रण कक्षात नोडल अधिकारी म्हणून जि. प.चे कॅफो राजेंद्र नागणे तर सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून लेखाधिकारी सतीश दोडके, लेखाधिकारी अभिजित इटोलीकर यांची नियुक्ती केली आहे. नोडल अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी कक्षात सहाय्यक लेखाधिकारी सुरेंद्र सुरवसे, श्याम बडोदे, व्यंकटेश कुलकर्णी, मनोज येरोळे व श्रीप्रसाद बुरसे यांची नेमणूक केली आहे. जि. प., पं. स. निवडणूक प्रचारार्थ होणाऱ्या खर्चासंदर्भात काही प्रश्र्न उद्भवल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अथवा जिल्हा खर्च संनियंत्रण कक्षात संपर्क साधण्याचे आवाहन नोडल अधिकारी राजेंद्र नागणे यांनी केले आहे.

## दयानंद महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांचे श्रमदान; ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेची जनजागृती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लातूर तालुक्यातील चिंचोली राव येथे विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबिर सध्या उत्साहात सुरू आहे. या शिबिराअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी गावामध्ये व्यापक स्वरूपाचे स्वच्छता अभियान राबवून संपूर्ण गाव स्वच्छ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.



शिबिरादरम्यान स्वयंसेवकांनी रस्ते, गटारे, सार्वजनिक ठिकाणे, मंदिर परिसर व ग्रामपंचायत परिसराची स्वच्छता केली. कचरा संकलन, प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट तसेच ओल्या व सुका कचरा व्यवस्थापनाबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी स्वच्छ गाव, सुंदर गाव हा संदेश देत स्वच्छतेचे आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व ग्रामस्थांना समजावून सांगण्यात आले. सदर राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबिर दिनांक १७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न होत असून दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत स्वयंसेवकांकडून श्रमदान केले जात आहे. स्वच्छता अभियानासोबतच स्वच्छता जनजागृती रॅली, झाडांचा वाढदिवस साजरा करणे, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक प्रबोधन असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानाला चिंचोली राव गावातील ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वयंसेवकांच्या कार्यात सहभाग नोंदविला. राष्ट्रीय सेवा योजना ही मी नाही, आम्ही या ब्रीदवाक्याची प्रचिती देत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी ठरत असल्याचे चित्र या शिबिरातून स्पष्टपणे दिसून येत आहे. या स्वच्छता अभियानसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, सह-कार्यक्रमाधिकारी प्रा. योगेश शर्मा, कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. निलेश मंत्री, प्रा. विशाल चव्हाण, डॉ. प्रिया वर्मा, प्रा. निकिता अग्रवाल, प्रा. मेरवान राठोड, प्रा. अक्षय राजुरवार, प्रा. कल्पना टप्पेकर, प्रा. सोनाली सास्तूरकर, प्रा. सुहास क्षीरसागर, विद्यार्थी प्रतिनिधी राहुल कुलकर्णी, सायली शेळके, गणेश सर्जे, अपूर्वा कदम आदींनी परिश्रम घेतले.

## निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाची स्थापना


**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** जि. प., पं. स. निवडणुकीत उमेदवार व राजकीय पक्षांचा होणारा खर्च मर्यादेत होण्याची कार्यवाही करण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जिल्हा परिषद कार्यालयात जिल्हास्तरीय निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सुद्धा संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अधिनस्थ निवडणूक खर्च कक्ष स्थापन केले आहेत. जिल्हास्तरीय खर्च सनियंत्रण कक्षात नोडल अधिकारी म्हणून जि. प.चे कॅफो राजेंद्र नागणे तर सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून लेखाधिकारी सतीश दोडके, लेखाधिकारी अभिजित इटोलीकर यांची नियुक्ती केली आहे. नोडल अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी कक्षात सहाय्यक लेखाधिकारी सुरेंद्र सुरवसे, श्याम बडोदे, व्यंकटेश कुलकर्णी, मनोज येरोळे व श्रीप्रसाद बुरसे यांची नेमणूक केली आहे. जि. प., पं. स. निवडणूक प्रचारार्थ होणाऱ्या खर्चासंदर्भात काही प्रश्र्न उद्भवल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अथवा जिल्हा खर्च संनियंत्रण कक्षात संपर्क साधण्याचे आवाहन नोडल अधिकारी राजेंद्र नागणे यांनी केले आहे.


## तळागाळातील समाजासाठी ॲड. गोमारे यांचे योगदान उल्लेखनीय : बी.बी. ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** कर्मयोगी ॲड. मनोहरराव गोमारे यांनी तळागाळातील समाजासाठी आयुष्यभर निष्ठेने कार्य केले. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असून ते विचारांची धगधगती मशाल होते. समाजाला योग्य दिशा देण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले, असे प्रतिपादन बी. बी. ठोंबरे यांनी केले.



लातूर एज्युकेशन सोसायटी, लातूर यांच्या वतीने आयोजित ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या जयंतीनिमित्त व वार्षिक स्नेहसंमेलन तसेच बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ सदस्य प्रा. नागनाथराव कनामे होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, सचिव डी. एन. शेळके, उपाध्यक्ष प्रल्हादराव दुडीले, संचालक प्रा. प्रकाशराव शिंगडे, नाथराव कोले, हरिभाऊ येरमे, चंदूलाल बलदवा, प्राचार्य संजय मलवाडे, उपप्राचार्य माधव क्षीरसागर, पर्यवेक्षक हणमंत बैनगिरे, संजय कासले, मुख्याध्यापक उत्तमराव केसाळे, मुख्याध्यापिका श्रीमती एस. पी. साबदे आदी मान्यवर उपस्थित होते. ठोंबरे यांनी ॲड. गोमारे यांच्या सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख करताना सांगितले की, त्यांनी सामाजिक न्यायासाठी सातत्याने लढा दिला. त्यांचे कार्य सर्वांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहणार आहे. यावेळी प्रा. नागनाथराव कनामे, विक्रम गोजमगुंडे व डी. एन. शेळके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात दिनदर्शिका, विज्ञान प्रयोगवही व टी-शर्टचे विमोचन करण्यात आले. कु. स्नेहा कारभारी या विद्यार्थिनीला 'ज्ञानेश्वर भूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नळदुर्ग येथील 'आपलं घर' या संस्थेस १ लाख १८ हजार ५०० रुपयांची देणगी दिली. यावेळी विविध गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य संजय मलवाडे यांनी केले. सूत्रसंचालन विश्वनाथ खंदाडे यांनी केले. आभार उपप्राचार्य माधवराव क्षीरसागर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख माया अनिगुंठे यांनी विशेष पुढाकार घेतला. यावेळी विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरूवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या माध्यमातून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.

राज्य शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित तथा प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडीओ व्हिज्युअल डिस्प्ले), ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे आदींचा समावेश होतो.

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती स्थापण्यात आली आहे. समितीत पोलिस अधीक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी, अपर जिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार हे सदस्य, तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव आहेत.

प्रस्तावित जाहिरात प्रसारित तथा प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करावा लागेल. पूर्व प्रमाणनाच्या अर्जासमवेत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेसोबत दिलेला आहे.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६: लातूर तहसील कार्यालयात उमेदवारांच्या मदतीसाठी कक्ष स्थापन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने लातूर तालुक्यातील निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी निवडणूक संबंधित नोडल अधिकारी यांची बैठक घेतली. या बैठकीत नामनिर्देशन पत्र स्वीकारणी, माघार, आचारसंहिता अंमलबजावणी, पथके स्थापना आदी बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासाठी दोनच दिवस शिल्लक असून नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींसाठी मदत कक्ष स्थापन करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. लातूर तालुक्यातील सर्व उमेदवारांनी वेळेत नामनिर्देशन पत्र सादर करावे व आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती नऱ्हे-विरोळे यांनी केले.



बैठकीस सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी श्याम गोडभरले, नायब तहसीलदार गणेश सरोदे, नायब तहसीलदार सुधीर देशमुख तसेच तहसील कार्यालय व निवडणूक नियुक्त अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेली निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याची प्रक्रिया २१ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी ११ ते ३ या कालावधीत चालणार आहे. नामनिर्देशन पत्र माघार घेण्याचा कालावधी २३ ते २७ जानेवारी २०२६ पर्यंत असून, वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ राहील. मात्र, २५ व २६ जानेवारी रोजी सुट्ट्या असल्याने त्या दिवशी माघार प्रक्रिया होणार नाही.


१९ जानेवारी २०२६ पर्यंत १३२ व्यक्तींनी १८३ फॉर्म खरेदी केले आहेत. नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यास दोनच दिवसांचा कालावधी शिल्लक असून नामनिर्देशन पत्रांच्या प्राथमिक तपासणीसाठी तहसील कार्यालयात १० पथके स्थापन करण्यात आली असून, उमेदवारांना आवश्यक मदत पुरविण्यासाठी मदत कक्ष देखील उभारण्यात आला आहे. उमेदवारांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली असून, त्यांना फॉर्म भरण्यात मदत मिळेल.

आचारसंहिता अंमलबजावणीसाठी विविध पथके कार्यरत आहेत. यामध्ये स्थिर पथके पेठ, ममदापूर, मुरुड व महापूर या ठिकाणी कार्यान्वित राहतील. तसेच भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांचे प्रमुख म्हणून गट विकास अधिकारी श्याम गोडभरले काम पाहतील. लातूर तालुक्यातील उमेदवारांना विविध परवाने देण्यासाठी लातूर पंचायत समिती कार्यालयात एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आला असून, उमेदवारांना आवश्यक परवाने (वाहन, बॅनर इत्यादी) येथून उपलब्ध करून दिले जातील. या कक्षाचे प्रमुख तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड राहतील. निवडणूक कामांसाठी मनुष्यबळ व्यवस्थापन कक्ष, खर्च पथक, मतदान जनजागृती कक्ष इत्यादी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

## जि. प., पं. स. निवडणुकीसाठी तयार रहा : दिलीपराव देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर २० जानेवारी :** नुकत्याच झालेल्या लातूर महापालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आ. अमीत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली घवघवीत यश मिळवले आहे. आता कार्यकर्ते - पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत नेत्रदीपक यश मिळवण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले.मनपा निवडणुकीतील नेत्रदीपक विजयाबद्दल माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके व शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अँड. किरण जाधव यांचा शाल, श्रीफळ देऊन सोमवारी सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.



आपल्या मार्गदर्शनात दिलीपराव देशमुख पुढे म्हणाले की, लातूर शहराला विकासाचे मॉडेल तयार करण्यासाठी मतदारांनी आ. अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला जनाधार दिलेला आहे. काँग्रेसने जी निवडणुकीत आश्र्वासने जाहीरनाम्यात दिलेली आहेत, ते पूर्ण करण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी करू या. जिल्हा परीषद, पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारात सर्व काँग्रेस पदाधिकारी - कार्यकर्ते यांनी दक्ष राहून

सर्वांनी एकजुटीने प्रचार करा. काँग्रेसचा झेंडा जिल्हा परिषदेवर फडकेल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा, असे आवाहनही त्यांनी केले.

# आईची मांडी हेच जगातील पहिले विद्यापीठ! - यलमटे

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी/रियाज मोमीन, दि.२० जानेवारी :** आईच्या मांडीवरच माणूस घडतो, संस्कारांची पहिली शिदोरी तिथेच मिळते. जगातील कुठल्याही विद्यापीठात जाण्यापूर्वी माणूस आईच्या मांडीवरच जीवनाचे धडे शिकतो.भारतीय संस्कृतीत आईला केवळ जन्मदात्री नव्हे तर संस्कारदात्री मानले गेले आहे. इतिहासातील थोर व्यक्तिमत्त्वांच्या जडणघडणीत आईची भूमिका निर्णायक ठरलेली आहे. संस्कार, शिस्त, प्रेम, सहनशीलता आणि माणुसकीचे बीज आईच आपल्या लेकरांच्या मनात रोवते. त्यामुळे आईची मांडी हेच जगातील पहिले विद्यापीठ आहे, असे परखड मत प्रसिध्द साहित्यीका तथा व्याख्यात्या अनिता यलमटे यांनी व्यक्त केले.देवणी येथील विवेकवर्धिनी प्राथमिक विद्यालयात संस्कारांचा सुगंध मायेचा उत्सव या संकल्पनेतून महिला मेळावा व हळदीकुंकू कार्यक्रमानिमित्त आईची मांडी - जगातील पहिले विद्यापीठ या विषयावर व्याख्यान व हळदी कुंकू व महिला मेळाव्याचे आयोजन दि.१९ जानेवारी रोजी सोमवारी करण्यात आले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिभाताई भगवानराव पाटील तळेगावकर होत्या. प्रमुख वक्त्या म्हणून प्रसिध्द साहित्यीका तथा व्याख्यात्या अनिता यलमटे,

प्रमुख पाहुणे म्हणून ह. भ. प. अलकाताई तळेगावकर, तर विशेष उपस्थितीत अनुराधा सोमनाथ वाडकर,अंजली नागेश जीवने, अनुराधा माळी, इंदुताई पाटील तळेगावकर, नयनाताई पाटील तळेगावकर, उषाताई पाटील तळेगावकर, सुप्रिया पाटील तळेगावकर आदींची व्यासपिठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, सहकारमहर्षी,शिक्षणमहर्षी कै.रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करुन करण्यात आली. पुढे बोलताना अनिता यलमटे म्हणाल्या की, आजच्या डिजिटल युगात बदलत्या जीवनशैलीमुळे कुटुंबातील संवाद कमी होत चालला आहे. मोबाईलमूळे आभासी जगात अडकलेली मुले एकलकोंडी होत असून त्यांच्यात आक्रमकता वाढताना दिसत आहे. अशा परिस्थितीत आईची जबाबदारी अधिक वाढली असून मुलांवर योग्य संस्कार करण्यासाठी तिने जागरूक राहणे अत्यावश्यक आहे, असेही त्या म्हणाल्या.

मुलांमधील वाढती आक्रमकता कमी करण्यासाठी त्यांना छंद जोपासण्यास प्रवृत्त करणे, वाचन, खेळ, कला, संगीत यांसारख्या सकारात्मक उपक्रमांशी जोडणे गरजेचे आहे. तसेच घरात प्रेम, संवाद व जिव्हाळ्याचे वातावरण निर्माण केल्यास मुलांचे व्यक्तिमत्त्व सुसंस्कृत घडू शकते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

आईच्या मांडीवर मिळालेल्या संस्कारांवरच उद्याचा सशक्त समाज उभा राहतो. त्यामुळे आई हीच समाजाची पहिली शिल्पकार आहे, हे विसरता कामा नये, असा ठाम संदेश अनिता यलमटे यांनी दिला.या कार्यक्रनाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक विनायक पाटील बटनपुरकर यांनी केले.

याच वेळी, ह. भ. प. अलकाताई तळेगावकर यांनी सेमी मराठी शाळा ही काळाची गरज आहे या विषयावरती सखोल असे मार्गदर्शन केले.

सूत्रसंचल सुरेखाताई गरड यांनी केले

तर आभार सरोजा सूर्यवंशी यांनी मानले

या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शोभाताई पाटील, अण्णा रावजी मोरे, गुणवंतरावजी कदम, रावसाहेब जाधव यांनी प्रयत्न केले.यावेळी मोठयाप्रमाणावर पालक महिला विदयार्थी उपस्थीत होते.

# निलंगा तालुका कुणबी मराठा सेनेच्या अध्यक्षपदी भागवत धुमाळ यांची निवड



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि.२० जानेवारी :** कुणबी मराठा सेनेचे संस्थापक राज्याध्यक्ष विश्र्वनाथ कोळसुरे यांच्या अध्यक्षतेखाली निलंगा येथे झालेल्या बैठकीत निलंगा तालुका कुणबी मराठा सेनेच्या तालुकाध्यक्षपदी भागवत शेषेराव धुमाळ (हणमंतवाडीकर) यांची सर्वसंमतीने निवड करण्यात आली आहे.

या बैठकीत समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संघटना तळागाळातील प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रत्येक गावात शाखा स्थापन करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. याप्रसंगी नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व नियुक्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

नूतन कार्यकारिणी खालीलप्रमाणे:

तालुकाध्यक्ष: भागवत शेषेराव धुमाळ उपाध्यक्ष: अतुलराव शिंदे व दिलीपराव माने पंडितराव जाधव बालाजीराव जाधव व काशीनाथराव जाधव पांडुरंग देशमुख संतराम बोकणे (शिंदे) अविनाश चव्हाण सुभाष काकडे हरीभाऊ सावंत बालाजी जाधव या निवडीसाठी मराठवाडा अध्यक्ष अशोकराव कातळे, सचिव गोविंदराव हालसे, सामाजिक कार्यकर्ते राम धावणे, कुणबी मराठा स्वयंसहायता बचत गट पतसंस्थेचे चेअरमन लक्ष्मण मदरशे, संजय टोपे, दिलीपराव जाधव, बळवंतराव सुगावे, कैलास लखणे, महेश कोळसूरे, बब्रुवान चव्हाण, वसंतराव हासवले, दिनकर जाधव यांच्यासह निलंगा तालुक्यातील कुणबी मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक संघाच्या जिल्हा कार्यकारी अध्यक्षपदी जाधव एम एम यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि.२० जानेवारी :** लातूर येथील महाराष्ट्र राज्य प्राथमिक संघाच्या जिल्हास्तरीय महामंडळ सभेत निलंगा तालुक्याचे जाधव एम एम यांची निवड जिल्हा शाखेच्या कार्यकारी अध्यक्षपदी झाल्याची घोषणा राज्याचे अध्यक्ष बाळासाहेब मारणे यांनी केली.व कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्राचे शिक्षक नेते संभाजीराव थोरात तात्या यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विचारपीठावर बाळासाहेब मारणे होते तर उद्घाटक म्हणून राज्य नेते संभाजीराव थोरात तात्या होते.प्रमुख पाहुणे म्हणून श्री रावसाहेब रोहोकले शिक्षक नेते. श्री. बाळासाहेब झावरे. राष्ट्रीय अध्यक्ष. श्री.आबासाहेब जगताप राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री. बाळकृष्ण तांबारे राष्ट्रीय महासचिव श्री ज.म.मोरे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष बलवंत पाटील राज्य सरचिटणीस श्री.कैलास दहातोंडे राज्य कार्याध्यक्ष श्री. किशन इदगे राज्य कार्यकारी अध्यक्ष विलास चौगुले राज्य कार्याध्यक्ष संतोष कदम राज्य कोषाध्यक्ष श्री अनिरुद्ध पवार राज्य उपाध्यक्ष श्री.डी.बी. गुंडूरे विभागीय अध्यक्ष श्री.आप्पाराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा शिक्षक नेते केशव भैया गंभीरे यांनी केले.

मान्यवरांच्या उपस्थितीत महामंडळ सभेत महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम तसेच लातूर जिल्ह्यातील उपक्रमशील शाळांचा पुरस्काराने सन्मान व गुणवंत शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षक नेते बाळकृष्ण तांबारे सर , डी.बी. गुंडुरे सर, अप्पाराव शिंदे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.. या महामंडळ सभेत लातूर जिल्हा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची जिल्हा कार्यकारणी घोषित करण्यात आली.निलंगा तालुक्यात कार्यरत असणाऱ्या गंभीरे केशव यांची सरचिटणीस पदी निवड तर कार्यकारी अध्यक्ष म्हणून जाधव एम एम यांची निवड व कोषाध्यक्ष म्हणून धुमाळ डी एस यांची निवड तर उपाध्यक्ष म्हणून सोनटक्के बी एस यांची निवड करण्यात आली.सदर कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन शिक्षक संघाचे पदाधिकारी डॉ. नागेश पाटील ,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक रामकिशन सुरवसे यांनी केले.या कार्यक्रमासाठी लातूर जिल्ह्यातील शिक्षक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने निराधारांना ऊबदार चादरींचे वाटप



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि.२० जानेवारी :** रस्त्यावर फिरणाऱ्या निराधार नागरिकांना थंडीपासून बचावासाठी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने ऊबदार चादरींचे वाटप करण्यात आले.

उदगीर शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात रस्त्यावर आपला संसार थाटणाऱ्या नागरिकांना थंडीचा होत असलेला त्रास लक्षात घेऊन रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने रेल्वे स्टेशन येथे ऊबदार चादरींचे वाटप करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे उपाध्यक्ष मोतीलाल डोईजोडे, सचिव विक्रम हलकीकर, विजयकुमार पारसेवार, संतोष फुलारी, रवींद्र हसरगुंडे, विशाल जैन, व्यंकट कणसे, रामदास जळकोटे, चंद्रकांत ममदापूरे, रवींद्र मलगे, बस्वराज बाबजी, विवेक होळसंबरे, एकनाथ राऊत यांची उपस्थिती होती.

# मुख्याध्यापक सोमनाथ काळगे गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि.२० जानेवारी :** तालुक्यातील काटेजवळगा जिल्हा परिषद केंद्रिय शाळेचे मुख्याध्यापक सोमनाथ काळगे यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा लातूर च्या वतीने देण्यात येणारा यावर्षीचा गुरू गौरव पुरस्कार ,शिक्षक संघाचे पंचप्राण शिक्षक नेते संभाजीराव थोरात,राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या हस्ते दि.१८ रोजी विश्र्व पॅलेस लातूर येथे झालेल्या समारंभात सपत्नीक हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी राज्य उपाध्यक्ष डी. बी. गुंडुरे , विभागीय अध्यक्ष अप्पराव शिंदे,जिल्हाध्यक्ष विजयकुमार गुत्ते, व जिल्हा सरचिटणीस केशव गंभीरे आदी मान्यवर उपस्थित होते.त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दयानंद महाविद्यालयाच्या रा.से.यो. अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक सादर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२० जानेवारी :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय लातूर अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष वार्षिक युवक शिबिराच्या निमित्ताने मौजे चिंचोलीराव ता. जि. लातूर येथे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालय व महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या संयुक्त विद्यमाने व डॉ. साकेब उस्मानी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्या निर्देशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. याप्रसंगी महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अग्निशमन अधिकारी श्री. गणेश चौधरी, यंत्रचालक श्री. विकास इंगोले, फायरमॅन श्री. शरद माने, फायरमॅन श्री. अमोल वाघमोडे यांच्या चमूने आपत्तीच्या वेळी घ्यावयाची दक्षता, बचाव कार्य व अग्निशमन तंत्र याबाबत सविस्तर माहिती देत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, प्रा. विशाल चव्हाण, प्रा. योगेश शर्मा यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, स्वयंसेवक विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसंगी उपस्थितांनी प्रात्यक्षिकाचा लाभ घेत आपत्ती व्यवस्थापनाविषयी महत्त्वपूर्ण माहिती आत्मसात केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. योगेश शर्मा व आभार प्रदर्शन डॉ. विशाल वर्मा यांनी केले. सदरील प्रात्यक्षिके यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल उपस्थित मान्यवरांचे व आपत्ती व्यवस्थापन पथकाचे आभार मानण्यात आले.

# कौळखेडला मोफत रोगनिदान व औषोधोपचार शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि.२० जानेवारी :** सेवा परमो धर्म: अभाविप सेवा हीच राष्ट्र सेवा: जन सेवा ही ईश्र्वर सेवा आहे, या स्वामी विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाने प्रेरित होऊन, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद उदगीर ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सुलभ करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. या अनुषंगाने आज अभाविप व धन्वंतरी आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्तविद्यमाने कौळखेड गावातील ग्रामीण आरोग्यवर्धनी उपकेंद्र येथे मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर यशस्वीपणे पार पडले.

या शिबिरात तांड्यातील १०० हून अधिक ग्रामस्थांना वैद्यकीय तपासणी, रोगनिदान आणि आवश्यक औषधे पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आली. ग्रामीण भागातील आरोग्य सेवांच्या कमतरतेवर मात करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. अभाविप ग्रामीण आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सेवांच्या क्षेत्रात नेहमीच सक्रिय राहते. हा उपक्रम सेवा परमो धर्म: या तत्त्वाला प्रत्यक्षात आणणारा आहे. यामध्ये डॉ. सफुरा आफ्रीन समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यवर्धनी उपकेंद्र, कौळखेड, डॉ. नामदेव बनसोडे, डॉ. योगेश्र्वर सुरनर, डॉ. शिवप्रताप बिरादार, डॉ. प्रशांत दासरवार तसेच अभाविप शहर सहमंत्री रेवणअप्पा स्वामी, पृथ्वीराज बिरादार, असिफ सय्यद, राज पवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# रासेयो शिबिरातून युवकांनी विकासासाठी जनजागृती करावी : लताताई मोरे

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव,दि. २० जानेवारी :** आजचा युवक देशाचा शिल्पकार असून समाजात वावरताना समाजाच्या गरजा, समस्या जाणून घेऊन रासेयो शिबिरातून युवकांनी चिरकाल विकासासाठी जन जागृती करावी असे प्रतिपादन श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या सहसचिव श्रीमती लताताई मोरे -बोडके यांनी किनगांव येथील महात्मा फुले महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे खानापूर येथे विशेष युवक शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी सोमवार दि १९ जाने.२०२६ रोजी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या सहसचिव श्रीमती लताताई मोरे बोडके यांनी केले



या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव तथा प्राचार्य डॉ बबनराव बोडके होते तर उद्घाटक लताताई मोरे प्रमुख उपस्थित खानापूरचे पोलीस पाटील राजकुमार शिंदे , चेअरमन नारायण देशमुख , माजी उपसरपंच अनिल देशपांडे , ग्रा प सदस्य सतिश कांबळे ,निळकंठ शिंदे , सुरज चव्हाण, राम शिंदे ,उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण , मुख्याध्यापिका मंगलताई भताने रासेयो कार्यक्रमाधिकारी तथा नोडल अधिकारी डॉ भारत भदाडे, प्रा अंकिता जाधव आदि मान्यवर होते

अहमदपूर तालुक्यातील खानापूर येथे १९ जानेवारी ते २४ जानेवारी२०२६ या कालावधी रासेयो शिबीर आयोजित केले असून या शिबीराचा विषय शाश्र्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासाकरीता विशेष युवक शिबिराचे उद्घाटन संस्था सहसचिव लताताई मोरे आणि मान्यवरांच्या शुभहस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण आणि दीप प्रज्वलित करून संपन्न झाले यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ भारत भदाडे यांनी केले त्यानंतर राजाभाऊ शिंदे यांनी शिबिरार्थीचे ऋणानुबंध खानापूरच्या मातीशी जोडल्याने आभार व्यक्त करत शिबिरार्थींना सर्वोत्तरी सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ बबनराव बोडके म्हणाले की शाश्र्वत विकास म्हणजे पर्यावरण संरक्षण, सामाजिक बांधिलकी जोपसत राष्ट्रहितासाठी पुढाकार घेणे यासाठी पर्यावरण संरक्षण सोबत सामाजिक समता आणि आर्थिक विकासाचा समतोल राखावा असे हि आवाहन केले त्यानंतर आभार प्रदर्शन प्रा बालाजी आचार्य यांनी केले या विशेष शिबिरात रासेयो चे २५ स्वयंसेवक मुले आणि २५ स्वयसेविका मुली एकूण ५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला यात स्वयंसेवक कु विक्रम जाधव आशिष कवडे शिवराम फड, अलका नागरगोजे , मंदाकिनी कराड, प्रज्ञा मस्के ,आरती येनकफळे , विशाखा महात्मे, माने विठ्ठल गवळे , सुरज कानगुले, आस्लम फकिर , अंकिता भंडारे ,योगीता सुर्यवाड,श्र्वेता तिगोटे , धनश्री चाटे आदि विद्यार्थी पुढाकार घेतला आहे या उद्घाटन सोहळ्याला महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण ,प्रा बालाजी आचार्य , संजय जगताप डॉ बळीराम पवार ,डॉ प्रभाकर स्वामी ,डॉ विरनाथ हुमनाबादे ,डॉ सदाशिव वरवटे ,डॉ पांडुरंग कांबळे, प्रा कृष्णा केंद्रे, प्रा सुमेध जोगदंड, प्रा चंद्रमनी बनसोडे , प्रा विक्रम गायकवाड ,डॉ दर्शना कानवटे , अंकिता जाधव ,प्रा मीरा शिंदे आदि उपस्थित होते या सोहळयाचे सुत्रसंचालन प्रा डॉ संजय जगताप यांनी केले मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते राष्ट्रगिताने रासेयो उद्घाटन समारंभाची सांगता झाली

# जिल्हा सेवा समिती व तालुका सेवा समिती व भाविक भक्त गुरुबंधू यांच्यावतीने देवणीत रक्तदान शिबिर



**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, २० जानेवारी :** देवणी शहरांमध्ये बोरोळ चौकात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते मानवी जीवनात दानाचे महत्त्व अनमोल आहे.

परंतु ज्या दानाची कुणाचे आयुष्य वाचते, ते रक्तदान सर्वश्रेष्ठ पुण्य ठरते, समाजात मायक्रोसाइटिक अनिमिया, सिकलसेल, थलेसिमिया, हिमोफिलिया, ब्लड कॅन्सर, किडनी फेल्युअर अशी गंभीर आजाराची झुंजणारे हजारो रुग्ण रक्तांच्या एका थेंबासाठी तडफडत असतात, अशावेळी तुम्हीच त्यांचे देवदूत ठरू शकता, आपलं फक्त पाच मिनिट आणि एखाद्यासाठी संपूर्ण आयुष्य रक्तदानाची प्रक्रिया केवळ काही मिनिटाचे असली, तरी त्या काही थेंबामुळे गोरगरिबाची जीवन थांबू शकते जीवनदान महाकुंभ २०२६या महाकुंभाद्वारे रुग्णांना विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्याचे महान उपक्रम संस्थेतर्फे राबले जात आहे.

या देवणीच्या शिबिरामध्ये १८१ रक्तदाते रक्तदान दिली आहे यांच्या पाठीमागे नरेंद्राचार्यजी महाराज सदैव त्यांच्या पाठीशी राहील, या शिबिरामध्ये अत्यंत प्रामाणिकपणे भाग पडणारे आई बहुउद्देशीय संस्था संचलित शौर्य ब्लेड सेंटर या सर्व स्टाफ यांनी १८१ रक्तदाते यांना रक्तदान घेऊन त्यांना मदत केली आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## काटगाव येथे मारहाण प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

काटगाव (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) येथे वाहन धडकेच्या वादातून एका व्यक्तीस गंभीर मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अंबिका अशोक वर्दे (वय ३७, रा. काटगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास काटगाव येथील लोकमंगल बँकेच्या बाजूला, सिध्दू कस्तुरे यांच्या मोकळ्या जागेत त्यांचे पती अशोक बाबुराव वर्दे (वय ४५) यांना आरोपी रमेश सुभाष गंगणे, राजू सुभाष गंगणे, सुभाष गंगणे व रेणुका गंगणे (सर्व रा. काटगाव) यांनी तू माझ्या गाडीला समोरून ठोकले असे म्हणत शिवीगाळ केली.

यानंतर आरोपींनी लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण करून अशोक वर्दे यांना गंभीर जखमी केले तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास नळदुर्ग पोलीस करीत आहेत.



# अनुसूचित जाती योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा

## निधी खर्चात दिरंगाईवर आयोग सदस्यांची नाराजी...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा) ॲड. गोरक्ष लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज धाराशिव जिल्ह्यातील विविध नगर परिषदांमधील अनुसूचित जाती घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या अनुषंगाने धाराशिव येथे कार्यालयात नगर परिषद परंडा, भूम, वाशी, कळंब व धाराशिव तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत अनुसूचित जाती घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा मागील पाच वर्षांचा आढावा, आर्थिक दुर्बल घटकांवर करण्यात आलेल्या खर्चाची तपासणी, अनुसूचित जातीकरिता प्राप्त निधीचा वापर, कामांची अंमलबजावणी, तसेच लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्त्यांची स्थिती याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

याशिवाय लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सुधार योजना,रमाई घरकुल योजना, अनुकंपा तत्वावरील प्रकरणे व इतर संबंधित बाबींचाही आढावा घेण्यात आला.

ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सुधार योजना व रमाई घरकुल योजनेसाठी उपलब्ध निधी असूनही अपेक्षित प्रमाणात खर्च न झाल्याबाबत संबंधित नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली.

तसेच या योजनांच्या कामांबाबत दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आणून देत, निधी तातडीने खर्च करून लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

या बैठकीसाठी नगर परिषद परंडा, भूम, वाशी, कळंब व धाराशिव येथील मुख्याधिकारी उपस्थित होते. तसेच सचिन कवले, सहायक आयुक्त, समाज कल्याण आणि आयुब शेख, वरिष्ठ सहायक यांचीही उपस्थिती होती. या आढावा बैठकीतून अनुसूचित जाती घटकांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टांना गती देण्याच्या सूचना लोखंडे यांनी दिल्या.

# गणित ऑलिंपियाड स्पर्धेत स्वामी विवेकानंद शाळा अव्वल



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० जानेवारी -**

स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी गणित ऑलिंपियाड स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत गोल्ड मेडल व सेकंड लेवलपर्यंत मजल मारली आहे. नुकताच या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून, शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध इयत्तांमध्ये उत्कृष्ट यश संपादन केले आहे.

इयत्ता पहिलीतील १४ विद्यार्थ्यांपैकी हर्षवर्धन भालके, आरव पवार व महेश तांबोळी यांनी गोल्ड मेडल मिळवले. इयत्ता दुसरीतील १७ विद्यार्थ्यांपैकी बेले अनन्या, गौरव जाधव, रजा फातिमा अत्तार व बेळंबे आनंद यांनी गोल्ड मेडल पटकावले. इयत्ता तिसरीतील आठ विद्यार्थ्यांपैकी शाही वाले अभिज्ञा व पाटील अनुष्का यांनी सेकंड लेवल गाठली.

इयत्ता चौथीतील आठ विद्यार्थ्यांपैकी ईश्वरी नगरखेडे, ईशान्य पवार व गौरी पवार यांनी सेकंड लेवल, तर बोधम वाढ आरोही व कांबळे संस्कृती यांनी गोल्ड मेडल मिळवले. इयत्ता पाचवीतील १४ विद्यार्थ्यांपैकी शिवम गावकरे, कार्तिकी साळवे व आर्या जाधव यांनी गोल्ड मेडल प्राप्त केले. इयत्ता सहावीतील १२ विद्यार्थ्यांपैकी अभिनव गायकवाड याला गोल्ड मेडल मिळाले, तर इयत्ता सातवीतील सहा विद्यार्थ्यांपैकी शिवम शहुराज माने याने गोल्ड मेडल संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना भागीरथी शिंदे, जैतून बी. मेंडके, नामदेव तांबोळी, स्वप्निल पतंगे, वर्षा शाही वाले व अविनाश जोशी या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, मल्लिकार्जुन दंडगे, कपिल महाजन, मुख्याध्यापिका सविता लोहार, गोपाळ अष्टे, दत्तात्रय कोकणे, बेबी सरोजा पवार तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे आठवे मरणोत्तर देहदान

## कै. आशाबाई गंभीरे यांचा समाजोपयोगी आदर्श

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० जानेवारी -**

समाजासाठी प्रेरणादायी ठरणारे आठवे मरणोत्तर देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे पार पडले. ईटकूर (ता. कळंब) येथील ६५ वर्षीय कै. श्रीमती आशाबाई गोविंद गंभीरे यांचे उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या जिवंतपणी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार व पूर्वी केलेल्या संकल्पानुसार त्यांचे मरणोत्तर देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे करण्यात आले.



कै. आशाबाई गंभीरे व त्यांचे पती गोविंद गंभीरे या वृद्ध दाम्पत्याने जिवंतपणीच देहदानाचा संकल्प केला होता. पत्नीच्या निधनानंतर पती श्री. गोविंद गंभीरे यांनी हा संकल्प प्रत्यक्षात उतरवून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

त्यांच्या या निर्णयामुळे वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी मोलाची मदत होणार आहे. या देहदानामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांना शरीररचना अभ्यास व संशोधनासाठी उपयुक्त संधी मिळणार असून, भविष्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम होण्यास हातभार लागणार आहे.

शरीररचनाशास्त्र विभागाच्या नियोजनाखाली ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. या कार्यात डॉ. स्वाती पांढरे (प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग), डॉ. विश्वजीत पवार (प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र विभाग), डॉ. सुवर्णा आनंदवाडीकर (सहयोगी प्राध्यापक), डॉ. नितीन भोसले (प्रभारी वैद्यकीय अधीक्षक), डॉ. विवेक कोळगे (सहाय्यक प्राध्यापक, शरीरविकृतीशास्त्र विभाग तथा प्रभारी प्रशासकीय अधिकारी), डॉ. अरबाज ढवळीकर (निवासी वैद्यकीय अधिकारी), अधिसेविका सुमित्रा गोरे, प्रशांत बनसोडे (प्रयोगशाळा तंत्रज्ञ), वरिष्ठ लिपिक जीवन गंभीरे तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. संपूर्ण प्रक्रियेसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांनी मार्गदर्शन केले.

त्यांनी देहदान करणाऱ्या गंभीरे कुटुंबीयांचे विशेष आभार मानून, हे कार्य वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण व प्रशिक्षणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे नमूद केले.

गंभीरे कुटुंबीयांनी घेतलेल्या या संवेदनशील व समाजहिताच्या निर्णयामुळे सर्वत्र सकारात्मक भावना व्यक्त होत असून, समाजात देहदानाविषयी जागरूकता वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे.

# होर्टी येथे प्रतिबंधित गुटखा व तंबाखू विक्रीप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० जानेवारी -**

होर्टी (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) येथे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी बाळगल्याप्रकरणी नळदुर्ग पोलिसांनी दोघांविरुद्ध कारवाई केली आहे.




दि.१९ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास आरोपी रामेश्वर बाबुराव भुजबळ (वय ४२, रा. होर्टी) हा ग्रामपंचायत कार्यालयाजवळ प्रतिबंधित केसरयुक्त विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू (गायछाप) पुड्या, किसन तंबाखू तोटे, ब्रिस्टॉल सिगारेट असा एकूण ५०८ रुपये किमतीचा माल विक्रीसाठी जवळ बाळगताना नळदुर्ग पोलिसांना मिळून आला.

तसेच त्याच दिवशी दुपारी २.२० वाजण्याच्या सुमारास आरोपी सोमनाथ बसवंत भुजबळ (वय ४२, रा. होर्टी) हा देखील ग्रामपंचायत कार्यालयाजवळ प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ - केसरयुक्त विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू (गायछाप) पुड्या, किसन तंबाखू तोटे, ब्रिस्टॉल सिगारेट असा एकूण ५१३ रुपये किमतीचा माल विक्रीसाठी जवळ बाळगताना आढळून आला.

या दोन्ही प्रकरणांत नळदुर्ग पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा व तंबाखू साहित्य जप्त करून आरोपींविरुद्ध कलम ६(ब), २४ कोप्टा क्ट अन्वये नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू आहे.

# आर्य चाणक्य विद्यालयात घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

धाराशिव येथील लोकसेवा समिती संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र मिशन अभियान व धाराशिव नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने घनकचरा व्यवस्थापन विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सुलभा देशमाने होत्या. यावेळी स्वच्छ महाराष्ट्र मिशन अभियानाचे समन्वयक कृष्णा भिसे यांनी विद्यार्थ्यांना कचरा व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आपली शाळा, घर, परिसर व शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी दररोज कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा व घातक कचरा असे कचऱ्याचे चार प्रकार त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी तसेच पर्यावरणातील प्रदूषण कमी करण्यासाठी कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

घनकचरा व्यवस्थापनात पाच आर (Reduce, Reuse, Recycle, Refuse, Repair) या संकल्पनेचे महत्त्व त्यांनी सोप्या उदाहरणांतून विशद केले. कचरा व्यवस्थापन ही आज काळाची गरज बनली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान भिसे यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांचा उत्स्फूर्त सहभाग घेतला. अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन प्रोत्साहन देण्यात आले. विविध चित्रकार्डांच्या माध्यमातून त्यांनी कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व प्रभावीपणे पटवून दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाबाबत जागृती निर्माण झाल्याचे दिसून आले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने कृष्णा भिसे यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत-सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहशिक्षक उमाकांत कुलकर्णी यांनी केले. यावेळी सहशिक्षक प्रशांत जाधवर यांच्यासह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव-बीड रस्त्यावर ट्रकच्या धडकेत तरुणाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

धाराशिव ते बीडकडे जाणाऱ्या रस्त्यावर झालेल्या भीषण अपघातात एका ३७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयताचे नाव रामराजे बाळासाहेब नजन (वय ३७, रा. इंदापूर, ता. वाशी, जि. धाराशिव) असे आहे. फिर्यादी बाळासाहेब नजन यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१८ जानेवारी रोजी सायंकाळी ६.४५ वाजण्याच्या सुमारास धाराशिव-बीड रस्त्यावर ट्रक क्रमांक आरजे १९ जीजे ५३५४ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक अतिवेगाने व निष्काळजीपणे चालवून रामराजे नजन यांना पाठीमागून जोराची धडक दिली. त्यात ते मयत झाले.

# ५१ वर्षांनंतर १९७५ च्या दहावीच्या बॅचचे वर्गमित्र एकत्र

## तुळजापूर येथील जि.प. शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० जानेवारी -**

येथील जिल्हा परिषद शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. सन १९७५ मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची बॅच तब्बल ५१ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आली. या स्नेहमेळाव्याचे आयोजन पुजारी नगर येथील श्रीनाथ लॉन्स येथे करण्यात आले होते.

या स्नेहमेळाव्यासाठी वयाची साठी ओलांडलेले वर्गमित्र, सवंगडी आणि मित्रपरिवार दूरदूरच्या ठिकाणांहून आवर्जून उपस्थित राहिले होते. एकमेकांना भेटताच जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. शालेय जीवनातील खोडकर प्रसंग, वर्गातील गमतीजमती, शिक्षकांनी दिलेले संस्कार, अभ्यासासोबतच खेळ आणि शाळेतील उपक्रम यांची आठवण काढताना वातावरण भावूक झाले.

स्नेहमेळाव्यात मजा-मस्ती, स्नेहभोजन, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच वैचारिक गप्पागोष्टींचा मनमोकळा संवाद रंगला. दीर्घकाळानंतर झालेल्या या भेटीमुळे सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान झळकत होते. काही मित्रांनी आपले अनुभव, आयुष्यातील संघर्ष, यश-अपयश आणि सामाजिक कार्याविषयी आपले विचार मांडले.

दीर्घ काळानंतर एकत्र आलेल्या या मित्रपरिवाराने हा स्नेहमेळावा केवळ भेट म्हणून न पाहता एक आनंदोत्सव म्हणून साजरा केला. भविष्यातही अशा प्रकारचे स्नेहमेळावे नियमितपणे घेऊन संपर्क टिकवून ठेवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

हा स्नेह मेळावा यशस्वी करण्यासाठी विश्वनाथ पुजारी, सुदर्शन पांढरे, अनंत कोंडो, शहाजी रोचकरी, गोपाळ कावरे, सुधीर महामुनी, संपत जळके, अनिल भांजी, शिवाजी कापसे, विनोद खपले,राज साळूंखे, लाईक सिद्दिकी, प्रताप सरवदे, धनंजय हुंडेकरी, शशी पाठक, निरंजन इंगोले आदींनी परिश्रम घेत सर्व मित्रांना एकत्रित आणले.

हा स्नेहमेळावा जुन्या नात्यांना नव्याने बळ देणारा, मैत्रीची ऊब पुन्हा अनुभवून देणारा आणि सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत धाराशिव जिल्ह्यात विविध ठिकाणी रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती तसेच अपघात रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या.

दि. १३ जानेवारी रोजी श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय, धाराशिव येथे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. मोटार वाहन निरीक्षक सचिन बंग व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवाजी बहीर यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. यावेळी Walk on Right नियम, हेल्मेट व सीट बेल्टचे महत्त्व, वेग मर्यादेचे पालन, मद्यपान करून वाहन न चालविणे तसेच विविध रस्ता चिन्हांची माहिती देण्यात आली. अपघात झाल्यास अपघातग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा विषयक प्रश्नमंजुषा घेण्यात येऊन पारितोषिके व माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले.

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत धाराशिव-सोलापूर महामार्गावरील तामलवाडी टोल नाका येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात मोटार वाहन निरीक्षक सुनील शिंदे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विशाल भगरे, सहायक पोलीस निरीक्षक गोकूळ ठाकूर, वाहतूक पोलीस कर्मचारी, खठइ चे सावंत, तामलवाडी टोल नाक्यावरील कर्मचारी व डॉक्टर उपस्थित होते.

दि.१४ जानेवारी रोजी सोलापूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी परिवहन विभाग, महामार्ग पोलीस, स्थानिक पोलीस व तामलवाडी टोल नाका प्रशासनाच्या वतीने अपघातप्रवण ठिकाणांची (ब्लॅक स्पॉट) पाहणी करण्यात आली. तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ते माळुंब्रा दरम्यान वारंवार अपघात होत असल्याने या परिसराची सखोल पाहणी मोटार वाहन निरीक्षक सुनील शिंदे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विशाल भगरे, ज्योतिलिंग सावंत, पी.डी. शाहू व नितीन भोसले यांनी केली.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## धाराशिवात घरफोडी; दागिने व रोख रक्कम चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

मकर संक्रांतीच्या सणानिमित्त घर बंद ठेवून बाहेरगावी गेलेल्या दाम्पत्याच्या घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केल्याची घटना आनंदनगर परिसरात उघडकीस आली आहे.

फिर्यादी सदाशिव त्रिंबक जाधव (वय ५७, रा. पोस्ट कॉलनी, धाराशिव) हे पत्नीसमवेत मकर संक्रांतीच्या सणानिमित्त गावी गेले असताना, अज्ञात व्यक्तीने दि.१३ जानेवारी २०२६ रोजी रात्री ८.०० वाजल्यापासून दि.१४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील कपाटातून २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच १५,००० रुपये रोख रक्कम असा एकूण ६१,१०० रुपये किमतीचा माल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



या प्रकरणी फिर्यादी सदाशिव जाधव यांनी दि.१९ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास आनंदनगर पोलीस करीत आहेत.

# ऐन निवडणुकीत तुळजापूर तालुक्यात भाजपचा काँग्रेसला मोठा धक्का

## तुळजापूरातील काँग्रेसचे दोन माजी सभापती भाजपावाशी !...

## तुळजापूर तालुक्यात शेकडोंसह काँग्रेस नेत्यांचा भाजपमध्ये प्रवेश...








**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० जानेवारी -**

ऐन जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर तुळजापूर तालुक्यात भाजपने काँग्रेसला जोरदार दणका दिला आहे. काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश चव्हाण व माजी सरपंच अशोक पाटील यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह दि. १९ जानेवारी रोजी आमदार राणाजगजितसिंह पाटील व भाजपचे नेते सुनील चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे तुळजापूर तालुक्यात काँग्रेसला पुन्हा एकदा मोठे खिंडार पडले आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, तुळजापूर तालुक्यात नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीप्रमाणेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतही भाजप 'नंबर एक' पक्ष ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील व भाजप नेते सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता संपूर्ण तुळजापूर तालुका भाजपमय होण्याची चिन्हे दिसत आहेत.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर सुनील चव्हाण यांच्या भाजप प्रवेशानंतर आता काँग्रेसचेही असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते भाजपमध्ये सहभागी होत आहेत.

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा तुळजापूर तालुका आता भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असून, आज तालुक्यातील जवळपास प्रत्येक संस्थेवर भाजपची सत्ता आहे.

सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका सुरू असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी आहे. अशा निर्णायक टप्प्यावर दि. १९ जानेवारी रोजी भाजपने पुन्हा एकदा काँग्रेसला मोठा राजकीय धक्का दिला.

काँग्रेसचे माजी जि. प. सदस्य प्रकाश चव्हाण, त्यांच्या पत्नी व आलियाबाद ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच ज्योती चव्हाण तसेच जळकोटचे माजी सरपंच अशोक पाटील यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला.

या प्रवेशामुळे जळकोट जिल्हा परिषद गटात काँग्रेसला मोठा धक्का बसला असून, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत जळकोट गटातून भाजपची उमेदवारी ज्योती चव्हाण यांना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या घडामोडींमुळे जळकोट जि. प. गटातील राजकीय वातावरण पूर्णपणे बदलून भाजपमय झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

हा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम आमदार राणाजगजितसिंह पाटील, भाजप नेते सुनील चव्हाण, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, भाजप युवा नेते मल्हार पाटील, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे व संताजी चालुक्य यांच्या उपस्थितीत पार पडला.

## संक्षिप्त वृत्त...



### पोदार जम्बो किड्समध्ये चिमुकल्यांसाठी दंततपासणी कार्यक्रम उत्साहात संपन्न

**उमरगा, दि.२० जानेवारी -**

उमरगा शहरातील पोदार जम्बो किड्स शाळेत नर्सरी, ज्युनिअर व सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांसाठी ई.वाय.एफ.एस. अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून दंततपासणी (डेंटल चेकअप) कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. शाळेच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला टूथब्रश व प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये दंत आरोग्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी शाळेमार्फत दरवर्षी डेंटल चेकअप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लोटस पोदार लर्न स्कूलचे मुख्याध्यापक बी.पी. सिंग, उपमुख्याध्यापक अतुल फावडे, पोदार जम्बो किड्सच्या प्रमुख मंजिरी सूर्यवंशी तसेच शिक्षकवृंद रागिनी जावळे, अनुसया शिंदे, ज्योती काळे, आश्विनी दुधभाते, नीतीप्रिया पांचाळ, अश्विनी पाटील, रेणुका हिरमुखे, विजयालक्ष्मी अंबुसे, अंजली क्षीरसागर, प्रज्ञा ढोसे व सरस्वती भालके यांनी विशेष परिश्रम घेतले.



### विश्वास नगर रहिवाशांच्या वतीने सर्व नूतन नगरसेवकांचा सत्कार


**तुळजापूर, दि.२० जानेवारी -**

येथील विश्वास नगर येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव समिती व नर्मदेश्वर शिवलिंग मंदिर बांधकाम समितीच्या वतीने कृष्ण मंदिरात नूतन नगरसेवकांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. भाजप आणि काँग्रेसच्या सर्वच नगरसेवकांचा शाल पुष्पगुच्छ आणि ज्ञानेश्वर माऊलीची मूर्ती देऊन एक आगळावेगळा प्रोत्साहन सत्कार सोहळा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजाभाऊ शिंदे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधीर महामुनी यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रसाद महामुनी यांनी केले. कार्यक्रमासाठी विश्वास नगर भागातील सर्व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पारगाव टोलनाक्यावर गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक; गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

पारगाव टोलनाका परिसरात गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर व निर्दयतेने वाहतूक करताना वाशी पोलिसांनी कारवाई केली आहे.



या प्रकरणी शेख अमीर शेख खैरुद्दीन (रा. नेकनूर, ता. जि. बीड) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दि.१८ जानेवारी रोजी सायंकाळी ४.५० वाजण्याच्या सुमारास आरोपी हा आयशर टेम्पो (क्र. एमएच २३ डब्ल्यू ११३७) मधून गोवंशीय जातीच्या ११ जर्सी गायी, एक पांढऱ्या रंगाचा बैल व एक वासरू अशी एकूण अंदाजे ३,७०,००० रुपये किमतीची जनावरे चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता, कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक करत असताना वाशी पोलिसांना मिळून आला. या प्रकरणी सरकारतर्फे आरोपीविरुद्ध प्राण्यास क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास वाशी पोलीस करीत आहेत.

## तेर व केशेगाव जि.प. गटातून अर्चनाताई पाटील यांचा अर्ज दाखल



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांनी आज तेर व केशेगाव जिल्हा परिषद गटातून सर्वसाधारण महिला प्रवर्गात भारतीय जनता पार्टीकडून इच्छुक उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. यावेळी कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

डॉ. पद्मसिंह पाटील यांनी दाखवलेल्या जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या मार्गाला पूर्णत्व देण्यासाठी ही उमेदवारी निश्चितच महत्त्वाची ठरणार असून, यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्व लाभणार असल्याचे अर्चनाताई पाटील यावेळी म्हणाल्या.

जनतेच्या विश्वासावर व कार्यकर्त्यांच्या ताकदीवर ही निवडणूक लढवून मतदारांच्या प्रश्नांसाठी जिल्हा परिषदेत ठाम व प्रभावी आवाज उठवला जाईल, असा निर्धार यावेळी अर्चनाताई पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी रेवणसिद्ध लामतुरे, लिंबराज टिकले, सुरेश देशमुख यांच्यासह तेर व केशेगाव गटातील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेदरवाडीत विवाहितेची आत्महत्या; पतीसह सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

बेदरवाडी (ता. भुम, जि. धाराशिव) येथे पायल शुभम वनवे (रा. बेदरवाडी) हिने दि.१९ जानेवारी २०२६ रोजी पहाटे १.३० वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.



या प्रकरणी मृत पायल हिला ऑक्टोबर २०२५ पासून ते दि.१९ जानेवारी २०२६ रोजी पहाटे १.३० वाजेपर्यंत पती शुभम सुरेश वनवे याने उसाने मारहाण करून तसेच सासरे सुरेश दादासाहेब वनवे, सासू शारदा सुरेश वनवे व नणंद सुष्मा खाडे (रा. कुरकुंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) यांनी वारंवार शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे.

या सततच्या त्रासाला कंटाळून पायल हिने आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी फिर्यादी पूजा शेषेराव जाधवर (वय ३२, रा. बेदरवाडी, ता. भुम) यांनी दि.१९ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून भुम पोलीस ठाण्यात आरोपी पती, सासरे, सासू व नणंद यांच्याविरुद्ध भा.न्या.सं. कलम १०७, ३५१(३) भा.न्या.सं. सह कलम ४ पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास भुम पोलीस करीत आहेत.

## मसाले दुकानातून रोख रक्कम व मोबाईलची चोरी; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

धाराशिव शहरातील देशपांडे स्टॅण्ड परिसरात चोरीची घटना घडली आहे. पापनाश नगर, तुळजापूर नाका, धाराशिव येथे राहणाऱ्या सिंधु देवानंद कांबळे (वय ५२) यांचे देशपांडे स्टॅण्ड येथील विनायक मसाले या दुकानाच्या काउंटरवरून आरोपींनी रोख रक्कम व मोबाईल फोन चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, दि.१९ जानेवारी रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास आरोपी आनंदीबाई सोनवणे (रा. भीम नगर, धाराशिव) व पूजा नितीन कांबळे यांनी दुकानाच्या काउंटरवर ठेवलेली पाच हजार रुपये रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकूण अंदाजे २०,००० रुपये किमतीचा माल चोरून नेल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी फिर्यादी सिंधु कांबळे यांनी दि.१९ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास धाराशिव शहर पोलीस करीत आहेत.

## मद्यधुंद अवस्थेत गोंधळ; तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

तुळजापूर पोलीस ठाण्याच्या आवारात मद्यधुंद अवस्थेत आरडाओरड करून गोंधळ घातल्याप्रकरणी तुळजापूर पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी निखली मंगेश भोसले (वय २२, रा. वासुदेव गल्ली, तुळजापूर, ता. तुळजापूर) हा दि.१९ जानेवारी रोजी सायंकाळी ८.५० ते ८.५५ वाजण्याच्या सुमारास तुळजापूर पोलीस ठाण्याच्या आवारात मद्यधुंद अवस्थेत आरडाओरड करून सार्वजनिक शांतता भंग करताना तुळजापूर पोलिसांना मिळून आला.

पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरून आरोपीविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

## कळंबच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन : नगराध्यक्षा सुनंदा कापसे

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२० जानेवारी -**

कळंबच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सर्वजण एकत्र येऊन काम करू. सर्व नगरसेवक, पदाधिकारी व शहरातील नागरिक मला साथ देतील, असा मला पूर्ण विश्वास आहे. कळंबला आदर्श शहर बनविण्यासाठी नगर परिषदेला नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन नूतन नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांनी केले.



कळंब येथील देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष यशवंत दशरथ हे होते. तर व्यासपीठावर ॲड. दिलीपसिंह देशमुख, महादेव महाराज अडसूळ, पांडुरंग गुरव, सतीश टोणगे, दीपक हरकर, धनश्री कवडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ॲड. दिलीपसिंह देशमुख यांनी प्रास्ताविक करताना शहराच्या विकासासाठी आम्ही नगराध्यक्षांच्या सोबत असून, जनतेचे मूलभूत प्रश्न अग्रक्रमाने सोडवावेत, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने नूतन नगराध्यक्षा व नगरसेवकांचा शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास नूतन नगरसेवक, उपाध्यक्ष लखन गायकवाड, बाबू चाऊस, रोहन पारख, हर्षद आंबुरे, भूषण करंजकर, शीतल चोंदे, शीला पवार, आशा भवर, हरकर, योजना वाघमारे, रुकसाना बागवान, अर्चना मोरे आदी उपस्थित होते.

## कष्ट, जिद्द आणि सेल्फ स्टडीच्या बळावर गोकुळ भराडिया असिस्टंट कमिशनर

### कळंबच्या युवकाचा एमपीएससीतील यशाचा प्रेरणादायी प्रवास

सोलापूर तरुण भारत विशेष...

**तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला**
**धाराशिव, दि.२० जानेवारी -**

जिथे कष्ट, श्रम, जिद्द आणि चिकाटीने परिश्रम केले जातात, तिथे यश नक्कीच मिळते, हे कळंब तालुक्याचे सुपुत्र गोकुळ आशा विष्णुदास भराडिया (वय ३२) यांनी आपल्या जीवनप्रवासातून सिद्ध करून दाखवले आहे.

कोणताही शासकीय वारसा, राजकीय शिफारस किंवा आर्थिक पाठबळ नसताना केवळ सेल्फ स्टडी, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत पुन्हा एकदा पहिल्याच प्रयत्नात २६ वी रँक मिळवत सहाय्यक विक्रीकर आयुक्त (जीएसटी विभाग), श्रेणी-१ हे प्रतिष्ठेचे पद पटकावले आहे.

सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या गोकुळ भराडिया यांचा प्रवास मात्र सोपा नव्हता. वडील कळंब येथे आडत दुकान चालवत होते; मात्र ते तोट्यात गेल्याने बंद पडले. कोणत्याही कोचिंग क्लासची मदत न घेता गोकुळ यांनी कळंब येथील सावित्रीबाई फुले विद्यालयात पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. राजर्षी शाहू महाविद्यालयात अकरावी-बारावीचे शिक्षण घेतले. नियोजनबद्ध अभ्यास, संदर्भग्रंथांचे वाचन, मागील प्रश्नपत्रिकांचा सखोल सराव आणि सातत्यपूर्ण पुनरावृत्ती यांच्या जोरावर त्यांनी बारावीत घवघवीत यश संपादन केले.



शैक्षणिकगुणवत्तेच्या बळावर त्यांना पुणे येथील गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे येथे बी.टेक (मेकॅनिकल इंजिनिअरिंग) करण्याची संधी मिळाली. याच काळात त्यांनी एमपीएससीचे लक्ष्य निश्चित केले. अथक परिश्रम घेत २०20 साली एमपीएससी परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात २२ वी रँक मिळवून नायब तहसीलदार म्हणून नियुक्ती मिळवली.

नायब तहसीलदार म्हणून सोलापूर येथे सेवा बजावल्यानंतर सध्या ते कळंब, जिल्हा धाराशिव येथील तहसील कार्यालयात कार्यरत होते.

प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळत असतानाच मर्यादित वेळेत त्यांनी पुन्हा एमपीएससीचा अभ्यास सुरू ठेवला. शिस्तबद्ध वेळापत्रक, ठराविक अभ्यासाचे तास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी ही दुसरी मोठी प्रशासकीय झेप घेतली.

कळंब तालुक्याच्या मातीने घडवलेला हा होतकरू अधिकारी आज राज्याच्या महसूल व कर प्रशासनात महत्त्वाची जबाबदारी स्वीकारत असून, गोकुळ भराडिया यांची यशोगाथा ग्रामीण भागातील असंख्य युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.